
अमेरिका



स्टिफन विन्सेण्ट बेनेट

अमेरिका

स्टिफन व्हिन्सेण्ट बेनेट

हें पुस्तक शाम सुंदर लाल यांनीं टाईम्स ऑफ इंडिया छापखाना, मुंबई, भारत, येथें छापलें व अमेरिकन इन्फर्मेशन सर्व्हिस, मुंबई, यांनीं प्रसिद्ध केलें.

मराठी आवृत्तीची प्रस्तावना

स्टिफन व्हिन्सेण्ट बेनेट हे चालू शतकांतील एक नामवंत अमेरिकन कवि होते. त्यांचा जन्म १८९८ सालीं झाला. वडिल लष्करी अधिकारी असल्यामुळें, अनेक लष्करी ठाण्यांतच त्यांचें बालपण गेलें. कॅलिफोर्निया राज्यांत त्यांनीं आपले बालपणाचे बहुतेक दिवस घालविले. १९२० सालीं येल विद्यापीठाची एम्. ए. पदवी संपादन करून, पॅरिस येथील सोरबोन विद्यापीठांत अधिक शिक्षणासाठीं ते गेले.

प्रारंभीं त्यांनीं कथा व कादंबऱ्याच लिहिल्या. पण कवि म्हणूनच त्यांना प्रसिद्धि मिळाली. १९२९ सालीं काव्याचें पुलिट्झर पारितोषक त्यांना मिळालें. १९३० सालापासून, न्यू यॉर्कमधील पहिलें लेखक दांपत्य म्हणून सौ. बनेट व स्टिफन व्हिन्सेण्ट बेनेट ओळखलीं जाऊं लागलीं.

मि. बेनेट यांच्या काव्यगुणांचा या पुस्तकांत चांगलाच आढळ होतो. दुसऱ्या महायुद्धांत लेखकानें मृत्युपूर्वी कांहीं काळच अगोदर लिहिलेलें हें पुस्तक, आजहि वस्तुस्थितीचें निदर्शक आहे. मि. बेनेट यांनीं निव्वळ राष्ट्रप्रेमानें हें पुस्तक लिहिलें. "अमेरिकनांच्या मागील दारच्या परड्यांत इतर देशांतील लोक त्यांना भेटतील तर त्यांना अमेरिकेची चांगली ओळख होईल," असें ते नेहमीं म्हणत असत. अशाच घरगुती पद्धतीनें अमेरिकेची जगाला ओळख करून देण्याचा या पुस्तकांत त्यांचा प्रयत्न आहे.

अनुक्रमणिका

अमेरिका

जेथें आशा पालवते, जेथें स्वातंत्र्याचें वातावरण आहे, जेथें जगांतील सर्व राष्ट्रांतून आलेले विविध प्रकारचे लोक अेकाच भूप्रदेशांत राहतात, असा अेक देश आहे. कॅथोलिक, प्रॉटेस्टंट, ज्यू, अिस्लामी, बौध्द, यांपैकीं आपल्या पसंतीच्या कोणत्याहि प्रार्थनामंदिरांत त्या देशांतील लोक जाअू शकतात. अेकाद्या विशिष्ट धर्माचें पालन केलें म्हणून तेथें कोणाचा छळ होत नाहीं. आपल्या राज्यकर्त्यांची निवड तेथील स्त्रीपुरुषच करतात, पण निवडलेल्या राज्यकर्त्यांनीं आपलें काम योग्य रीतीनें बजावलें नाहीं असें आढळल्यास क्रान्तिमार्गानें नव्हे, पण निवडणुकीच्या लोकशाही मार्गानें तेथील जनता राज्यकर्त्यांना बदलूनहि टाकते. सरकार किंवा देशांतील राज्यकारभार याविषयीं आपलें स्पष्ट मत त्या देशांतील जनता नेहमींच मांडते. ते स्वयंकेंद्रित असले तरी सुध्दां, अेक जीवननिष्ठा, अेक राष्ट्र आणि अेक ध्वज यांच्याशींच सर्व जनता निष्ठावंत राहते.

हा ध्वज तारे आणि पट्टयांचा आहे. हें राष्ट्र म्हणजे अमेरिका आणि ही जीवननिष्ठा लोकशाही होय.

अमेरिका पृथ्वीवरील नंदनवन नाहीं कीं, पूर्णत्वाला पोंचलेलें राष्ट्र नाहीं. अशा प्रकारचा दावाहि अमेरिका करीत नाहीं. अमेरिकेंतील सर्व सामाजिक प्रश्न सुटले आहेत असेंहि नाहीं. अुलट, अंतर्गत आणि जागतिक व्यवहारांत अमेरिकेनें चुका केलेल्या आहेत. परंतु जगांतील जनतेला अन्न, रोजगार, सुरक्षितता आणि स्वातंत्र्य यांचा लाभ होअील अशा भविष्य-काळाकडेच तिची दृष्टि नेहमीं लागलेली असते.

जगावर राज्य करण्याची आकांक्षा अमेरिका करीत नाहीं. जगांतील अितर जनतेला गुलाम करून, अमेरिकन साम्राज्य स्थापण्याचीहि अमेरिकेला अिच्छा नाहीं. अेकादा वंशच मालकी गाजविणारा असतो याच्यावर तुझा विश्वास आहे कां असें अेकाद्या सच्चा अमेरिकनाला विचाराल तर तो तुमच्याकडे आश्चर्यानें पहातच राहील किंवा हास्यास्पद प्रश्न म्हणून तो हंसेल. वंशजात सत्ताधारित्वावर अमेरिकनांचा विश्वास नाहीं.

अमेरिका हें लढाअू राष्ट्र आहे. झगडयांतून अमेरिकन राष्ट्राचा जन्म झाला आणि झगडयांतूनच अमेरिकन राष्ट्रांत अैक्य निर्माण झालें. आपल्या निष्ठेच्या रक्षणासाठीं लढा देण्यासहि अमेरिका मागेंपुढें पहाणार नाहीं.

आजपर्यंत कोणत्याहि युध्दांत अमेरिकेनें पराभव पत्करलेला नाहीं. परंतु युध्द आणि लष्करी बाणा हेंच मानवाचें अंतिम साध्य आहे, यावर अमेरिकेचा विश्वास नाहीं. वॉशिंग्टन, ग्रँट, ली अशा अैतिहासिक वीरांना व आजहि अमेरिकेच्या संरक्षणासाठीं लढणाऱ्यांना अमेरिका वंदन करते. परंतु त्या वीरांपैकीं प्रत्येक वीर निव्वळ विजयापेक्षां अधिक अुच्च अशा साध्यासाठींच लढला. रक्तपात संपल्यावर ते वीर असें म्हणाले कीं, "आतां आपण शांतता प्रस्थापित करूं या. आतां आपण अपूर्व अशी नवनिर्मिति करूं या. जेथें लोक मित्रभावानें आणि शेजारधर्मानें नांदत आहेत असें शुचित्व देशांत निर्मूं या."

कांहीं दृष्टीनें अमेरिका मोठा आश्चर्य वाटण्यासारखा देश आहे. अमेरिका जगांतील सर्वांत तरुण राष्ट्र आहे. पण तेथील राज्यपध्दति, दीडशेंपेक्षा अधिक वर्षें, महत्त्वाचे फेरबदल न होतां, पण बदलत्या परिस्थित्यनुरूप वांकणारी अशा स्वरूपांत सतत टिकली आहे. आज अमेरिकेंत ३२ वा राष्ट्राध्यक्ष राज्य करीत आहे आणि ७८ वी कॉंग्रेस चालू आहे. जनतेनेंच त्यांची निवड केली. अमेरिकन राज्यघटना संमत झाल्यापासून जनताच सार्वभौम आहे आणि जनतेच्या मतानुसारच राज्यकारभार चालू आहे. आपले निर्णय घेण्याची, चुका करण्याची व त्या सुधारून प्रगति साधण्याची संधि अमेरिकन जनतेला नेहमींच मिळत आलेली आहे. अमेरिकेंत लोक म्हणजे अेकादा वर्ग, जात किंवा खास नेमणूक केलेला माणसांचा अेकादा गट नव्हे. लोक म्हणजे समाजांतील प्रत्येक व्यक्ति—शेतकरी, कामगार, डॉक्टर, वकील, खाटीक, स्त्रिया, इ० सर्वच जनता होय.

अशा प्रकारच्या राज्यपध्दतींतच अमेरिकेची अुन्नति झाली आणि अमेरिकेचें वैभव वाढलें. अेक बलशाली औद्योगिक सत्ता आणि धान्याचें कोठार म्हणून अमेरिका प्रसिध्दि पावली. जेव्हां जगांत पूर, आग, भूकंप, अशा अेकाद्या आपत्तीनें कोठेंहि अनर्थ कोसळला तेव्हां अमेरिकन अन्न आणि वैद्यकीय मदत, अमेरिकन डॉक्टर आणि परिचारिका, मदतीसाठीं धांवलीं आणि ही मदत कर्तव्यबुध्दीनेंच देण्यांत आली.

लक्षाधीश, दरोडेखोर, नटनटया, भ्रष्ट राजकारणी, अैतखाऊ स्त्रिया आणि अुपासमार होत असलेली पण स्वार्थी सामान्य जनता, यांचाच भरणा अमेरिकेंत आहे अशी अमेरिकेच्या शत्रूंची कल्पना असते. अमेरिकनांना याबद्दल वाअीट वाटत नाहीं. राष्ट्रभक्त आणि निष्ठावंत अशा अमेरिकनांनी आपल्या देशावर केलेल्या टीकेपेक्षां अधिक कडक टीका आमचे शत्रुहि करणार नाहींत.

लढाअींत उभे राहिलेल्या प्रत्येक अमेरिकन सैनिकामागें राष्ट्राची शक्ति उभी असते. या शक्तीची अेकाद्यानें उपेक्षा केली असेल, तिची आठवण ठेवली नसेल किंवा तिच्याशीं द्रोहहि केला असेल, तरी ही शक्ति ढळणार नाहीं. रणांगणांत अमेरिकेनें देवदूतांचें सैन्य उभें केलेलें नाहीं. स्वातंत्र्याच्या वातावरणांत वाढलेले आणि स्वातंत्र्यासाठीं लढणारे सामान्य अमेरिकन नागरिकच ते आहेत. या सैन्यांत गोरे-काळे, बोलके आणि मुखस्तंभ, कामगार आणि कारकून, शहरांतील आणि खेड्यांतील––असे सर्व तऱ्हेचे लोक आहेत. या सर्वांच्या मागे अेक बाणा आहे, अेक कल्पना आहे. कदाचित या बाण्याचा किंवा या कल्पनेचा आविष्कार त्यांना करतां आला नसेल, पण त्यांचें अस्तित्व आहे.

तो अमेरिकन बाणा, ती अमेरिकन कल्पना काय आहे? तिची उत्पत्ति कशी झाली? मोटारी, रेडिओ, चित्रपट अित्यादि निर्माण करणारें अेक संपत्तिमान राष्ट्र म्हणून नव्हे तर, जगांतील अेक जिवंत शक्ति म्हणून अमेरिका कोण आहे? या प्रश्नांचीं उत्तरें शोधण्यासाठीं आपण अमेरिकेचा अितिहास पाहूं या, वस्तुस्थिति जाणून घेअूं या. अेकादा माणूस खरोखरी कसा आहे हें ठरविण्यासाठीं आपण त्याच्या आईबापांचा, कुटुंबाचा, घराचा, तो कोणत्या वातावरणांत वाढला वगैरे गोष्टींचा शोध घेतो. तोच कित्ता अमेरिकेची माहिती मिळविण्यासाठीं आपण गिरविला पाहिजे.

समुद्रमार्गें बीज आलें

व्हर्जीनिया राज्यांतील जेम्सटाअून आणि मॅसॅच्यूसेटस् राज्यांतील प्लायमाअुथ येथें ओसाड, निर्जन प्रदेशांत झगडत, निश्चयी लोकांच्या दोन लहान गटांनीं अमेरिकन राष्ट्राची सुरवात केली. परंतु यापूर्वीं शंभर वर्षें, अुत्तर अमेरिकेंत वसाहत झालेली होती. डी सोटो, कोरोनॅडो आणि कॅबेझा डी व्हॅका हे स्पॅनिश संशोधक अमेरिकन भूमीवर जाअून पोंचले होते. तेथील विस्तृत मैदानांची, मोठमोठया नद्यांची आणि रेड अिंडियन रहात असलेल्या जंगलांची बातमी त्यांनीं अगोदरच आणलेली होती. फ्रान्सच्या कोळयांनीं ग्रॅंड बॅंकस्चा शोधहि लावला होता. फ्लॉरिडावर वसाहत झालेली होती आणि कॅनडाच्या किनाऱ्याचा परिचय साहसी खलाशांना झालेला होता. फ्लॉरिडांतील सेंट ऑगस्टिन आणि न्यू मेक्सिकोंतील सॅंटा फे हीं दोन्हीं शहरें जेम्सटाअून किंवा प्लायमाअुथ या शहरांपेक्षां अधिक जुनीं आहेत. परंतु जेम्सटाअून आणि प्लायमाअुथ या अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावरील ठिकाणांतूनच अमेरिकन राष्ट्राची सुरवात झाली.

अिंग्लंडमधील अितर लोकांनींहि वसाहती स्थापण्याचे प्रयत्न केले. परंतु ते अयशस्वी झाले. अेका झाडावर कोरलेलें क्रोआटन हें नांव आणि दंतकथा यांखेरीज रॅलेच्या रोआनोके येथील वसाहतीचा मागमूसहि अुरला नाहीं. शेवटीं जेम्स नदींतील अेका सखल व्दीपकल्पावर तीन छोटी जहाजें २४ मे १६०७ या दिवशीं येअून पोंचलीं. या जहाजांतील माणसांचा अुद्देश हल्ला करण्याचा नव्हता तर, त्या व्दीपकल्पावर वसाहत करण्याचा होता.

ते लोक कशा प्रकारचे होते, कशासाठीं आले होते, नव्या जगांत त्यांनीं जुन्या जगांतील कोणते कायदे, चालिरीति, संवयी आणल्या ?

झटपट नफा मिळविण्याच्या अुद्देशानें, सोन्याचा शोध करण्यासाठीं आलेले ते साहसी लोक होते. व्हर्जीनिया कंपनी नांवाच्या अेका व्यापारी कंपनीनें त्यांना पाठविलें होते.

हें जरी खरें असलें तरी, लष्करी कायद्यानें पाठविलेल्या लष्करी मोहिमेवर ते आलेले नव्हते. घरें, रस्ते आणि चर्चेस बांधणें, जमीन कशी आहे याची पाहणी करणें आणि अिंग्लिश लोक तेथें कसें राहूं शकतील हें पाहून वसाहत करण्यासाठीं त्यांना पाठविण्यांत आलें होतें. ही गोष्ट महत्त्वाची आहे. तसेंच ते गुलाम नव्हते या गोष्टीलाहि महत्त्व होतें.

त्या लोकांना राजानें दिलेली सनद आणि सूचनापत्र आपल्याला अद्याप पहावयास मिळतात. त्या दस्तअैवजांत दोन महत्त्वाच्या गोष्टी आढळतात. जनतेच्या त्या वेळच्या कल्पनेप्रमाणें पृथ्वीच्या टोकाला म्हणजे अमेरिकेला ते लोक जाणार होते, तरी, अिंग्लिश प्रजाजन म्हणून त्यांना असलेले हक्क अबाधित ठेवण्यांत आले होते. शिवाय अिंग्लंडमध्येंच राहणाऱ्या आणि जन्मलेल्या लोकांना असलेले सर्व हक्क आणि अधिकार कोणत्याहि वसाहतींत राहणाऱ्या लोकांना राजाच्या हुकूमानें देण्यांत आले होते. थोडक्यांत म्हणजे, अिंग्लंडांत राहणाऱ्या व्यक्तीला असणारे सर्व हक्क जेम्सटाअूनला गेलेल्या व्यक्तीला राहणार होते. त्या व्यक्तीचा वाटेल तसा अुपयोग करण्याची किंवा त्या व्यक्तीवर जुलूम करण्यास बंदी होती. न्यायालयांत जाअून अन्यायाची दाद ती व्यक्ति लावून घेअू शकत होती.

आणखी अेक अुल्लेखनीय गोष्ट म्हणजे व्हर्जीनियांतील राज्यकारभार अेका व्यक्तीच्या हातांत न ठेवतां, अेक अध्यक्ष आणि त्याचे सल्लागार मंडळ यांच्याकडे देण्यांत आला होता.

अशा प्रकारें, ते १०५ लोक जेम्सटाअूनला आले आणि यापुढील त्यांची हकीकत शौर्य, दुःख आणि कष्ट यांनीं भरलेली आहे. आज चंद्रावरील पर्वत आपल्याला जितके अपरिचित आहेत, तितक्या अपरिचित भूभागांत ते आलेले होते. पशु, पक्षी, फुलें, तेथील अुन्हाळा, तेथील रेड अिंडियन, सर्वच कांहीं नवें आणि अपरिचित होतें. नदींतील पाण्याची चवहि नवीनच वाटत होती. लहान मुलांप्रमाणें, ते भयचकित झाले; मायदेशाच्या आठवणीनें बेचैन झाले. ताप, अुपासमार आणि रेड अिंडियन या आपत्तींना त्यांच्यापैकीं अनेक बळी पडले. रेड अिंडियन त्यांच्याबरोबर क्वचित् मित्रभावाने वागत तर, क्वचित् शत्रुत्वानें वागत. यामळें ते अगदीं गोंधळांत पडत. शेवटीं जे थोडे फार लोक शिल्लक राहिले ते जेम्सटाअूनचा त्याग करून होड्यांतून पळून गेले. परंतु नदीच्या मुखाजवळ त्यांना अिंग्लंडांतून मदतीसाठीं आलेली जहाजें भेटलीं आणि पुन्हां पहिल्यापासून सुरवात करण्याच्या हेतूनें ते जेम्सटाअूनला परतले. अर्थात् यासाठीं थोर धैर्याची जरुरी होती; पण ते कचरले नाहींत.

स्मिथ, पर्सी, ब्राऊन, ऑलकॉक, मिडविंटर, सार्जंट आणि मार्टिन अशीं या धीरवृत्तीच्या लोकांचीं नांवें होतीं. पाण्यांत फेंकून दिलेल्या बीजासारखी त्यांची अवस्था झाली होती. बहुतेक मरण पावले. जे जगले त्यांची भरभराट झाली.

त्यांना सोने तर सांपडलें नाहींच, पण विनासायास पैसाहि मिळाला

नाहीं. तरीसुध्दां बारा वर्षांच्या कष्टांनंतर, त्यांनीं वसाहत स्थापन केली. पुढें वसाहतींत स्त्रियाहि आल्या आणि जेम्सटाऊनमध्यें बालकें जन्माला आलीं.

३० जुलै १६१९ या दिवशीं, जेम्सटाऊनमधील लांकडी बांधणीच्या चर्चमध्यें व्हर्जीनियाची पहिली असेंब्ली भरली. या असेंब्लींत गव्हर्नर आणि त्याचे सल्लागार व वसाहतींतील अकरा वस्त्यांचे बावीस प्रतिनिधि हजर होते. जलै महिन्यांतल्या कडक उन्हाळ्यांत काम करून त्यांनीं वसाहतीसाठीं अनेक कायदे व नियम तयार केले. अर्थात् ते कायदे मोठे महत्त्वाचे नव्हते. परंतु वसाहतींतील व्यवहाराला ते आवश्यक होते. गुरांची संख्या अल्प असल्यामुळें, गव्हर्नरच्या परवानगीशिवाय गुरें मारण्यास बंदी करण्यांत आली. शेजाऱ्याची होडी किंवा रेड अिंडियन माणसाचा तराफा चोरणारा अिसम शिक्षापात्र ठरविण्यांत आला. प्रत्येक अुपाध्यायाला वर्षांत त्यानें केलेले विवाह, नामकरणविधि व अंत्यविधि यांचा अहवाल सादर करण्याचा आदेश मिळाला. हे कायदे करण्यांत गव्हर्नर आणि त्याचें कौन्सिल यांच्याखेरीज बावीस लोकप्रतिनिधींनींहि भाग घेतला होता. या प्रतिनिधींनीं चर्चा केल्या, आपल्या जीवनाविषयीं आणि वसाहतींतील व्यवहार कसे चालावेत यांविषयीं आपलीं मतें मांडलीं.

यावरून वसाहतींत स्वायत्त कारभाराचा प्रारंभ झाला असें नाहीं. पण असें कांहींतरी सुरू झालें खास. अेक महासागर ओलांडून, अेका निर्जन ठिकाणीं झगडत राहिलेल्या त्या लोकांना, आपल्यावरील कारभाराविषयीं आपलें मत मांडण्याचा हक्क असावा, असें वाटूं लागलें आणि व्यावहारिक दृष्टीनें ब्रिटिश सरकारनें हा हक्क मान्य केला. यापुढील काळांत गव्हर्नर आणि लोकप्रतिनिधि यांच्यांत अनेक भांडणें झालीं; अनेक अडचणी निर्माण झाल्या. पण जनहित मांडण्याचें प्रतिनिधींचें कार्य चालूंच राहिलें. स्वातंत्र्यबीज व्हर्जीनियांतील तंबाखूच्या सुपीक शेतांत चांगलेंच रुजलें.

दरम्यान आणखी कांहीं गोष्टींचाहि अुद्भव झाला होता. १६१९ मध्यें अिंग्लंडमधन आलेल्या जॉन पोरी यानीं आपल्या व्हर्जीनियाच्या वृत्तान्तांत लिहिलें, "आमचे गुराखी आतां दर रविवारीं अुत्तम रेशमी पोशाख करून चर्चमध्यें जातात आणि क्रॉयडॉनच्या खाणमजुराची बायको पाणीदार मोत्यांचा पट्टा असलेली हॅट घालूं लागलेली आहे."

नव्या जगांत येण्यापूर्वी कोण सरदार होता किंवा कोण गुराखी होता, याची कदर आतां राहिली नाहीं. नव्या जगांत ज्याची भरभराट झाली त्याच्या बायकोनें रेशमी कपडे वापरले तरी तें चमत्कारिक वाटेनासें झालें.

आअीबापांच्या मोठेपणावर किंवा श्रीमंतीवर अेकाद्याचा मोठेपणा ठरूं नये, प्रत्येक माणसाला आपल्या हिमतीवर पुढें येण्याची संधि मिळाली पाहिजे असेंच स्वप्न अमेरिकेपुढें तरळत आलें आहे.

सुमारें अेक हजार मैल अुत्तरेकडे असलेल्या अधिक थंड आणि कष्टकारक अशा न्यू अिंग्लंडच्या किनाऱ्यावरील हकीकत आतां पाहूं या.

११ नोव्हेंबर १६२० या दिवशीं 'मे फ्लॉवर' नांवाच्या जहाजांतून आलेले यात्रेकरूं (पिलग्रिमस्) या किनाऱ्यावर अुतरले.

सोनें शोधणारे, साहसी किंवा जेते म्हणून ते पिलग्रिमस् आलेले नव्हते. त्यांच्यापैकीं कांहीं जमीन मिळविण्याच्या आशेनें आले. पण बहुतेकांच्या येण्याचा हेतु निराळाच होता. आपल्या स्वतःच्या मार्गानें अीश्वरपूजन करण्यासाठीं ते आले. त्यांच्या काळांत अिंग्लंडमध्यें प्रचलित असलेल्या अेस्टॅब्लिशड् चर्चच्या मार्गानें नव्हे तर, साध्या आणि श्रध्दाळू मार्गानें अीश्वरपूजन करण्याची त्यांची अिच्छा होती.

पिलग्रिमस् कुटुंबवत्सलच होते. अेका छोटयाशा जहाजांतून ६४ दिवस चाललेल्या सफरींत त्यांनीं आपलीं बायकामुलेंहि बरोबर घेतली होतीं. प्रवासांत अेका बालकाचा जन्म झाला. किनाऱ्यावर अुतरल्यावर आणखी दोन मुलें जन्मलीं. अेकंदर माणसें शंभर होतीं. अेका अिंग्लिश कंपनीनें त्या साहसांत पैसा घातला होता. परंतु आपल्या बायकामुलांसह जगाच्या टोंकाला जाणारे कुटुंबी गृहस्थच या साहसाचे मुख्य आधार होते.

असा वेडेपणा करायला ते कां तयार झाले ? असा धोकेबाज मार्ग त्यांनीं कां पत्करला ? त्यांना कोणी आज्ञा केली नव्हती कीं लालूच दाखविलेली नव्हती. कष्ट आणि दुःख सहन करण्याची त्यांनीं तयारी केली, आपलीं गृहें त्यांनीं अुध्वस्त केलीं, बालपणाच्या गोड स्मृतींपासून तों घरांतील अनेक प्रिय चीजवस्तूंचा त्याग करण्यास ते तयार झाले. हें सर्व करण्याचें कारण अेकच होतें. आपल्याच मार्गानें अीश्वरपूजन करण्याचा त्यांनीं दृढ निश्चय केलेला होता.

शेतकरी, शेतमजूर, अेक पोस्टमास्तर, अेक अुपाध्याय आणि रात्रीं दिव्याशीं बराच वेळ वाचत बसणारा अेक मुलगा अशा या यात्रेकरूंचा दीर्घ प्रवास अिंग्लंडच्या अुत्तर भागांतून अनेक वर्षांपूर्वीच सुरू झाला होता. अिंग्लंडमधील अधिकाऱ्यांच्या आणि चर्चच्या आदेशानुसार पूजन करण्याचे त्यांनीं नाकारले आणि ही दुःखकारक कहाणी सुरू झाली. या त्रासांतून सुटण्यासाठीं देशांतर करून ते हॉलंडमध्यें आले. कष्टाळू आणि प्रामाणिक अशा त्या माणसांचा जीवनक्रम हॉलंडमध्यें शांतपणें चालूं झाला. परंतु

स्वत:च्या पसंतीच्या मार्गानें ओश्वरपूजन करण्याची मोकळीक राहील, असें आपलें अेकादें ठिकाण असावें ही त्यांची आशा नष्ट झाली नाहीं. पुष्कळ वर्षानंतर विस्तृत महासागराच्या पलिकडे मोठ्या कष्टानें त्यांना असें अेक ठिकाण सांपडलें आणि त्यांना समाधान झालें.

पण, नवीन भूप्रदेशांत त्यांचा शास्ता कोण, त्यांचे व्यवहार कसे चालावे हे प्रश्न होतेच. या प्रश्नांची अुत्तरें शोधण्यासाठीं जरा स्पष्टीकरण केलें पाहिजे.

ते यात्रेकरू कोणाचे नोकर नव्हते किंवा अिंग्लंडमधील त्यांच्या श्रीमंत मित्रांचे ते गुमास्ते नव्हते. अेका समायिक कार्यांतले ते भागिदार होते. अिंग्लंडमधील पैसेवाल्यांनीं दहा पौंड देअून अेक भाग घेतला. ज्या यात्रेकरूं-जवळ पैसा नव्हता, त्यांनीं समुद्र ओलांडून वसाहत स्थापण्याची तयारी दाखविली. सात वर्षांनंतर सर्व भांडवल आणि नफा यांची सर्व भागीदारांत समान वांटणी करावयाची असें ठरलें. जर सर्व कांहीं सुरळीत पार पडलें तर, ज्याला जें हवें तें मिळणार होते. पैसेवाल्यांना नफा मिळणार होता, यात्रेकरूला आश्रयस्थान आणि घर मिळणार होतें.

परंतु अेकदां अमेरिकेंत पोंचल्यावर, यात्रेकरूंनीं आपला कारभार आपणच चालविण्याचें ठरविलें, ही गोष्ट महत्त्वाची आहे. या गोष्टीला सर्वांची संमति मिळाली. लंडनमधील व्यापाऱ्यांनीं फक्त सल्ला द्यावा, पण आज्ञा किंवा हुकूम करूं नये. त्यांनीं नफ्याची चौकशी करावी, मदत द्यावी, अधिक माणसें पाठवावीं; पण अेकदां वसाहत स्थापन झाल्यावर, वसाहतींतील व्यवहार कसें चालावेत, याविषयीं मात्र ढवळाढवळ करतां कामा नये.

आणखी कांहीं गोष्टींची आवश्यकता होती. यात्रेकरू अिंग्लिश प्रजाजन होते. अर्थात त्यांनीं वसवलेली वसाहत अिंग्लिश वसाहत ठरणार होती. तेव्हां जहाज हांकारण्यापूर्वी या मोहिमेला राजाची अधिकृत मान्यता म्हणून जेम्स राजाकडून सनद मिळविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला.

पण राजानें सनद देण्याचे नाकारलें आणि यात्रेकरूंना सनदेशिवाय जावें लागलें. जेम्स राजानें त्यांना कळविलें कीं, ते जर नीट वागले तर त्यांना अडथळा होणार नाहीं. पण यापलिकडे जाअून त्यांना आशिर्वाद मात्र मिळणार नाहींत.

तेव्हां शेवटीं, व्हर्जीनिया कंपनीनें दिलेल्या वसाहत करण्याच्या अधिकारानिशींच यात्रेकरूंना जावें लागलें. आणि जोपर्यंत ते व्हर्जीनियांतच राहतील तोंपर्यंत हा अधिकार कायदेशीर राहणार होता.

सुरवातीला ठरल्याप्रमाणें, यात्रेकरूंनीं व्हर्जीनियांत वसाहत केली

नाहीं. न्यू अिंग्लंडमध्येंच त्यांनीं वस्ती केली. त्यांच्या योजनेंतील या बदलाची अितिहासकार अनेक कारणें देतात. पण सर्वांत सोपे स्पष्टीकरण विशेष सुलभ आहे. ६४ दिवसपर्यंत गर्दीत अेका जहाजावर त्यांनीं प्रवास केला. आणि यानंतर जमिनीचें त्यांना दर्शन झालें. ही जमीन व्हर्जीनियांतील जमीनीसारखी सुपीक नव्हती. तेथील हवामान अुबदार नव्हतें. अगदीं रानटी अवस्थेंत ती भूमि होती. पण ती जमीन होती. त्या जमिनीवर ते फिरूं शकत होतें. तेव्हां आणखी पुढें न जातां, तेथेंच राहण्याचें त्यांनीं ठरविलें हें साहजिक होतें.

अेकदां न्यू अिंग्लंडमध्यें राहिल्यावर, व्हर्जीनिया कंपनीनें त्यांना दिलेला परवाना रद्द ठरत होता. न्यू अिंग्लंडवर व्हर्जीनिया कंपनीचा हक्क नव्हता. 'मे फ्लॉवर' मधून आलेले कांहीं लोक–यांत यात्रेकरू (पिलग्रिमस्) नव्हते–आपण कोणत्याहि सरकारच्या अधिकारकक्षेंत आतां नाहीं असें बोलूं लागले. तेव्हां यात्रेकरू आणि अितर मंडळी 'मे फ्लॉवर' वरील अेका केबिनमध्यें जमलीं आणि त्यांनीं, आज "मे फ्लॉवर कॉम्पॅक्ट" म्हणून प्रसिध्द असलेला, करार केला. तो करार पुढीलप्रमाणें होता :

"अीश्वराची कृपा असो. अीश्वरी तेज वाढावें, ख्रिश्चन धर्माचा प्रसार व्हावा आणि आमच्या राजाचा आणि देशाचा मान वाढावा म्हणून, व्हर्जीनियाच्या अुत्तर भागांत पहिली वसाहत करण्यासाठीं सफर करून आलेले, या करारावर सह्या करणारे व ग्रेट ब्रिटन, फ्रान्स आणि आयर्लंड यांचे सार्वभौम प्रभु राजे जेम्स यांचे प्रजाजन असलेले आम्ही अीश्वराला स्मरून, परस्परांच्या संमतीनें अेकत्र होअून, आमच्यांत सुव्यवस्था नांदावी आणि वरील हेतु साध्य व्हावेत म्हणून आमचा अेक राजकीय संघ बनवीत आहों. आणि यापरत्वें वसाहतीच्या सर्वसामान्य स्वास्थ्यासाठीं योग्य आणि सोयिस्कर असे न्याय्य आणि समान कायदे, नियम, वटहुकूम आणि अधिकाराच्या जागा, वेळोवेळीं गरज पडेल तशा, निर्माण करण्याचें आम्ही ठरवीत आहों आणि त्यां सर्वांचे पालन करण्याची आणि त्यांचा मान राखण्याची प्रतिज्ञा आम्ही करीत आहों. या गोष्टींची साक्ष म्हणून, केप कॉड येथें १८ नोव्हेंबर १६२० रोजीं करारावर आम्ही सह्या करतो."

या करारावर ४१ लोकांनीं सह्या केल्या व जॉन कार्व्हर याच्या गव्हर्नर पदावरील निवडीस संमति दिली. त्यानंतर त्या भागांत शोध करून वस्ती करण्यास योग्य अशी जागा मिळविण्याच्या अुद्योगाला ते लागले.

हा करार म्हणजे स्वातंत्र्याची घोषणा नव्हती; कारण, अिंग्लंडच्या राजाचे निष्ठावंत प्रजाजन आपण असल्याचें त्यांनीं करारांत नमूद केलें.

स्वातंत्र्य, समता आणि लोकशाही यांची स्थापना असाहि त्या कराराचा अर्थ नव्हता.

पण असे कांहीं शब्द अुच्चारले गेले, त्यांची लेखी नोंद झाली. तीं माणसें अेकत्र जमलीं आणि कोणतीच सामाजिक व्यवस्था नसलेल्या ठिकाणीं त्यांनीं व्यवस्था निर्माण केली. सर्वसामान्य कल्याणासाठीं, न्याय्य आणि सर्वांना समान लेखणारे कायदे करणारी शासनव्यवस्था निर्माण झाली; 'सर्व-सामान्य हितासाठीं योग्य व सर्वांना समान कायदे' करणारें सरकार स्थापन झालें. पुढें त्या सभेची आणि त्या प्रतिज्ञेचीं स्मृति अितरांना मिळाली. अनुभव आला कीं असें कांहीं तरी करणें अशक्य नाहीं. विणकर, पिंजारी, शांतवृत्तीचे कुटुंबी गृहस्थ—अशीं सामान्य माणसें अेकत्र येअन, राजाची सनद किंवा हुकूम अगर कंपनीच्या सूचना नसतांहि आपला सामाजिक कारभार कसा चालवावा हें ठरवूं शकलीं. त्यांनीं तशी कृति केली आणि जनतेच्या मनांत त्याची स्मृति कायम राहिली.

दरम्यान जेम्सटाअूनमधील लोकांप्रमाणें, प्लायमाअुथच्या लोकांनाहि कष्ट आणि रानटी भूप्रदेश यांच्याशीं झगडा करावा लागला. फरक अेवढाच कीं, प्लायमाअुथवाल्यांना थंडीच्या दिव्यांतून जावें लागलें; पण रोग आणि दुःख यांचें प्रमाण सारखेंच होतें. पहिल्याच हिवाळ्यांत निम्मे लोक मृत्युमुखीं पडले आणि नवीन जगताच्या हिममय भूमींत त्यांना चिरविश्रांति मिळाली. सामर्थ्यशाली पुरुष मरण पावले तरी, स्त्रियांनीं सर्व बालकांचा बचाव केला. आणि जेव्हां वसंत ऋतु आला तेव्हां त्यांना आढळलें कीं, आहे, येथेंहि सौख्य आहे.

रेड अिंडियन लोकांपासून, धान्य कसें पिकवावें आणि तें कसें वापरावें हें ते लोक शिकले. नद्यांतील वांव (सर्पासारखा अेक तऱ्हेचा मासा) कसे पकडावे आणि रानटी प्रदेशांत आपलें रक्षण कसें करावें याचीहि त्यांनीं माहिती मिळविली. प्रारंभीं कांहीं वर्षें त्यांची जवळजवळ अुपासमारच झाली. पण नंतर मात्र त्यांनीं आपलें अंगिकृत कार्य पुरें केलें. जंगलांतील वृक्ष आणि मनांतील दृढ निश्चय यांच्या जोरावर आपल्या मार्गानें अीश्वरपूजन करतां येअील अशी जागा त्यांनीं तयार केली.

अशा प्रकारें अमेरिकन भूमीवर आणखी अेक बीज रोवलें गेलें. जेम्सटाअून येथें मायदेशांतून आणलेले हक्क कायम राखण्यांत आले, निर्जन भूभागांत सर्वच माणसें समान ठरलीं आणि अेका सभेची स्थापना झाली. प्लायमाअुथच्या लोकांनीं आपल्या पसंतीच्या मार्गानीं अीश्वरपूजन करण्याचा अधिकार प्रस्थापित केला आणि मायदेशांतील राज्यपद्धतीपेक्षां निराळी अशी

स्थानिक स्वराज्याची राज्यपद्धति निर्माण केली; आणि दोन्हीहि ठिकाणीं मनुष्याचें मूल्य मनुष्यत्वावरच ठरलें.

हीं प्रारंभींचीं माणसें कोण होतीं अशी अुत्सुकता वाटते. जेम्सटाअूनचा जॉन स्मिथ हा शिपाअी बाण्याचा संशोधक अुत्तम प्रकारें नकाशे तयार करणारा होता. मोठमोठ्या गोष्टी सांगणारा हा माणूस मोठा चौकस आणि नव्या गोष्टींत रस घेणारा होता. त्याला थकवा कसा तो माहित नव्हता. अगदीं चिकाटीनें व्हर्जीनिया आणि न्यू अिंग्लंडच्या किनाऱ्याचा नकाशा त्यानें तयार केला. प्लायमाअुथचा ब्रॅडफोर्ड; हा स्वयंसिद्ध विद्वान गृहस्थ अतिशय मृदु स्वभावाचा व मोठा अीश्वरभक्त होता. तीस वर्षें तो गव्हर्नरच्या पदावर होता. तो मेला तेव्हां त्याच्याजवळ ४०० पुस्तकांचें अेक ग्रंथालय होतें. बरें आणि वाअीट, मूर्ख आणि भोळे, गुन्हेगार असे सर्व प्रकारचे पण सामान्य लोक ते होते. होय, त्यांच्यांत अेक गुन्हेगार, खुनी अिसमहि होता. पण या सामान्य माणसांनीं नवीन संधीचा फायदा घेतला आणि त्याचें थोडेंफार सार्थक केलें. शेतकरी, विणकर, सुतार, गुराखी, साहसी—अशा सामान्य वर्गांतूनच ते लोक आलेले होते. श्रीमंत आणि वरिष्ठ वर्गांतून कोणीहि आला नव्हता. सर रिचर्ड सॉल्टनस्टॉल नांवाचा अेकच जातिवंत सरदार मॅसॅच्यूसेटस् बे कॉलनी ही वसाहत स्थापन करणाऱ्या लोकांबरोबर आला. हुद्देदार, पदवीधर असे वरिष्ठ वर्गीय मागाहूनच आले. पण अेकंदरींत श्रेष्ठ आणि श्रीमंत वर्गीय व आळशी या धाडसांत पडलेच नाहींत. जे आले त्यांच्याविषयीं असें म्हटलें गेलें कीं, निर्जन प्रदेशांत पेरणी करण्यासाठींच अीश्वरानें गहूं पाखडले. आणि अमेरिकेंत येण्याविषयीं त्यांना काय वाटलें या विषयीं ब्रॅडफोर्ड म्हणतो "मोठमोठीं संकटें येणार हें ठरलेलेंच होतें,पण त्यांच्यापुढें तग न धरण्यासारखीं तीं नव्हतीं. अडचणीहि होत्याच. परंतु त्या दूर करणें अशक्य नव्हतें." पश्चिमेकडील मैदानांत अमेरिकेचा विस्तार वाढल्यावर, असें म्हणण्यांत येअू लागलें कीं, "भित्र्यांनीं घरच सोडलें नाहीं आणि अशक्त वाटेंतच मेले". अेकंदरींत सुरवातीच्या माणसांविषयीं हीं विधानें खरीं होतीं आणि अेक प्रकारें तें अपरिहार्यच होतें. धैर्य, साहसप्रियता, धाडस, अीश्वरावर श्रद्धा, स्वातंत्र्याची आकांक्षा—अशी कांहीं तरी प्रेरक शक्ति असल्याशिवाय, छोटया जहांजांतून प्रक्षुब्ध समुद्रांतील प्रवास करण्यासाठीं व सर्वस्व सोडण्यास सुखासुखी कोणीच तयार होणार नाहीं; आणि अशी कांहीं शक्ति नसती तर जे आले ते जगूंच शकले नसते. कांहीं मवाली लोकहि आले. प्रत्येक देशांत मवाली असावयाचेच. पण जे टिकाव धरूं शकले ते स्वावलंबी बनले. अशी होती सुरवातीची अेकंदर हकीकत.

मोठ्या प्रमाणावरील देशांतर

यानंतर, अेकाद्या क्लोव्हर गवताच्या भूप्रदेशांत भुंग्यांनीं गर्दी करावी, तशी माणसांची आवक होअू लागली. १६२० पासून ही आवक चालूच राहिली.

केवळ ब्रिटिश बेटांतूनच नव्हे तर, सर्व युरोपांतूनहि लोक येअू लागले. लोहचुंबकाकडे लोखंड खेचलें जावें, तशी नव जगताकडे जनता आकृष्ट झाली. कांहीं व्यक्ति आल्या; तसेंच गटागटानें लोक आले. जेम्सटाअून येथें आलेल्या अिटालियन कांच कारागीरांसारख्या कांहीं लोकांना विशिष्ट कसबी म्हणून आणण्यांत आलें. फ्लॉरिडांतील न्यू स्मिर्ना येथें आलेल्या ग्रीक व मिनॉरकन्स यांच्यासारखे कांहीं मजूर, कष्ट करण्याच्या अटींवर आले. अनेक वंशांचें ते होते. न्यू नेदर्लंडस् येथें आलेले डच, डेलावेअरचे स्वीडिश लोक, साअूथ कॅरोलिनाचे आणि दक्षिण भागांतील फ्रेंच, फ्लॉरिडा, न्यू मेक्सिको आणि कॅलिफोर्नियांत अुतरलेले स्पॅनिअर्डस्, पेन्सिल्व्हानियांतील आयरिश, स्कॉच आणि जर्मन आणि सर्वत्र शिरलेले अिंग्रज–असे भिन्न वंशीय लोक येअून स्थायिक झाले. आणि आपल्याबरोबर त्यांनीं आपले कांहींतरी वैशिष्ठच आणलें. स्वीडिश लोकांनीं ओंडचाची झोपडी तयार करण्याची कला आणली आणि अमेरिकेंतील ओंडचांची पहिली झोंपडी बांधली. डचांनीं आणलेल्या अनेक गोष्टींत बालकांचा संत सेंट निकोलस सेंटा क्लॉज होता. जर्मन लोकांनीं आपली शेतीची पद्धति आणली. फ्रेंचांनीं द्राक्षाच्या मळ्याचें कसब आणलें.

राजासाठीं किंवा लोकसत्ताकासाठीं लढलेल्या पराभूत बंडखोरांनीं नव्या जगांतच आश्रय घेतला. आपल्या पसंतीच्या मार्गानीं अीश्वरपूजन करूं अिच्छिणाऱ्या धार्मिकांनीं सुरवातीच्या यात्रेकरूंप्रमाणें, याच देशाकडे धांव घेतली. जगांत पुढें येण्याची महत्वाकांक्षा असणाऱ्या गरिबांनींहि नव्या जगाचा रस्ता धरला. कांहीं वर्षें अंगमेहनतीचें काम केलें तर शेवटीं हॅट, कपडे, बंदूक मिळेल आणि जीवनांत कांहीं तरी संधि मिळेल अशा आशेनें कांहीं लोक आले; आणि आलेल्यांत उडाणटप्पू व गुन्हेगार होते–होय, तसल्या प्रकारचे लोकही होते.

सर्वांचें अैक्य साधणारी प्रक्रिया अद्याप सुरू झालेली नव्हती. अद्याप ब्रिटिश वंशीयांचाच भरणा अधिक होता. पण सेअिक्सस, डेलानॉय,

व्हॅन कोर्टलँड, ग्रोघॅन, मॅन्स्कर, र्हिकिमर अशीं शेंकडों नवीं नावें आढळूं लागलीं. आलेल्या प्रत्येक नवीन वंशानें आपल्या परंपरा आणि विशिष्ट लज्जत अमेरिकन जीवनाला दिली.

१७७६ पर्यंत अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावर मेनपासून जॉर्जियापर्यंत अेक हजार मैलांच्या भूप्रदेशांत तेरा वसाहती स्थापन झाल्या होत्या. विविधता असलेल्या सुमारें वीस लाख लोकवस्तीच्या या तेरा वसाहती ब्रिटिश ध्वजाखालींच वावरत होत्या.

दक्षिणोत्तर लोकवस्ती पसरली. नद्यांच्या कांठाकांठानें आंतील भागांतहि लोकांनीं प्रवेश केला. परंतु ॲपालॅचिअन्स पर्वताच्या अडथळ्यामुळें अगदीं अंतर्गत विभागांत वस्ती करण्यास लोक अद्याप धजावले नव्हते. अर्थात् कांहीं कष्टाळू लोक, पर्वतालाहि न जुमानतां, गेले होते.

अक्षरशः रक्त सांडून, कष्ट करून, घाम गाळून, लढून, सामोपचारानें, बंदुकीच्या जोरावर, अशा अनेक प्रकारांनीं आणि कांहीं तरी नव निर्मिति करण्याच्या आशेनें लोकांनीं जमीन मिळविली.

वसाहतींत साम्यापेक्षां विविधताच अधिक होती. प्रत्येक वसाहतीची वैशिष्ठ्यें निराळीं होतीं. या तेरा वसाहतींची स्मृति अमेरिकन ध्वजावरील अेकअेका पट्ट्यानें जागृत ठेविली आहे. प्रत्येक वसाहतीची सुरवात केव्हां झाली त्याचा तपशील पुढीलप्रमाणें आहे:

व्हर्जीनिया - - -	१६०७
न्यू यॉर्क - - -	१६१४
मॅसॅच्यूसेटस् - - -	१६२०
न्यू हॅम्पशायर - - -	१६२३
मेरी लँड - - -	१६३४
कनेक्टिकट् - - -	१६३५
ऱ्होड आयलंड - - -	१६३६
डेलावेअर - - -	१६३८
नॉर्थ कॅरोलिना - -	१६५०
न्यू जेर्सी - -	१६६४
साऊथ कॅरोलिना - -	१६७०
पेन्सिल्व्हानिया - -	१६८२
जॉर्जिया - - -	१७३३

यांपैकीं, व्हर्जीनिया आणि मॅसॅच्यूसेटस् यांची स्थापना जेम्सटाऊन आणि प्लायमाअुथ येथें झाली. आकारानें लहान पण सर्वांत स्वतंत्र वृत्तीची

ऱ्होड आयलंड वसाहत रोजर विल्यम्स यानें १६३६ मध्यें स्थापन केली. वसाहतींत १६६३ पासून धार्मिक स्वातंत्र्य देण्यांत आलें. पेन्सिल्व्हानियाची स्थापना विल्यम पेन नांवाच्या अेका क्वेकर पंथीयानें केली आणि पुष्कळ क्वेकर पंथीयांनीं तेथें वसाहत केली. तुरुंगांत गेलेल्या गरीब ऋणकोंना जीवनाची नवीन सुरवात करण्यास संधि देण्याच्या परोपकारी प्रयोगासाठीं जेम्स ऑग्लेथॉर्प नांवाच्या माणसानें जॉर्जिया वसाहत अुभारली. न्यू नेदर्लंडस् म्हणून डचांनीं स्थापना केलेल्या वसाहतीचा १६६४ मध्यें न्यू यॉर्क प्रांत बनला. लॉर्ड बाल्टिमोर नांवाच्या अेका कॅथॉलिक सरदारानें अुभारलेल्या मेरी लँड वसाहतींत कॅथॉलिक पंथीय अुपाध्याय आणि लोक यांनीं प्रथम वस्ती केली. अशा प्रकारें प्रत्येक वसाहतीची स्थापना निराळ्या प्रकारानें झाली. सर्वच वसाहतींनीं अमलांत आणावा असा एक आराखडा नव्हता.

१७६५ मध्यें वसाहतवाल्यांना तुम्ही कोण असा प्रश्न केला असता तर, "मी मॅसॅच्यूसेटस्चा रहिवासी आहे, मी व्हर्जीनियाचा आहे किंवा माझी भूमी जॉर्जिया" अशींच उत्तरें मिळालीं असतीं. ते अिंग्लंडचा ध्वज उभारीत होते आणि अिंग्लंडच्या राजाचें आयुरारोग्य चिंतीत होते. पण ते अिंग्लंडमध्यें रहात नव्हते. अेवढेंच नव्हे तर, त्यांच्यापैकीं अनेकांनीं अिंग्लंड पाहिलेलेंहि नव्हतें. "अमेरिकन" हा शब्द दीर्घ काळ वापरला जात होता. परंतु त्याला आजचा अर्थ प्राप्त झालेला नव्हता. अेका महान राष्ट्राचे घटक म्हणून ते वावरत नव्हते. मॅसॅच्यूसेटस्, कनेक्टिकट् किंवा ऱ्होडलँड रहिवासी म्हणूनच लोक वावरत होते. आणि व्हर्जीनियांतील तंबाखूच्या श्रीमंत मळेवाल्याचा जीवनक्रम न्यू अिंग्लंडमधील शेतकरी किंवा जंगलांतील झोपडींत राहणाऱ्या माणसापेक्षां निराळा होता.

तरीसुध्दां सर्व वसाहतींत आणि तेथील लोकांत कांहीं गोष्टी समान होत्या. नाहींतर, अेक राष्ट्र म्हणून त्यांचें अैक्य झालेंच नसतें.

जेम्सटाअूनच्या संस्थापनेपासूनच्या १६० वर्षांत त्यांनीं काय कर्तबगारी केली, काय अुभारणी केली ?

फिलाडेल्फिया, बोस्टन, न्यू यॉर्क, विल्यम्सबर्ग, चार्लस्टन अशीं शहरें वसाहतवाल्यांनीं अुभारलीं. रेड अिंडियन लोकांना मागें हटवून अमेरिकन भूमीवर आपलें आसन त्यांनीं स्थिर केलें. जंगलें साफ करून, शेतीची जमीन तयार करण्यांत आली. धाडशी खलाशी, चतुर व्यापारी आणि काटक दर्यावर्दी त्यांच्यांत निर्माण झाले. पैसा आणि मोकळा वेळ असलेल्यांनीं अुत्तम जीवन घालविलें आणि स्वतःविषयीं सर्व बाजूंनीं विचार केला. त्यांच्यापैकीं कांहींजण मोठमोठ्या विस्तृत मळ्यांचे सर्वसत्ताधीश

स्वामी बनले. शाळा, कॉलेजें, चर्चेस आणि सार्वजनिक अिमारती यांचीहि अुभारणी करण्यांत आली. विणकर, रंगारी, सोनार, वगैरे कारागीरहि त्यांच्यांत होते. परंतु शेती, तंबाखूचे मळे पिकविणें आणि मासेमारी हेच प्रमुख व्यवसाय होते. अुद्योगधंदेहि निघालेले होते. अेवढेंच नव्हे तर १७७५ सालीं अिंग्लंड व वेल्समध्यें असलेल्या लोखंडाच्या भट्ट्यांच्या संख्येपेक्षां अधिक भट्ट्या तेरा वसाहतींत होत्या. अर्थात यापैकीं बहुतेक भट्ट्या लहान होत्या आणि फिलाडेल्फिया, न्यू यॉर्क किंवा बोस्टन अशा शहरांत नाट्यगृहें, वृत्रपत्रें, नृत्य, संगीत अित्यादि शहरीं जीवनाच्या निदर्शक गोष्टीहि आढळत होत्या.

परंतु युरोपीय प्रवाशांना या गोष्टींमुळें अमेरिकेविषयीं आकर्षण वाटत नव्हतें. फिलाडेल्फियाला पॅरिसची सर नव्हती. न्यू यॉर्क लंडनच्या दर्जाला पोंचलेलें नव्हतें. परंतु या छोट्या शहरांतील रंगेल समाज अितर शहरांतील रंगेलांसारखाच होता. फॅशन्स आणि आवड याबाबतींत मात्र तो थोडासा मागासलेला होता. कोटाला कोणती बटनें शोभतील किंवा नृत्यप्रसंगीं कोणतें संगीत संवादि ठरेल असल्या गोष्टींत तो युरोपचेंच अनुकरण करीत होता. युरोपीय प्रवाशांनीं अमेरिकन शहरांपेक्षा अधिक सरस शहरें पाहिलेलीं होतीं आणि अधिक श्रीमंत व्यापारी त्यांना भेटले होते. अमेरिकेंतील शेती पध्दतींतहि प्रवाशांना आकर्षण वाटावें असें कांहींच नव्हतें. त्या वेळची अमेरिकन पध्दति म्हणजे अुधळपट्टीचा नमुना होता. जमीन भरपूर होती. त्यामुळें अेकाद्या जमिनींत काहीं दिवस पीक काढावें आणि तिचा कस कमी झाला कीं, दुसरी जमीन शोधावी असा प्रकार होता.

युरोपीय प्रवाशांना या भौतिक गोष्टींचें आकर्षण वाटत नव्हतें. असल्या गोष्टींची त्यांना संवय होती. हा विस्तृत देश त्यांना निसर्गसुंदर आणि विलक्षण वाटला. परंतु या देशांतील संस्कृति अद्याप प्रांतीयच होती. येथें मानवी वस्तीच्या शेजारींच, ज्याच्या बरोबर दररोज झगडावें लागणार आहे अशा शत्रूसारखा, निसर्ग अुभा आहे असें त्यांना आढळलें. येथील जनतेचा जोम आणि मृदु स्वभाव व अेकंदर जीवनक्रम यांविषयीं त्यांना आकर्षण वाटलें.

हेक्टर सेंट जॉन डी क्रेव्हेकौर नांवाचा अेक सुसंस्कृत फ्रेंच १७५९ मध्यें न्यू यॉर्कला आला व वीस वर्षें तेथें राहिला. त्यानें आपले अनुभव लिहून ठेविले आहेत.

तो म्हणतो :–

"ज्यांच्यासाठीं आम्ही कष्ट करतों, अुपासमार सहन करतों आणि रक्त सांडण्यास तयार होतों, तसे राजे येथें नाहींत. येथील माणसाला पूर्ण

स्वातंत्र्य आहे. हा नवीन माणूस –अमेरिकन– आहे तरी कोण? अमेरिकेंतील माणूस स्वत: युरोपांतून आलेला असतो किंवा युरोपांतून आलेल्या माणसाचा वंशज असतो. यामुळें अितरत्र न आढळणारें रक्ताचें विलक्षण मिश्रण येथें आढळतें. मला माहीत असलेल्या अेका कुटुंबांतील प्रमुखाचा बाप अिंग्रज होता आणि त्याची बायको डच होती. कुटुंब प्रमुखानें अेका फ्रेंच स्त्रिशीं लग्न केलें होतें आणि आतां त्याच्या चार मुलांनीं भिन्न राष्ट्रांतील स्त्रियांशीं विवाह केले आहेत. येथें भिन्न राष्ट्रांतील जनतेचें दृढ अैक्य होअून अेक नवीन वंश तयार होत आहे. या लोकांच्या श्रमानें भविष्यकाळांत मोठे महत्वाचे जागतिक फेरबदल घडून येतील. अमेरिकन हा अेक नव मानव आहे. त्याचे व्यवहार निराळ्याच तत्वावर चालतात. साहजिकच अमेरिकनांच्या कल्पना आणि मतें भिन्न आहेत, नवीन आहेत."

मोठे अुत्साही शब्द आहेत हे. पण सर्वांनीं मोठ्या औत्सुक्यानें निरीक्षण करावें असा प्रयोग अमेरिकेंत चालू होता याबाबतींत तरी, सर्व युरोपीय प्रवाशांचें अेकमत होतें. तेव्हा हीं नवी तत्त्वें कोणतीं आणि त्या प्रयोगाचें स्वरूप तरी काय होतें हें पाहणें जरूर आहे.

मुद्दाम प्रयत्न न करतांहि, धर्म ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे या तत्त्वाची स्थापना वसाहतींत झाली. पेन्सिल्व्हानियाची स्थापना अेका क्वेकरनें केल्यामुळें, क्वेकर पंथीयांनीं अमेरिकेंत येअू नये असें म्हणणें शक्यच नव्हतें. कॅथॉलिक पंथीयांनीं मेरी लँड वसाहत वसविण्यांत पुढाकार घेतला होता, मग कॅथॉलिक पंथीयांना अमेरिकेंत बंदी कशी होणार? फिलाडेल्फिया, न्यू पोर्ट व अितरत्र ज्यूंनीं अेकदां वस्ती केल्यानंतर ज्यूंनीं येअू नये असें म्हणणें चुकीचेंच ठरणार होतें. प्रॉटेस्टंट पंथीयांच्या प्रयत्नानें न्यू अिंग्लंड वसाहतींचा जन्म झाल्यावर प्रॉटेस्टंट पंथीयांना विरोधणार कोण?

आतां, कांहीं वसाहतींत कॅथॉलिक पंथीयांवर निर्बंध होते ही गोष्ट खरी. पण त्यांच्या धार्मिक श्रध्देबद्दल त्यांना छळ सोसावा लागत नव्हता. त्याबरोबर हीहि गोष्ट सत्य आहे कीं, न्यू अिंग्लंडमधील प्युरिटन पंथीयांनीं अेका सत्ताधारी चर्चची स्थापना केली होती आणि त्यांच्याशीं सहमत नसलेल्यांना त्यांनीं हाकलून दिलें होतें. पण हा प्रकार देशाच्या विस्तारामुळें टिकला नाहीं. अेकाद्या गांवांतून हांकलून देअून अेकाद्याला त्रास देणें शक्य होतें. पण शंभर दोनशें मैलांच्या अंतरावरच दुसरी जमीन मिळवून वस्ती करणें व आपल्या मनाप्रमाणें अीश्वरपूजन करणें अशक्य नव्हतें. ऱ्होड आयलंड वसाहतीचा संस्थापक रॉजर विल्यम्स याच्या बाबतींत असेंच घडलें. धार्मिक मतां-बद्दल मॅसॅच्यूसेटस् वसाहतींतून हांकलून लावल्यावर, सर्व मतांच्या लोकांना

सुखासमाधानानें नांदतां येईल अशी वसाहत त्यानें वसविली आणि अेकदां त्याला वसाहतीची सनद मिळाल्यावर मॅसॅच्यूसेटस्‌चे लोक त्याचें कांहींहि वांकडें करूं शकले नाहींत. या अुदाहरणाचें अितरत्र अनुकरण झालें. त्या विस्तीर्ण भूमीवर सर्व मतांतरांच्या अभिमान्यांना पुरेशी जागा होती. यामुळें शेजारीं राहून सर्वांनींच आपली अुन्नति करून घेतली.

धार्मिक समानतेप्रमाणेंच, अेकाद्याचें कूळ आणि मूळ ही वैयक्तिक बाब ठरली. अेकाच राष्ट्रांतील लोकांनीं सर्व वसाहत केली असती तर, कदाचित निराळा प्रकार घडला असता. पण झाला प्रकार निराळाच होता. जमीन मानवी वस्तीसाठीं वखवखलेली होती आणि सर्व ठिकाणांहून लोक आले. अमेरिकेंत येणारा माणूस पूर्वी कोणत्या दर्जाचा होता याची चौकशी कोणीच केली नाहीं. तेथें जरुरी होती नवीन वसाहत करण्यासाठीं लागणाऱ्या सामर्थ्याची. निळ्या डोळ्यांचा माणूस, काळ्या डोळ्यांचा माणूस, तांबड्या केसांचा अथवा पिवळ्या केसांचा माणूस, हॅम्बुर्गचा ज्यू, कॉर्क निवासी आयरिश, वेल्समधील खाणमजूर, ब्रिस्टोलचा चांभार – अशा सर्वांनाच तेथें वाव होता, कोणालाहि मज्जाव नव्हता. कोणत्याहि वंशांतील कोणत्याहि माणसाला तेथें संधि होती.

या सर्व गोष्टींना अपवाद होता तो नीग्रो गुलामांचा. परंतु या प्रश्नांची योग्य वेळीं दखल घेण्यांत येईल.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, वसाहतींतील लोकांना लोकशाही राज्यपद्धतीचा भरपूर अनुभव होता. आणि अमेरिकन भूभागाचा आकार आणि विशिष्ट गुण यांच्यामुळें ही गोष्ट अपरिहार्यच होती. दुसऱ्याहि कांहीं गोष्टी होत्या.

अिंग्लंडमध्यें राहिलें असतां मिळणारे हक्क, जेम्सटाअून आणि प्लायमाअुथ येथील पहिल्या वसाहतवाल्यांनीं अिंग्लिश प्रजाजन म्हणून अमेरिकेंत आणले. आणि अिंग्लिश राज्यपद्धतीचें ज्ञानहि त्यांनीं आपल्याबरोबर आणलें. ही राज्यपध्दति म्हणजे जुलमी अथवा अनियंत्रित राजेशाही नव्हती. जनतेनें निवडून दिलेल्या हाअूस ऑफ कॉमन्सच्या सभासदांमार्फत देशाचा राज्यकारभार चालविण्याची ही राज्यपध्दति होती. पार्लमेंटच्या अिंग्लिश कल्पनेवरून निरनिराळ्या वसाहतींतील असेंब्ली अुद्‌भवल्या. अेका दृष्टीनें त्या असेंब्ली म्हणजे स्थानिक छोटीं पार्लमेंटेंच होत्या. त्यांना अिंग्लिश पार्लमेंटअेवढे अधिकार नव्हते. परंतु अेकाद्या प्रश्नाची चर्चा करणें, निर्णय घेणें, कोणत्या गोष्टी कराव्या आणि कोणत्या टाळाव्या या गोष्टी स्थानिक असेंब्लींनीं जनतेला शिकविल्या. कांहीं असेंब्ली

खंबीर होत्या, कांहीं कमकुवत होत्या. परंतु राजाच्या मालकीच्या वसाहतींतहि, पुष्कळशा गव्हर्नरांना अनुभव आल्याप्रमाणें, असेंब्ली प्रतिकूल असेल तर गव्हर्नरची परिस्थिति बिकट होअी.

पण अेवढ्यावरच भागलें नाहीं. न्यू अिंग्लंडमध्यें गांव हें स्थानिक घटक असे. तेथें ग्रामसभेची रूढी फार जुनी होती. या ग्रामसभेंत स्थानिक अधिकारी निवडणें आणि स्थानिक प्रश्नांचा विचार करण्याकरितां गांवांतील लोक अेकत्र जमत. ग्रामसभेंत आपला आवाज अुठविण्याला प्रत्येकाला वाव होता. अुदाहरणार्थ मॅसॅच्यूसेटस् वसाहतींत सुरवातीच्या काळांत स्वतंत्र रहिवासी (फ्रीमन) नसलेल्याला महत्त्वाच्या कामांत भाग घेतां येत नसे. परंतु अशा लोकांनाहि, अधिकारी निवडतांना मत देणें, पंच म्हणून काम करणें, सैन्यांत अधिकारी होणें आणि आपल्या तक्रारींची न्यायालयांत दाद मागणें असे हक्क मिळत. चार्लस अेम. अँड्र्यूज हा अितिहासकार म्हणतो, "१६५२ पूर्वी जेव्हां मॅसॅच्यूसेटस् वसाहतीनें स्वतंत्र लोकसत्ताकाची घोषणा केली तेव्हां, अेकनिष्ठ राहण्याची शपथ घेतलेल्या प्रत्येक वयांत आलेल्या रहिवाशाचा स्थानिक किंवा सर्वसामान्य शासनव्यवस्थेंत कांहींतरी भाग होताच." सर्व वसाहतींत अेकच राज्यपध्दति मात्र नव्हती. तीस वर्षांची अेक पिढी हें प्रमाण धरल्यास, १६५२ पासून अमेरिकन राज्यक्रांतीचा अुठाव होअीपर्यंत मॅसॅच्यूसेटस्च्या चार पिढ्यांना राज्यकारभारांत भाग घेण्याची संवय होती असें आढळतें.

दुसरा प्रश्न सरहद्दींचा आणि सरहद्दीवर राहणाऱ्या दहा लाख लोकांचा. ते लोक वसाहतींचे गव्हर्नर व असेंब्ली यांच्यापासून दूर होते. अिंग्लिश सत्ता तर अधिकच दूर होती. जीवनमरणाच्या झगड्यांत गुंतलेल्या त्या लोकांना, आपला कारभार स्वतःच चालवावा लागे. कारण दुसरे कोणीहि त्यांचा कारभार चालविणें शक्य नव्हतें. अिंग्लंडचा राजा त्यांच्यासाठीं जंगलें साफ करणार नव्हता कीं, व्हर्जीनियाचा गव्हर्नर त्यांचें धान्य पिकवणार नव्हता. या गोष्टी ज्याच्या त्यालाच कराव्या लागल्या. आणि शेजारीं नवीन लोक येअून राहिले तर त्यांच्याशीं जुळवूनहि घ्यावें लागत होतें. रेड अिंडियन लोकांच्या हल्ल्यापासून बचाव करण्याकरितां ओंडक्यांची तटबंदी अुभारण्यासारखी अेकमेकांच्या संरक्षणाची व्यवस्थाहि सर्वांनाच करावी लागे. प्रार्थनेचें चर्च बांधण्यासाठींहि सर्वांनाच हातभार लावावा लागे. अेकाद्या माणसानें चोरी केली, खून केला किंवा आणखी कांहीं त्रास दिला तर, त्याला शिक्षा करण्याचें कामहि सर्व जनतेलाच करावें लागे. गांवाचा अध्यक्ष, वस्तीचा प्रमुख

आणि रेड अिंडियन लोकांबरोबर लढण्यासाठीं सैन्याधिकारी हवा असेल तर, सर्वांनीं अेकत्र जमावें व या अधिकाऱ्यांची निवड करावी असा प्रकार असे. मूळ यात्रेकरूंनीं ज्याप्रमाणें आपला गव्हर्नर निवडला तसाच हा प्रकार होता.

कांहीं काळानंतर कांहीं ठिकाणीं अर्थातच व्यवस्थित न्यायव्यवस्था व राज्यपध्दति निर्माण होअी. तरीसुध्दां वसाहतींतल्या लोकांना राज्यकारभारांत अधिकार राहिला. कारण परकी लोकांना त्यांच्या विशिष्ट प्रश्नांची अुकल करणें कठीण होतें. सरहद्दीच्या लोकांच्या म्हणण्याप्रमाणेंच बहुधा कृति घडून येअी. अुदाहरणार्थ, पेन्सिल्व्हानियाच्या सरहद्दीवरील १५,००० अेकर जमीन नवीन आलेल्या स्कॉच व आयरिश लोकांनीं १७३० मध्यें जबरदस्तीनें बळकावली. वास्तविक ही सर्व जमीन वसाहतीच्या वहिवाटदारांच्या मालकीची होती. पण नवीन आलेल्या लोकांनीं सांगितलें कीं, अनेक ख्रिश्चनांची जमीन कसण्याची अिच्छा असतांना अेवढी जमीन ओसाड पडून राहावी हें अीश्वरी कायद्याच्या विरुद्ध आहे. नॉर्थ कॅरोलिनांतील सरहद्दीवरच्या लोकांनीं तर, वसाहतींतील सरकारविरुध्द त्यांच्या कांहीं तक्रारी होत्या त्या दूर करण्यासाठीं १७७० सालीं अुघड बंड केलें आणि १७७१ मध्यें सरकारी सैन्याबरोबर हातघाअीची लढाअी केली. सरहद्दीवरच्या लोकांना हुद्देदार आणि श्रीमंत लोकांविषयीं कांहींच आदर नव्हता; काटक प्रतिकारापुढेंच ते नमत असत, स्वतः म्हणू त्याप्रमाणेंच झालें पाहिजे असा ते हेका चालवीत; आणि या हक्कासाठीं दोन हात करण्याला नेहमींच ते तयार असत.

१७७० च्या सुमारास वसाहतींची अशी परिस्थिति होती. मानवी जीवनाचा अेक महान प्रयोग तेथें चालू होता. तेराहि वसाहतींत अेकच भाषा बोलली जात होती पण अजून हृदयाचें अैक्य झालेलें नव्हतें. अेकराष्ट्रीयत्वाची कल्पना अद्याप अुद्‌भवलेली नव्हती. त्यांच्यांत वर्ग आणि भेदभाव होते. तेथें श्रीमंत होते, तसेंच गरीबही होते. परंतु श्रीमंतांची श्रीमंती नजीकच्या काळांतूनच आलेली होती आणि गरिबांना दारिद्र्यांत राहण्याची अिच्छा नव्हती. यूरोप आणि ब्रिटनमधील समाज स्थिर आणि न बदलणारे होते; पण अमेरिकेंत कोणत्याहि माणसाच्या जीवनांत कांहींहि फेरबदल घडून येणें अशक्य नव्हतें. सरहद्दीवरच्या लोकांजवळ बोस्टनच्या व्यापाऱ्यांसारखा फारसा पैसा आणि मालमत्ता नसेल, पण तो साधासुधा माणूस व्यापाऱ्यापेक्षां स्वतःला कमी लेखीत नव्हता. न्यू अिंग्लंडचा शेतकरी आपल्या हक्कांच्या वल्गना करीत नसे.

परंतु आपले कांहीं अधिकार आहेत याची त्याला जाणीव असे आणि त्या हक्कांचें रक्षण करण्याची त्याची अिच्छा असे. व्हर्जीनियांतील लोकप्रतिनिधिसभेच्या सदस्याला सर्वांना मतदानाचा अधिकार असावा असें वाटत नव्हतें. परंतु प्रातिनिधिक राज्यपध्दतीवर त्याची श्रध्दा होती. बोस्टनच्या व्यापाऱ्यांना लोकशाही हा शब्द कटु वाटे, पण अनियंत्रित सत्तेला विरोध करण्याची त्यांना जाणीव होती आणि त्याला त्यांची संमतिहि असे. नवीनच अमेरिकेंत आलेला माणूस जरासा रुळला कीं, लगोलग आपल्याला पसंत नसलेल्या गोष्टींवर टीका करण्याअितका आणि आपल्या मताप्रमाणें वागण्याअितका पुरेसा अमेरिकन बनून जाअी. पूर्वी तो कोण होता त्याला महत्व नसे. महत्व होतें तो पुढें काय करणार होता त्याला. मनुष्याला मनुष्य म्हणून वागवला कीं काय होअू शकतें याचा तो अमेरिकन धडा होता — अमेरिकन संधीचा पुरावा होता. अमेरिकनांची या धड्यावर श्रध्दा होती आणि आजहि आहे.

अर्थात् सर्व गोष्टी रेखीव नियम म्हणून कागदावर लिहून ठेवल्या नव्हत्या. अमेरिकन लोक अद्याप चांचपडत होते, धडपडत होते आणि अेकेक दिवस ढकलीत होते. अमेरिकेंत काय होअू शकतें आणि अमेरिका काय करूं शकते याची त्यांच्यापुढें कांहीं अुदाहरणें अर्थातच होतीं. अुदाहरणार्थ, बेंजामिन फ्रँकलिनचें अुदाहरण त्यांच्यापुढें होतें.

फ्रँकलिनचा जन्म बोस्टन शहरीं १७०६ मध्यें झाला. जोशिया फ्रँकलिन मोठा चलाख मुलगा होता. वाचण्यास तो लवकरच शिकला. परंतु बापाला धंद्यांत मदत करण्यासाठीं वयाच्या दहाव्या वर्षींच त्यानें शाळा सोडली. बाराव्या वर्षीं आपला भाअू जेम्स याच्या हाताखालीं छापण्याच्या धंद्यांत तो अुमेदवारी करूं लागला. छापखानेवाला म्हणूनच वयाच्या सतराव्या वर्षीं तो फिलाडेल्फिया शहरीं आला. वयाच्या तेविसाव्या वर्षीं स्वतःचें वृत्तपत्र तो यशस्वीपणें चालवीत होता. यानंतर, त्यानें अनेक अुद्योग केले.

फ्रँकलिननें 'पुअर रिचर्डस अल्मानॅक' नांवाचें अेक पुस्तक लिहून प्रसिध्द केलें. या पुस्तकांत व्यवहारज्ञान, विनोदी व कसदार बोधवचनें भरपूर आहेत. यामुळें लोकांना हें पुस्तक अद्यापहि आवडतें. त्यानें 'लाअिटनिंग रॉड' चा शोध लावला आणि विद्युत्-विज्ञानाचा पाया घातला. फ्रेंच, स्पॅनिश, अिटालियन आणि लॅटिन या भाषा तो स्वतःच शिकला. अमेरिकेंतील छापखान्यांत छापलेली पहिली कादंबरी त्यानें छापली. फिलाडेल्फियांतील पहिलें फिरतें वाचनालय त्यानेंच काढलें.

पहिलें पोलिस दल व आग विझवे दल अुभारण्याचा मान त्याचाच. अुत्तर अमेरिकेचा पोस्टमास्तर जनरल म्हणून त्यानें काम केलें. वसाहतींचा अिंग्लंडमधील अनधिकृत वकील म्हणूनहि तो वावरला. तो मेला तेव्हां युरोपांतील प्रत्येक विद्वानांच्या मंडळाचा तो सभासद होता. मुत्सद्दी, शास्त्रज्ञ, तत्वज्ञ आणि जगांतील अेक लोकप्रिय व्यक्ति म्हणून त्याची कीर्ति झाली.

निरोगी, तगडा, विनोदी, हुशार, निरभिमानी असा हा धडपडणाऱ्या आओीबापांचा छोकरा, अेका पुष्कळ मुलें असलेल्या कुटुंबांत अुशीरां जन्मला आणि जागतिक कीर्ति मिळवूं शकला. तरीसुध्दां, छापखानेवाला बेंजामिन फ्रँकलिन असें म्हणवून घेण्यांतच त्याला अभिमान वाटे. आयुष्याच्या शेवटीं लिहिलेल्या अेका पत्रांत त्यानें निश्चयपूर्वक पुढील मत मांडलें होतें. त्यानें लिहीलें – अीश्वर करो आणि स्वातंत्र्यप्रेम व मानवी हक्कांचें ज्ञान जगांतील सर्व राष्ट्रांत पसरो. म्हणजे अेखादा तत्त्वज्ञ कोठेंहि गेला तरी त्याला 'हा माझा देश आहे' असें म्हणतां येअील.

पत्रांत मांडलेलें विचार प्रत्यक्ष व्यवहारांत अुतरावेत अशी त्याची मनीषा होती. यासाठीं त्यानें सक्त प्रयत्न केला. फ्रँकलिन अत्यंत बुध्दिमान माणूस होता. बुध्दिमान माणसें अितरत्रहि निपजतात. परंतु तत्कालीन अमेरिकेंत या बुध्दिमान माणसाला भरपूर वाव मिळाला, तो स्वतःच्या गुणांवर आणि हिमतीवर मोठा होअूं शकला, यासाठीं कोणा मोठ्याचा आधार आणि कृपा त्याला मिळवावी लागली नाहीं. तंबाखू व अिंडियन धान्याप्रमाणें तो जातिवंत अमेरिकन होता; आणि जगाचा अेक श्रेष्ठ नागरिकही तो बनला.

माणसांचा आणि व्यवहाराचा दीर्घ अनुभव घेतलेल्या सत्तर वर्षांच्या फ्रँकलिनच्या दूरदृष्टीला आगामी संकटाचा धोका दिसला. वसाहतींत फुटीरपणा राहील तर त्या कमकुवत राहतील, अुलट त्यांचें अैक्य झालें तर, त्यांचें सामर्थ्य वाढेल यासाठीं वसाहतींचें अैक्य झालें पाहिजे; असे विचार त्याच्या मनांत येअूं लागले. वसाहती आणि अिंग्लंड यांचें संबंध अधिक समजुतदार असावेत अशी त्याची अिच्छा होती. अैक्याचा पाया त्यानें घातला. अिंग्लंडशीं चांगले संबंध राखण्यासाठीं त्यानें प्रयत्न केले. परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. यासाठीं अमेरिकन राज्यक्रांतीचा स्फोट व्हावा लागला.

राज्यक्रान्ति

अमेरिकन राज्यक्रान्तीकडे आज दृष्टिक्षेप टाकला तर, ती घटना अपरिहार्य होती आणि नव्हतीहि असेंच आढळतें.

असंतोषाचीं कारणें खरीं होती. तरीसुद्धां चातुर्य, चिकाटी आणि दूरदृष्टि वापरली असती तर, असंतोष दूर करणें शक्य होतें. अर्थांत अेवढचानें ही घटना टळली असती असेंहि म्हणतां येणार नाहीं.

मतभेदांचें मूळ फार खोल गेलें होतें. जेम्सटाअून येथें वसाहत स्थापन झाल्यापासून १७० वर्षांच्या काळांत वसाहतींची चांगलीच वाढ झालेली होती. आपल्या स्वतःच्या पायावर अुभे राहणाऱ्या तरुणांसारखी त्यांची स्थिति होती. ब्रिटिश राज्यांत राहावयाचें तर समान हक्क आणि जबाबदारी द्या अशी त्यांची मागणी होती.

पण अिंग्लिश सरकार त्यांना बरोबरीचे भागीदार म्हणून मानावयास तयार नव्हतें. वसाहती म्हणजे जबाबदारी पेलण्याची ताकद न आलेलीं शाळकरी मुलें, अशी अिंग्लिशांची दृष्टि होती. अर्थात् हा समज केवळ अिंग्लिशांपुरताच मर्यादित नव्हता. जगांत सर्वत्र हीच कल्पना प्रचलित होती. मायदेशाच्या फायद्यासाठींच वसाहतींचें अस्तित्व होतें ; आणि या अुद्देशासाठीं जरूर ते कायदे आणि निर्बन्ध लादलेच पाहिजेत अशी समजुत होती.

वसाहतींच्या कारभारासाठीं ब्रिटिश पार्लमेंट कायदे करूं शकत होतें. पण वसाहतींना पार्लमेंटमध्यें प्रतिनिधित्व नव्हतें. ब्रिटिश पार्लमेंट कर बसवूं शकत होतें आणि वसाहतींनीं हे कर द्यावे तरी, नाहींतर बंड करावें अशी परिस्थिति होती.

तरीसुद्धां, वसाहतींना कांहीं स्वायत्त हक्क होते ही गोष्ट स्पष्ट होती. परंतु या हक्कांची व्याप्ति काय होती याची कोणालाच कल्पना नव्हती. वसाहती व ब्रिटिश सरकार यांचें याबाबतींत मतैक्य नव्हतें.

शिवाय, अंतर आणि काळ हे मुद्देहि महत्त्वाचे होते. महासागराच्या अेका किनाऱ्यावर राहणाऱ्या तीस लाख लोकांवर सत्ता चालविणारें पार्लमेंट, मंत्री आणि राजा, महासागराच्या दुसऱ्या किनाऱ्यावर होते. त्यांना जोडूं शकणाऱ्या तारायंत्र, टेलिफोन, विमान किंवा वाफेवर चालणारी बोट यांचें अस्तित्वहि त्या काळीं नव्हतें. अमेरिकेतील घडामोडींची हकीकत

अिंग्लंडमध्यें पोंचण्यास सहा आठवड्यांचा अवधि लागत असे. आणि अमेरिकेंतील घटनेवर चर्चा करून पार्लमेंट निर्णय घेअीपर्यंत तीन ते सहा महिन्यांचा काळ लोटत असे. अिंग्लंडच्या राजानें वसाहतींना अेकदांहि भेट दिलेली नव्हती. त्याच्या मंत्र्यांपैकीं बहुतेकांनीं अमेरिकेंत पाअूल टाकलेलें नव्हतें ; पार्लमेंटच्या सभासदांपैकींहि फारच थोड्यांनीं नव्या जगाचें दर्शन घेतलें होतें; आणि असें असूनहि, ज्या देशाविषयीं त्यांना फारशी माहिती नव्हती त्या देशासाठीं ते कायदे करीत होते आणि निर्णय देत होते.

हा पार्लमेंटचा किंवा राजाचा दोष नव्हता. परिस्थितीच अशी बनत गेली. परंतु अमेरिकन वसाहती आणि दक्षिण अमेरिकेंतील लोकसत्ताक राज्यांनीं शेवटीं आपलें स्वातंत्र्य मिळवलें याचें अेक कारण अंतर हें होतें. महासागराच्या दूरच्या किनाऱ्यावर राहाणाऱ्यांनीं आपल्यावर सत्ता चालवावी याला ते कंटाळून गेले. ज्यांचें अिंग्लिश, स्पॅनिश, पोर्तुगीज – असें स्वरूप केव्हांच नष्ट झालें होतें आणि व्हर्जीनिअन, ब्राझिलियन, कनेक्टिकटर्स, व्हेनेझुअेलन्स – अशा नांवानें वावरूं लागलेल्या लोकांना दूरवरून सत्ता गाजवणाऱ्या डोअीजड राज्यपद्धतीचा अगदीं तिटकारा वाटू लागला. आपल्या देशाच्या कारभारांत त्यांना अधिक लक्ष घालण्याची अिच्छा होती.

स्वातंत्र्य पुकारण्यापूर्वीच्या काळांतील वसाहतींची स्थिति नांगरकी चालू असलेल्या शेतांसारखी किंवा वादळ अुठत असलेल्या समुद्रासारखी होती, किंवा आसन्नप्रसव अशा स्त्रीसारख्या किंवा तारुण्यांत प्रवेश करीत असलेल्या बालकांसारख्या वसाहती होत्या.

कांहीं तरी जन्माला येणार होतें, कांहींतरी घडणार होतें, कसला तरी स्फोट होणार होता, कांहीं बदल घडणार होता – पण प्रत्यक्ष काय होणार होतें तें जाणत्यांनाहि कळत नव्हतें. पण लोकांच्या मनांत खळबळ चालू असल्याचीं चिन्हें मात्र दिसत होतीं.

"मी अमेरिकन आहे. मी स्वतःला स्वतंत्र समजतों. पण स्वातंत्र्य म्हणजे काय ? माझे कांहीं हक्क आहेत. पण कोणते हक्क आणि त्यांची व्याप्ति काय ? मला पसंत नसलेल्या गोष्टी पूर्वीपासून आहेत म्हणून मी सहन कराव्या, कां दुसरा कांहीं मार्ग शोधावा ?" अशाच प्रकारचे विचार अनेक अमेरिकनांच्या मनांत त्या काळीं आले असतील.

१७६३ मध्यें सप्तवार्षिक युद्धाचा शेवट झाल्यापासून ही प्रक्षुब्ध परिस्थिति चालू होती. त्या लढाअींत अिंग्लंडनें अुत्तर अमेरिकेंतील

फ्रेंच सत्तेचा पुरा बीमोड केला होता आणि बराचसा मुलुख अिंग्लंडच्या ताब्यांत आला होता. त्या मुलखाच्या संरक्षणाच्या खर्चाचा बोजा अिंग्लंडला सहन करावा लागणार होता. अिंग्लिश सरकारचें असें रास्त म्हणणें होतें कीं, सप्तवार्षिक युद्धानें फायदा वसहतींचा झाला, तेव्हां त्यांनींहि खर्चाचा कांहीं बोजा अुचलावा.

परंतु अमेरिकन वसाहतींचा याला विरोध होता. युद्धासाठीं त्यांनींहि सैन्य अुभारलें होतें, पैसा खर्च केला होता आणि कर्जाचा बोजा पत्करला होता. हें सर्व अर्थात त्यांनीं खुषीनें केलें होतें. पण ज्या कारभारांत त्यांना समान अधिकार नव्हता त्या साम्राज्यवादी राज्यपद्धतीसाठीं नवे कर देण्याची त्यांची तयारी नव्हती.

यांत प्रत्येक पक्षाकडे थोडाफार न्याय होता. फ्रँकलिनसह दोन्हीं बाजूच्या सर्व विचारी लोकांना अेक गोष्ट स्पष्ट दिसत होती कीं, चालू पद्धति टिकवावयाची असेल तर मायदेश आणि वसाहती यांचे संबंध नव्या भूमिकेवरून राखले पाहिजेत. पुष्कळ काळानंतर, ब्रिटिश राष्ट्रकुटुंब या नात्यानें अशी नवीन भूमिका तयार झालीहि. पण ही गोष्ट फारच अुशीरा घडली. अुद्योगी पण हट्टी असलेला अिंग्लंडचा राजा तिसरा जॉर्ज यानें अनभिज्ञांचा सल्ला घेअून १७६३ मधील परिस्थिति अधिकच बिघडवली.

स्टॅम्प अॅक्टानें राज्यक्रान्तीचा पहिला अिशारा दिला. वसाहतींतून पैसा अुभारण्यासाठीं अिंग्लिश सरकारनें असा कायदा केला कीं वसाहतींतील वृत्तपत्रें, पुस्तिका, परवाने, व्यापारी कागदपत्र, दस्तअैवज वगैरेंवर अर्धा पेन्सपासून ८० शिलिंगांपर्यंतचीं रेव्हिन्यू तिकिटें लावलीं पाहिजेत. तिकिटें न लावणारा शिक्षापात्र ठरविण्यांत आला.

या कायद्यानें मिळणारें अुत्पन्न वसाहतींच्या रक्षणासाठींच वापरावें अशी तरतूद कायद्यांतच असल्यामुळें ब्रिटिश पार्लमेंट व मंत्री यांना स्टॅम्प अॅक्ट न्याय्यच वाटला. परंतु अमेरिकेंत स्टॅम्प अॅक्ट गवताच्या गंजींत टाकलेली ठिणगीच ठरला.

अमेरिकनांच्या दृष्टीनें स्टॅम्प अॅक्ट आवश्यक नव्हता. आपल्या संमतीशिवाय व परक्यांनीं त्यांच्यावर लादलेला हा कर जुलूमजबरदस्तीचा सूचकच आहे असें त्यांना वाटलें.

अमेरिकेंत स्टॅम्प जाळण्यांत आले आणि स्टॅम्प विकणारांना आपला धंदा सोडण्यास जनतेनें भाग पाडलें. सभा भरवून जनतेनें आपला जळजळीत निषेध प्रकट केला. स्टॅम्प अॅक्टाला विरोध करणारीं निवेदनें, अर्ज राजाकडे पाठविण्यांत आले. जनतेनें राजाला कळविलें कीं, "आम्हीं

आपल्याशीं निष्ठावंत आहों. पण अिंग्लिश लोकांसारखे आमचेहि हक्क आहेत. व्यक्तिगत किंवा प्रतिनिधीद्वारा जनतेनें संमति दिल्याखेरीज कोणताहि कर लादतां येणार नाहीं असा अिंग्लिश जनतेचा हक्क आहे. स्टॅम्प ॲक्टाला आम्हीं संमति दिलेली नाहीं."

स्टॅम्प ॲक्ट रद्द करण्यांत आला आणि जनतेला आनंद झाला. परंतु यामुळें कांहींच निकाल लागला नाहीं. स्वातंत्र्याबाबत आतां निराळाच सूर निघूं लागला होता.

साअूथ कॅरोलिनाचा क्रिस्टोफर गॅडस्डेन यानें म्हटलें, "नैसर्गिक हक्कांच्या विस्तृत सामान्य भूमिकेवर आपण आतां अेकत्र आलें पाहिजे. . . न्यू अिंग्लंडचा रहिवासी किंवा न्यू यॉर्कवासी असा भेद या खंडांत राहतां कामा नये. आपण सर्वच जण अमेरिकन आहों."

"अितर जगापासून विलग असलेले आणि समान हक्क, हितसंबंध आणि धोके या बंधनांनीं अेकत्र बांधलेले असे स्वतंत्र ख्रिश्चन आपण आहों. या वसाहतींचें स्वातंत्र्य टिकलें तर आणखी काय पाहिजे ? " असें पेन्सिल्व्हानियांतील जॉन डिकिन्सन गरजला.

व्हर्जीनियाचा पॅट्रिक हेन्री यानें बजावलें कीं, "श्रृंखला आणि गुलामगिरी पत्करण्याअितका जीव तुम्हाला प्रिय आहे काय ? स्वातंत्र्याची किंमत देअून मिळविण्याअितकी शांतता सुखावह आहे काय ? अीश्वर करो नि या कल्पनांचा नायनाट होवो. अितर लोक कोणता मार्ग पत्करतील तें मला माहित नाहीं ; पण स्वातंत्र्य नसेल तर मी मरण पत्करीन."

स्वातंत्र्य! मोठा सामर्थ्यवान शब्द आहे हा. माणसाच्या अगदीं हृदयाला भिडतो तो. प्रांरभीं अगदीं वाऱ्याच्या छोट्याशा झुळकेसारख्या असलेल्या या शब्दांतून, पुढें मोठें वादळ अुठतें. स्वातंत्र्याचा वारा बोस्टनच्या वांकड्यातिकड्या रस्त्यांत, पेन्सिल्व्हानियांतील शिवारांत आणि व्हर्जीनियांतील डोंगरांत वाहूं लागला होता. सरहद्दीवरच्या झोपड्यांतून शब्द अुठला, "आम्हीं स्वातंत्र्याच्या रक्षणासाठीं खडे आहों". गुप्तपणें कवाअीत करून संचलन करीत असलेल्या लोकांच्या ढोलांतून आवाज निघाला. "स्वातंत्र्यप्रेमी जनहो, अैक्य करा !" स्वातंत्र्याची भरती वाढत होती. आणि स्वातंत्र्याचा वारा फोंफावत होता. पडघमवर टिपरी पडली होती आणि जुना काळ मागें लोटला जात होता, भविष्याचें स्वागत होत होतें.

तीन हजार मैलांवरील अिंग्लंडमध्यें अुद्योगी आणि हट्टी राजाच्या आणि त्याच्या बदलत्या मंत्र्यांच्या कानांत मात्र स्वातंत्र्याची ललकार

शिरत नव्हती. ते गोंधळले; अस्वस्थ झाले; आणि थोडेसे रागावलेहि. "वसाहतींतील मुलांना मोकळे सोडून अुपयोग नाहीं. जरा कडकपणा दाखविला पाहिजे. बोस्टनमध्यें गडबड होत असेल तर तिकडे सैन्य पाठवा. आठव्या हेन्रीचा अेक जुना कायदा परत सुरू करा आणि गडबड करणाऱ्यांना चौकशीसाठीं अिंग्लंडमध्यें आणा. बर्क, पिट अशा थोर अिंग्रजांच्या विरोधाकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. अिंग्लंडचे पंतप्रधान लॉर्ड नॉर्थ म्हणाले, 'तुमची भीति वाटेल तेव्हांच अमेरिका तुमच्यावर प्रेम करील.' कर बसविण्याबाबत आम्ही सवलतीचें धोरण स्विकारूं. अितर कर रद्द करण्यांत येतील आणि चहावर लाक्षणिक कर बसवूं. यामुळें अमेरिकेला चहा पूर्वीपेक्षा स्वस्त मिळेल. पण आम्हीं त्यांच्यावर कर बसवूं शकतों, हें अमेरिकनांना कळलें पाहिजे." अशा प्रकारचा मतप्रवाह अिंग्लंडमध्यें वाहात होता.

अिंग्लंडमधील लोकांना हा सारा पोरखेळच वाटत होता. पण वस्तुस्थिति निराळी होती. आणि पुढें अमेरिकन अितिहासांत अनेक वेळां घडल्याप्रमाणें, याहि वेळेला अमेरिकन जनतेविषयींचा अिंग्लिश सरकारचा अंदाज चुकला. अमेरिकनांना फक्त पैशाचीच किंमत आहे असेंच अिंग्लिश सरकारला वाटलें.

अिंग्लिश सरकारनें चहावर कर बसविला आणि अमेरिकेंत चहा निर्यात करण्यांत आला. चहाचीं जहाजें बोस्टन बंदरांत आल्यावर तेथील लोकांनीं तीं ताब्यांत घेअून, सर्व चहा समुद्रांत फेंकून दिला. हीच ती १६ डिसेंबर १७७३ या दिवशीं झालेली बोस्टन टी पार्टी होय. पाण्यांत वहात जाणाऱ्या चहाबरोबरच शांततामय तडजोडीची शक्यता वाहून गेली.

अिंग्लिश सरकार माघार घेणें अशक्य होतें आणि अमेरिकनांना कळून चुकलें कीं आपण माघार घेणार नाहीं. अिंग्लिश सरकारनें बोस्टन बंदर बंद केलें, मॅसॅच्यूसेटस् वसाहतीची सनद रद्द केली आणि अितर दडपशाही कायदे संमत केले. कॉण्टिनेण्टल कॉंग्रेस भरवून वसाहतींनीं दडपशाहीला अुत्तर दिलें. दिडशें वर्षांपूर्वी जेम्सटाअून येथें लोकप्रतिनिधी अेकत्र आले किंवा १६२० मध्यें मे फ्लॉवर करार करणारे ज्याप्रमाणें अेकत्र जमले, त्याप्रमाणेंच १७७४ सालच्या सप्टेंबर महिन्यांत फिलाडेल्फिया शहरांत नॉर्थ कॅरोलिना आणि जॉर्जियाखेरीज अितर वसाहतींचे प्रत्येकीं ४५ प्रमाणें प्रतिनिधी अेकत्र जमले. आतां सर्व राष्ट्रासाठीं ते जमले ; आणि पूर्वीचाच हुरूप आढळून आला.

संकटप्रसंगीं अेकत्र यावयाचें, चर्चा करावयाची आणि आपले हक्क जाहीर करावयाचे, हक्कांच्या रक्षणासाठीं खंबीरपणें अुभें राहावयाचे– अशाच मार्गानें स्वातंत्र्याच्या आणि हक्कांच्या ललकारीनें मॅग्ना कार्टाच्या काळापासून बराच मार्ग आक्रमण केला होता. ती आगेकूच पुढें चालू राहिलीच पाहिजे.

१९ अेप्रिल १७७५ या दिवशीं सकाळीं मॅसॅच्यूसेटस् वसाहतींतील लेक्सिंग्टन नांवाच्या खेड्यांत, दारूगोळयाचा ताबा घेण्यास आलेल्या ब्रिटिश सैन्याला सशस्त्र अमेरिकन शेतकरी–अमेरिकन मायन्यूट मेन–विरोध करण्यासाठीं सज्ज असलेले आढळले. ब्रिटिश अधिकाऱ्यानें त्या "बंडखोरांना" चालते होण्याचा हुकूम केला. अुलट अमेरिकन सैन्याच्या प्रमुखानें आपल्या सैन्याला जागा न सोडण्याचा आणि शत्रुपक्षानें गोळी झाडल्याखेरीज बंदूक न चालविण्याचा आदेश दिला. यानंतर, गोळागोळी झाली आणि राज्यक्रान्तीचा प्रारंभ झाला.

अिंग्लिश सरकारनें आणखी अेक चूक केली. अमेरिकन लोक युध्दाला तयार होणार नाहींत अशी त्यांची कल्पना होती. पुढील काळांत अितर सरकारांनींहि अशीच चूक केली.

लेक्सिंग्टनला गेलेलें ब्रिटिश सैन्य, बोस्टन येथील तळावर परत आलें. परंतु २७३ ब्रिटिश सैनिक मारले गेले व जखमी झाले. मोहोळांतून अुठलेल्या मधमाशांसारख्या वृध्द नागरिकांनीं अेकच गर्दी केली आणि दगडी भिंताडांच्या पाठीमागून ब्रिटिश सैन्यावर मारा केला. पुढें दोन महिन्यांनीं, १७ जून १७७५ या दिवशीं तीन हजार ब्रिटिश सैनिकांनीं बोस्टन जवळील ब्रीड्स हिल आणि बंकर हिल येथील अमेरिकनांच्या ताब्यांतील टेकडीवर हल्ला केला. टेकडीचा ताबा ब्रिटिशांना मिळाला. परंतु त्यांचे सुमारें अेक हजार सैनिक जखमी झाले अगर मृत्यु पावले. सैनिकी व्यवसायांत अनभिज्ञ आणि अचूक नेमबाज अशा शेतकऱ्यांनीं आणि कारागीरांनीं नवशिक्या सेनापतींच्या नेतृत्वाखालील अुत्तम तयार अशा पायदळाला चांगलीच टक्कर दिली.

अर्थात अशी टक्कर देणें नेहमींच शक्य झालें नाहीं. प्रसंगीं अमेरिकनांना पराजय, नुकसान आणि सर्वस्व नाश सहन करावा लागला. त्यांना अुपासमार सहन करावी लागली, पळ काढावा लागला आणि लपून दिवस काढावे लागले. परंतु अमेरिकनांनी लढण्याचें आपले अेक विशिष्ट तंत्र विकसित केलें. लौकरच, कधींहि न कचरणारा जॉर्ज वॉशिंग्टन त्यांचें नेतृत्व करूं लागला.

अेक वर्षानंतर, ७ जून १७७६ या दिवशीं व्हर्जीनियाचा रिचर्ड हेन्री ली यानीं कॉण्टिनेण्टल काँग्रेसमध्यें असा ठराव मांडला कीं, "या संयुक्त वसाहती स्वतंत्र आहेत आणि हक्क म्हणून त्या स्वतंत्र आणि स्वाधीन राज्यें व्हाव्यात." सुमारें १ महिन्याच्या चर्चेनंतर ठराव संमत झाला आणि ४ जुलै १७७६ या दिवशीं स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्यानें अेका नव्या राष्ट्राच्या जन्माची घोषणा केली.

अमेरिकन संप्रदाय आणि अमेरिकन जीवनक्रम यांची स्वातंत्र्याचा जाहीरनामा ही अेक कोनशिला आहे. प्रत्येक अमेरिकन बालक जाहीरनाम्याचा' शाळेंत अभ्यास करतें; राष्ट्रीय अुत्सवाच्या वेळीं त्यानें जाहीरनाम्याचा अुच्चार अैकलेला असतो आणि त्यांतील शब्दांचा त्याच्या मनावर खोल ठसा अुमटलेला असतो. जाहीरनाम्यांतील गोष्टींनुरूप जगण्याचा अमेरिका कसोशीनें प्रयत्न करते. राष्ट्र या नात्यानें अमेरिकेपुढील ध्येयाचा आविष्कार त्यांत आहे.

या दृष्टीनें लोक आणि सरकार – जनतेनें अेकत्र कसें नांदावें या विषयीं जाहीरनाम्यांत काय म्हटलें आहे तें पाहणें अिष्ट.

अिंग्लंडपासून स्वंतत्र होण्यास कोणतीं विशिष्ट कारणें घडलीं त्यांचा अुल्लेख स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यांत आहे. परंतु जाहीरनाम्याचा गाभा आणि सार दुसऱ्या परिच्छेदांत आहे. तो परिच्छेद असा आहे–

"पुढील गोष्टी स्वयंसिध्द आहेत असें आम्हीं मानतों – सर्व माणसें जन्मतःच समान आहेत. जीवन, स्वातंत्र्य आणि सौख्यप्राप्तीचे प्रयत्न, यांसारखे हिरावून घेतां न येण्यासारखे हक्क मानवाला त्याच्या निर्माणकर्त्यानेंच दिलेले आहेत. या हक्कांच्या निश्चितीसाठीं राज्यें निर्माण करण्यांत येतात आणि प्रजेच्या संमतीनेंच राज्यांना न्याय्य सत्ता मिळते. परंतु अेकादें सरकार या हेतूंना मारक बनतें, तेव्हां तें सरकार बदलण्याचा किंवा रद्द करण्याचा आणि जनतेचें संरक्षण व सौख्य यांना पोषक ठरतील अशा जनतेच्या पसंतीच्या तत्त्वांवर नवें सरकार स्थापण्याचा व त्याच भूमिकेवरून नव्या सरकारची सत्ता संघटित करण्याचा हक्क जनतेच्याच हातीं असतो. दीर्घ काळ प्रस्थापित असलेलें सरकार तात्पुरत्या आणि क्षुल्लक कारणांवरून बदलूं नये हाच समंजसपणा होय. आणि अनुभवहि असाच आहे कीं ज्या पध्दतीची संवय असते ती पध्दति बदलून अनिष्ट गोष्टी दूर करण्यापेक्षां सहन करवेल तितका काळ अनिष्ट गोष्टी सहन करावयाच्या, असाच जनतेचा स्वभाव असतो. परंतु जनतेला अनियंत्रित सत्तेखालीं दडपण्याचा डाव, अन्याय आणि दडपशाहींच्या

दीर्घ परंपरेवरून स्पष्ट होतो तेव्हां असें सरकार अुलथून टाकणें, भविष्यकालीन संरक्षणासाठीं नवीन सरकारची स्थापना करणें हा जनतेचा हक्क असतो, हें जनतेचें कर्तव्य ठरतें. . . ."

हे शद्ब म्हणजे केवळ वसाहतींतील तीस लाख जनतेलाच नव्हे तर, सर्व जनतेलाच आव्हान होतें. आजहि वाचलें असतां स्वातंत्र्येच्छु जनतेला ते आव्हानात्मक आणि हुकूमवजा वाटतात.

यांतच स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचें महत्व आहे. आम्हांला स्वतंत्र व्हावयाचें अेवढेंच म्हणून वसाहती स्वस्थ बसल्या नाहींत. स्वातंत्र्य जाहीर करतांना सर्व माणसें समान आहेत, सर्वांना कांहीं हक्क असतात, या हक्कांच्या संरक्षणासाठीं शासनसंस्था स्थापन होते आणि जनतेच्या संमतीनेंच शासनसंस्थेला सत्ता मिळालेली असते. अेकाद्या राजाच्या किंवा हुकूमशहाच्या अथवा अेकाद्या विशिष्ठ वर्गाच्या अिच्छेंतून शासनसंस्थेची सत्ता निर्माण झालेली नसते. जुलमी व अनियंत्रित राजांना दूर करून, आपल्या पसंतीची राज्यपद्धति चालू करण्याचा जनतेचा हक्क आहे--अशा प्रकारचीं कांहीं तत्वें आणि श्रद्धाविषय त्यानीं नोंदून ठेविले.

या कल्पना अर्थात् अगदीं नव्या होत्या असें नाहीं. हॅरिंग्टन, लॉक, सिडने अशा अिंग्लिश विचारवंतांच्या मनांत त्या कल्पना होत्या, फ्रान्समध्यें त्यावेळीं वाढत असलेल्या नव्या पिढीच्या मनांत त्यांचा आढळ होत होता, परंतु अमेरिकेंत त्या कल्पना, लढत असलेल्या तीस लाख जनतेची लढाअू श्रद्धा म्हणून साध्या शद्बांत व थोडक्यांत प्रथमच मांडण्यांत आल्या. भविष्यकालीन जगतासाठीं सुंदर स्वप्नें अशा स्वरूपांत त्या कल्पना मांडण्यांत आल्या नाहींत तर, स्वयंसिद्ध गोष्टी म्हणून त्यांची नोंद झाली. व्हर्जीनियाच्या थॉमस जेफर्सन या विचारवंतानें त्या कल्पना प्रत्यक्ष कागदावर मांडल्या. परंतु बहुसंख्य अमेरिकनांच्या स्वातंत्र्याच्या आणि स्वायत्त राज्यकारभाराच्या अेकशें सत्तर वर्षांच्या अनुभवांत त्या आकार घेत होत्या. व्हर्जीनियाच्या प्रतिनिधि सभेंत वावरलेल्या जेफर्सननें स्वतःचा कारभार चालवणारी जनता पाहिलेली होती. जेफर्सनचे बोल प्रत्यक्ष अनुभवांतूनच अुद्भवलेले होते. आणि ते शद्ब अजूनहि पुढें प्रभावी होत आहेत. त्या शद्बांप्रमाणें वागण्यांत आम्हीं अनेक वेळां मानवसुलभ चुका केल्या. १७७६ सालाप्रमाणें स्वतंत्र जनतेसाठीं ते शद्बच रास्त आहेत अशी आजची आमची दृढ श्रद्धा आहे आणि कोणतीहि किंमत देअून ही श्रद्धा टिकविण्याची आमची अिच्छा आहे.

जाहीरनामा म्हणजे स्वातंत्र्याची जणूं तुतारीच होती. पण त्यामुळें

राज्यक्रान्ति थांबली नाहीं. स्वातंत्र्ययुद्ध कष्टकारक ठरलें आणि दीर्घ काळ रेंगाळलें. लेक्सिंग्टनच्या लढाअीपासून कालावधि मोजला तर तें सात वर्षें चाललें.

स्वातंत्र्ययुद्ध हें राष्ट्रीय युद्ध होतें, तसेंच ती यादवीहि होती. पुष्कळ अमेरिकनांनीं अगदीं मनापासून ब्रिटिशांची बाजू घेतली. अशा लोकांनीं आपल्याला पटलेल्या गोष्टीसाठीं जरूर तें दुःख सहन केलें. ब्रिटिशांना मदत करणाऱ्या अनेक अमेरिकनांना हद्दपारी पत्करावी लागली आणि अिंग्लंड, कॅनडा व अितर ब्रिटिश वसाहतींत पुन्हां नवें जीवन अुभें करण्याचे कष्ट सोसावे लागले. त्यांचे वंशज नव्या जीवनांत वाढले आणि ब्रिटिश राष्ट्रकुटुंबाचे धैर्यशाली नागरिक बनले.

हा संघर्ष अमेरिकेप्रमाणेंच इंग्लंडमध्येंही होता. पहिल्या पिटपासून चार्लस् जेम्स फॉक्सपर्यंत अनेक नामवंत ब्रिटिश नागरिकांनीं अमेरिकेच्या मागणीला, अिंग्लडवर त्यांचें प्रेम कमीं होतें म्हणून नव्हे तर स्वातंत्र्याचे ते चाहते होते म्हणून, पाठिंबा दिला.

ती स्वातंत्र्याची लढाअी होती, तशीच स्वतंत्र वृत्तीच्या लोकांचीहि होती. फ्रान्समधून लॅफेयेट, रोचम्बो वगैरे अनेक लोक अमेरिकेच्या मदतीला आले. फॉन स्टयूबेन आणि काल्ब जर्मनींतून आले, पोलंड मधून आले कोझिस्को आणि पुलास्कि.

ती श्रद्धांचीहि लढाअी होती. जेसे, लिव्हिंग्स्टन, ली, वगैरे नामवंत आणि श्रीमंत कुटुंबांनीं अमेरिकन बाजू पत्करली. अितरांनीं आपलें बल अिंग्लंडच्या पारड्यांत टाकलें. राज्यक्रान्तीला सुरवात झाली त्या वेळीं जॉर्ज वॉशिंग्टन हा आपल्या मळ्यांची सुधारणा आणि वाढ करण्याची कळकळ असलेला, त्या वेळच्या समजाप्रमाणें, अेक सधन मळेवाला होता. सरहद्दीवर सैनिक व मोजणीदार म्हणून त्यानें काम केलें होतें. परंतु शांतताप्रिय जीवनाचा तो भोक्ता होता. अेकंदरींत स्थितिप्रिय वृत्तीचा तो माणूस होता. अुत्तम कपडे, सभ्य चालिरीति, मित्रांबरोबर पत्ते खेळणें, मनसोक्त शिकार करणें—अशा तऱ्हेच्या जीवनक्रमाचा अेक सन्मान्य आणि सरळ वृत्तीचा सद्‌गृहस्थ म्हणून वावरण्याची त्याला आवड होती. आपल्या शेतांत पिकलेल्या धान्याची, कुत्र्यांची आणि पीक विकून आलेल्या पैशांची व्यवस्थित नोंद ठेवण्याची त्याला हौस होती. पण सात वर्षेंपर्यंत कांहींहि पगार न घेतां अमेरिकन सैन्याच्या सेनापतिपदावर त्यानें काम केलें आणि धडपडत असलेल्या अमेरिकन जनतेचा तो मुख्य आधारस्तंभ बनला. दुष्टावा करणाऱ्या शत्रूंनीं, आपत्तींनीं आणि दांतदुखीनें त्याला हैराण केलें. त्याची निंदा झाली, नालस्ती

झाली. जेर्सीमध्यें कोल्ह्यासारखी त्याची ससेहोलपट झाली. दीनवाण्या परिस्थितींत लढणाऱ्या आपल्या सैन्याबरोबर त्याला थंडी आणि अुपासमार सहन करावी लागली. परंतु वॉशिंग्टन कधींच डगमगला नाहीं, कचरला नाहीं. तो लालचेला बळी पडला नाहीं; त्याला कोणी दहशत घालूं शकलें नाहीं, कीं तो कधीं दमला नाहीं. स्वातंत्र्याच्या अंगीकृत कार्यापासून वॉशिंग्टन कधींही विचलित झाला नाहीं. वॉशिंग्टनप्रमाणेंच, जेर्सी बेटांतून आलेल्या अॅपोलॉस रेव्हॉयरचा मुलगा आणि सोनाराचें, छापखानेवाल्याचें, खोदकाम अित्यादि अनेक कामें करणारा हरहुन्नरी पॉल रेव्हेरे, वेस्ट अिंडीजमध्यें जन्मलेला चलाख तरुण अलेक्झांडर हॅमिल्टन, बोस्टनचा वकील जॉन अॅडॅम्स आणि बोस्टनच्या जनतेंतील जहाल वक्ता सॅम्यूअेल अॅडॅम्स हेहि स्वातंत्र्याच्या कार्यांत अनेक कष्ट भोगूनहि मागें हटले नाहींत. लोक स्वतंत्र झाले पाहिजेत अशी त्यांची श्रद्धा होती आणि त्यासाठीं त्यांनीं आपलें सर्वस्व पणाला लावलें.

स्वातंत्र्ययुद्ध म्हणजे मोठी विचित्र लढाअी होती. व्यक्तिशः ब्रिटिश सैनिक निर्दयपणें वागले असतील. पण, अमेरिकेंतील वरिष्ठ ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांची युद्ध जिंकण्याची अिच्छा होती तरी, अमेरिकन जनतेचा संपूर्ण नायनाट करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला नाहीं. गेज, हॉवेस, बर्गोअिन, कॉर्नवॉलिस या ब्रिटिश लष्करी प्रमुखांची अमेरिकेंतील कृति तिरस्करणीय नाहीं. सन्मान्य सैनिक म्हणूनच ते लढले पण त्यांनीं निव्वळ धाकधपटशा केला नाहीं. दोन्हींहि बाजूंची मोठ्या प्रमाणावर अशी कत्तल झाली नाहीं.

अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध खरोखरच मोठें विचित्र होतें. अिंग्लंडांतील बऱ्याच जनतेला युद्धाविषयीं आपुलकी वाटत नव्हती. लॉर्ड जेफ्री अॅम्हर्स्ट सारख्या नामवंत ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं वसाहतींविरुद्ध लढण्याचें नाकारल्यानें, सैन्य भरतीचें काम थंडावलें. यामुळें ब्रिटिश सरकारनें हेसे-कॅसेलच्या राजाकडून अमेरिकेंत लढण्यासाठीं हेसिअन शेतकऱ्यांना विकत घेतलें. बिचाऱ्या हेसिअन शेतकऱ्यांना आपण कशासाठीं मृत्यूच्या खाअींत अुडी घेत आहोंत याची कांहींच कल्पना नव्हती. हेसिअन लोक परदेशी व भाडोत्री असल्यामुळें अमेरिकन लोक त्यांचा विशेष द्वेष करीत. तरीसुद्धां, युद्धसंपल्यावर सुमारें दहा हजार हेसिअन लोक अमेरिकेंत राहिले. त्यांनीं तेथें विवाह केले, वस्ती केली आणि स्वतःचा जमीनजुमलाहि मिळविला अमेरिकेंत ते स्वतंत्र राहिले. हेसे-कॅसेलमध्यें त्यांना स्वातंत्र्य मिळालें नसतें. अमेरिकेनें त्यांना आपल्यांत सामावून घेतलें आणि तेहि अुत्तम नागरिक बनले.

स्वातंत्र्ययुद्धाची ललकारी अगदीं सामान्यांच्या हृदयाला जाऊन भिडली होती. शिंप्याचा पुस्तिका-लेखक बनलेल्या टॉम पेननें लिहिलें, "स्वातंत्र्य-ज्योतीची प्रभा कांहीं वेळेला दिसली नाहीं तरी, स्वातंत्र्याचा अग्नि कधींच विझणार नाहीं." तसेंच अितर सर्व युद्धाप्रमाणें, युद्धाची कारणें स्पष्टपणें न समजलेल्या अनेकांनीं याहि युद्धांत भाग घेतला.

शेतकरी, कारागीर, कोळी, न्हावी असे सर्वसामान्य लोकच अमेरिकेच्या बाजूनें लढले. लोहाराचा घण टाकून तलवार घेतलेला ग्रीन, शिकारी असलेला मॉर्गन आणि नांगर सोडून बंदूक हातीं घेतलेला वॉशिंग्टन अशाच सेनापतीनीं अमेरिकन सैन्याचें नेतृत्व केलें. डोळ्यादेखत आपल्या घरांची राखरांगोळी आणि शेतांतील पिकांचा नाश होत असतां, शत्रूच्या नांवानें बोटें मोडत, सामान्य जनतेनें अनेक दुःखें शांतपणें सहन केलीं आणि अमेरिकेंतच राहण्याचा निश्चय कायम ठेविला. या युद्धाचा युरोपमध्यें निषेध झाला. परंतु वृत्तपत्रें वाचून किंवा तोंडोतोंडीं अैकून, अमेरिका, वॉशिंग्टन, सर्व माणसें समान आहेत, हे सर्व शद्व युरोपांतील जनतेच्या कानीं पडले आणि त्यांच्यावर त्यांचा परिणामहि झाला.

फ्रान्स आणि फ्रेंच नौदल यांच्या साहाय्यानें शेवटीं अेकदांचें युद्ध संपलें. १९ ऑक्टोबर १७८१ या दिवशीं, व्हर्जीनियांतील यॉर्कटाअून येथें कॉर्नवॉलिसनें शरणागति दिली. प्रास्ताविक शांतता तह ३० नोव्हेंबर १७८२ या दिवशीं झाला आणि ३ सप्टेंबर १७८३ या दिवशीं पक्क्या तहावर सह्या झाल्या.

सामान्य स्त्रीपुरुष, गरीब आणि श्रीमंत, व्यापारी आणि शेतकरी, सर्वांनीं अुठाव केला आणि सात वर्षांच्या लढ्यानंतर अेक राष्ट्र निर्माण केलें.

स्वातंत्र्योत्तर परिस्थिति

राज्यक्रान्तींतून जन्माला आलेलें नव अमेरिकन राष्ट्र कशा प्रकारचें होतें? युरोप तर विस्मयचकित झालें. नवीन राष्ट्र बलहीन होतें. तो अेक अद्याप प्रयोग होता. ती अेक आशा, कल्पनाच होती. कौतुकाची गोष्ट म्हणून त्याकडे पाहिलें जात होतें. राष्ट्र या पदवीला लायक ठरावें अशी त्याची परिस्थिति होती.

देशांतील कांहीं अतिशय सुपीक शेतें अुध्वस्त झालेलीं होतीं. अनेक ठळक व्यक्तींनीं देशत्याग केलेला होता किंवा त्यांना हांकलून देण्यांत आलेले होतें. नुकतेंच जन्माला आलेलें तें राष्ट्र कर्जाच्या ओझ्याखालीं वांकून गेलें होतें. अमेरिकन चलनाची किंमत साफ अुतरलेली होती. व्यापार बसलेला होता. युद्धामुळें अुद्योगधंद्यांचें अुत्पादन बंद पडलेलें होतें. जगांत अमेरिकेची पत अुरलेली नव्हती.

अेवढ्यानेंच दुरवस्था संपली नाहीं. आपसांत पुरेसा समझोता नसलेल्या अशा तेरा राज्यांनीं स्वातंत्र्याचा लढा लढलेला होता. राष्ट्राचा कारभार पाहत असलेली कॉण्टिनेण्टल कॉंग्रेस म्हणजे निव्वळ अेक वादविवाद सभा होती. विजय होअूनहि सैन्याला पगार मिळालेला नव्हता.

सारांश, राष्ट्राची अेकंदर परिस्थिति अशी झालेली होती कीं, थोड्याच वर्षांत त्या राष्ट्राचे, आपसांत भांडणाऱ्या तेरा राष्ट्रांत तुकडे पडावे आणि अेकाद्या बलाढ्य परकी सत्तेच्या अंमलाखालीं तें जावें किंवा देशांत यादवी माजून अंदाधुंदी व्हावी. यांपैकीं कांहींच घडलें नाहीं तर, राष्ट्राचें संरक्षण करण्यासाठीं अेकाद्या राजाची, हुकूमशहाची किंवा समर्थ माणसाची जरुरी वाटावी ; कदाचित युरोपांतील अेकाद्या छोट्याशा राजाला देशाचीं सूत्रें हातांत घेण्यासाठीं बोलाविलें जाअील किंवा अमेरिकन जनता आपल्यांतील अेकाद्या हुकूमशहाच्या हातीं सर्व कारभार देअील.

तरीसुद्धां जन्माला आलेलें नव राष्ट्र हें, ज्याच्यासाठीं सर्व प्रकारच्या माणसांनीं लढा दिला होता, आत्मयज्ञ केला होता, असें अेक आशास्थान होतें, स्वप्न होतें. अमेरिकन जनतेनें आपलें रक्त अुगाचच सांडलेलें नव्हतें.

लाफेयेट, फॉक्स, बर्गोअिन, प्रशियाचा राजा, फ्रान्सचा राजा, अिंग्लंडचा राजा असे सर्वच जण आश्चर्यानें अमेरिकेकडे पहात होते.

सर्वजण आश्चर्य करीत असतां, अमेरिकन राष्ट्राची अुभारणी झाली.

राष्ट्राच्या अिमारतीचा आधार

प्रत्येक राज्यक्रान्ति घडून आल्यानंतर अशी अेक वेळ येतें कीं, जेव्हां सर्वांनीं अेकत्र जमून, घडलेल्या परिस्थितीचा आढावा घेणें आवश्यक ठरतें आणि कोणत्या प्रकारची राज्यपध्दति निर्माण करावयाची याचा निर्णय घ्यावा लागतो. २५ मे १७८७ या दिवशीं, फिलाडेल्फिया शहरांत घटना समितीवरील (कॉन्स्टिटयुशनल कन्व्हेन्शन) प्रतिनिधी अेकत्र जमले तेव्हां, अमेरिकेवर तसा प्रसंग आला.

घटना समितींत पंचावन्न सभासद होते. त्यांपैकीं नअू जणांचा जन्म परदेशांत झालेला होता, अर्थात् अेकाद्या राष्ट्राचें भवितव्य ठरविण्यास पंचावन्न प्रतिनिधी कमीच ठरतात परंतु प्रतिनिधींत वॉशिंग्टन, फ्रँकलिन, मेडिसन, हॅमिल्टन, रॅण्डॉल्फ, मेसन, डिकिन्सन असे निरनिराळ्या राज्यांचे नामवंत नेते होते. कांहीं राजकीय कामगिरीवर फ्रान्समध्यें गेलेला जेफर्सन फक्त हजर नव्हता.

घटना समितींतील सभासदांच्या वयाची सरासरी बेचाळीस होती. या दृष्टीनें ते अगदीं वृध्द नव्हते कीं अगदीं तरुण नव्हते. युध्दांत आणि क्रान्तींत ज्यांची कसोटी लागली होती अशीं तीं अनुभवीं माणसें होतीं. आपल्या मुलाबाळांना स्वातंत्र्यांत जगतां येअील अशी कार्यसुलभ राज्यपध्दति निर्माण करण्याची त्यांची अिच्छा होती.

अनेक मुद्यांचा प्रतिनिधींनीं समितींत खल केला. लहान राज्यांना मोठ्या राज्यांचा हेवा वाटत होता. मालमत्तावाल्यांना आपल्या मालमत्तेचें संरक्षण करण्याची अिच्छा होती. कर्जबाजारी झालेल्यांना वाटत होतें कीं, चटकन पैसा मिळावा. राज्यांच्या हक्कांच्या कट्टर पुरस्कर्त्यांना राष्ट्रसंघ (कॉन्फिडरेशन) हवा होता, संघराज्य (फेडरेशन) नको होतें. तथापि घटना तयार करून त्यांनी यश मिळविलें.

राज्यघटनेचा पहिला अुद्देश असा लिहिण्यांत आला कीं, 'अधिक पूर्णत्वानें अैक्य साधणें.' हा अुद्देश सफल करण्यासाठीं काय केलें बरें ?

प्रतिनिधि सभा (हाअूस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज्) आणि सीनेट या दोन सभागृहांची मिळून बनलेली कॉंग्रेस, अेक राष्ट्राध्यक्ष (प्रेसिडेण्ट) आणि अेक सर्वोच्च न्यायालय (सुप्रीम कोर्ट) असे घटक असलेली राज्यपध्दति घटना समितीनें निर्माण केली.

जनतेच्या सर्वसाधारण कल्याणासाठीं काँग्रेसनें कायदे संमत करावें, राष्ट्राध्यक्षानें ते कायदे अंमलांत आणावे आणि सर्वोच्च न्यायालयानें, कायद्याच्या विवाद्य मुद्यांवर निर्णय द्यावा अशी ही पध्दति होती.

काँग्रेसची बैठक वर्षांतून अेकदां भरवावी, आणि काँग्रेसमध्यें चर्चा करून कायदे संमत करण्यांत यावेत असें ठरविण्यांत आलें. काँग्रेसची बैठक भरविणें, बरखास्त करणें किंवा काँग्रेस रद्द करणें हे अधिकार राष्ट्राध्यक्षाच्या हातीं ठेवण्यांत आले नाहींत. राष्ट्राध्यक्षाची अिच्छा असो वा नसो काँग्रेसची बैठक भरलीच पाहिजे.

सर्व सत्ता जनताधिष्ठित असते या तत्वाला मान्यता देण्यांत आली. काँग्रेसला विस्तृत अधिकार मिळाले. या अधिकारांची घटनेंत नोंद करण्यांत आली. युद्ध पुकारणें, सैन्य अुभारणें आणि ठेवणें, कर बसविणें, व्यापार नियंत्रित करणें, कर्ज घेणें, वगैरे अधिकार काँग्रेसला देण्यांत आले.

सर्व सत्तेचा अुगम जनतेपासून होतो हें बरोबर. परंतु अमेरिकेंत तेरा राज्यें होती. म्हणून काँग्रेसच्या दोन सभागृहांची रचना निरनिराळ्या प्रकारची करण्यांत आली. प्रतिनिधि सभेंतील सभासदांची निवड दोन वर्षांपुरती असावी व लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रत्येक राज्याचे प्रतिनिधि निवडण्यांत यावेत. सर्व पैशांविषयींचे कायदे प्रथम प्रतिनिधि सभेंत मांडावे अशी व्यवस्था करण्यांत आली.

लहान राज्यांच्या हक्कांची जपणूक करण्यासाठीं लहान मोठें असा भेद न करतां सिनेटमध्यें प्रत्येक राज्याला दोन प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क मिळाला. सिनेटची मुदत सहा वर्षें ठरली. कोणताहि कायदा राष्ट्राध्यक्षाकडे पाठविण्यापूर्वीं सिनेट व प्रतिनिधि सभा या दोन्हीं सभागृहांत संमत झाला पाहिजे अशीहि तरतूद करण्यांत आली.

राष्ट्राध्यक्षाची मुदत चार वर्षांपुरती ठरवून, त्याला विस्तृत अधिकार देण्यांत आले. लष्कराचें आणि आरमाराचें सेनापतिपद आणि कायद्यांची अंमलबजावणी त्याच्या हातीं देण्यांत आली. काँग्रेसनें संमत केलेला अेकादा कायदा राष्ट्राध्यक्षाला पसंत नसेल तर, त्या कायद्याला संमति नाकारण्याचा अधिकारहि राष्ट्राध्यक्षाला मिळाला. पण राष्ट्राध्यक्षाच्या नकारानंतरहि दोन्हीं सभागृहांच्या दोन-तृतियांश सभासदांनीं तो कायदा पुन्हां संमत केला तर, राष्ट्राध्यक्षाचा नकार असूनहि तो कायदा कायदेशीर राहील अशी तरतूद करण्यांत आली.

राष्ट्राध्यक्षाला तह करण्याचाहि अधिकार मिळाला परंतु यासाठीं सीनेटमधील दोन-तृतियांश सभासदांची संमति त्यानें घेतली पाहिजे अशी

अट ठेवण्यांत आली. सिनेटच्या सल्ल्यानें आणि संमतीनें परदेशांत वकील नेमणें, सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांची नेमणूक करणें व राज्यकारभारांतील अितर अधिकारी नेमणें हे अधिकारहि राष्ट्राध्यक्षाला मिळाले.

अमेरिकेंतील न्यायाचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाकडे देण्यांत आले. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांची नेमणूक त्याची वागणूक नीट असेपर्यंत ठरली ; निश्चित मुदत ठेवण्यांत आली नाहीं. कॉंग्रेसच्या कायद्याबाबत अंतिम निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाकडे सोपविण्याची लोकसत्ताकाच्या संस्थापकांची अिच्छा होती कीं नाहीं हा विवाद्य मुद्दा आहे. परंतु असा अधिकार न्यायालयांनीं वापरलेला आहे आणि त्याला सर्वांनी मान्यता दिलेली आहे. सर्वोच्च न्यायालयानें, कॉंग्रेसनें संमत केलेला अेकादा कायदा घटनाविरोधी ठरविला तर तो कायदा रद्द ठरावा असेंहि ठरलें. परंतु पुढें सर्वोच्च न्यायालयाचे नंतर येणारे न्यायाधीश तोच कायदा घटनेशीं सुसंगत ठरवूं शकले. निदान अेकदां तरी असें अुदाहरण घडलें. सर्वोच्च न्यायालयाला अशी मोकळीक राहिली. व्यवहारांत कायद्याचे संरक्षक आणि अुतावळ्या कायद्यांना लगाम घालणारें सर्वोच्च न्यायालय अुपयुक्त ठरतें. ज्यू म्हणून ज्यूंचा छळ करावा असें सांगणारा कायदा अद्यापपर्यंतच्या कोणत्याहि कालांतील सर्वोच्च न्यायालयानें कायदेशीर ठरविलेला नाहीं. कारण कॉंग्रेसनें जरी असा कायदा संमत केला तरी, घटनेच्या पहिल्या दुरुस्तीनें तो घटनाबाह्य ठरूं शकतो.

ही सर्व पध्दति गुंतागुंतीची वाटते. पण या पध्दतींत कार्यसुलभता व लवचिकपणा आहे. समतोलपणा राखणारी आणि आवर घालणारी असें या पध्दतीचें रास्त वर्णन करण्यांत येतें. राज्यपध्दतीच्या कोणत्याच अंगाच्या हातीं संपूर्ण आणि अनियंत्रित अधिकार नाहींत. राष्ट्राच्या कारभाराचा गाडा चालू ठेवण्यास कायदे करणारें, कारभार करणारें आणि न्याय देणारें अशीं तीनहि अंगें हातभार लावतात.

सर्व सत्तेचा अुदय जनतेपासून होतो ही गोष्ट संस्थापकांनीं ओळखली. म्हणूनच जनतेचें प्रतिनिधित्व करणारें सभासद असलेली कॉंग्रेस (आतां दोन्हीहि सभासदांच्या बाबतींत) त्यांनीं निर्माण केली. परंतु मोठ्या व अधिक लोकसंख्येच्या राज्यांकडून छोट्या राज्यांवर जुलूम होअूं नयें म्हणून, सिनेटमध्यें प्रत्येकीं दोन प्रतिनिधि असें समान प्रतिनिधित्व आणि सिनेटची मुदत प्रतिनिधि सभेच्या मुदतीच्या तिपटीनें त्यांनीं ठेविली. सिनेटमध्यें अधिक मुदत राहणारे व जरा अधिक वयाचे लोक राहतील

आणि प्रतिनिधि सभा व राष्ट्राध्यक्ष यांना ते बंधनकारक राहून कारभारांत समतोलपणा राहील अशी अपेक्षा होती.

कॉंग्रेसच्या मार्फत सर्व राज्यकारभार चालविण्याचा घटना समितींतील प्रतिनिधींना अनुभव असल्यामुळें, राज्याचा प्रमुख बलिष्ठ असावा अशी त्यांची अिच्छा होती. आणि त्यांना हेंहि माहित होतें कीं, समितीच्या मार्फत राष्ट्राचा कारभार चालू शकत नाहीं. म्हणून त्यांनीं राष्ट्राध्यक्षाला विस्तृत अधिकार दिले. हे अधिकार अितके विस्तृत आहेत कीं, युध्दकाळांत अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा जगांतील सर्व राज्यकारभार प्रमुखांत बलिष्ठ असतो. परंतु राष्ट्राध्यक्ष अनियंत्रित जुलूमशहा बनूं नये म्हणून, त्याची निवड दर चार वर्षांनीं करावी, अध्यक्षाच्या नकारानंतरहि कॉंग्रेस कायदा संमत करूं शकेल, आणि अितरहि अनेक तरतुदी करून, त्यांनीं राष्ट्राध्यक्षाची सत्ता मर्यादित केली.

सर्वोच्च न्यायालयाच्या रूपानें वरिष्ठ न्यायसत्ता त्यांनीं निर्माण केली. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे घटनेंत दुरुस्ती करण्याची मोकळीक त्यांनीं ठेविली. पुढील काळांत तींत बदल करण्याची शक्यता राहिली आणि दुरुस्तीची पध्दति कठीण व लांबलचक आहे तरी घटनेंत आतांपर्यंत अेकवीस दुरुस्त्या करण्यांत आल्या आहेत.

घटना समीतीनें ज्यांची तरतूद केली नाहीं अशाहि कांहीं गोष्टी होत्या. परराष्ट्र मंत्री, युध्द मंत्री अित्यादि मंत्री असलेलें मंत्रीमंडळ निर्माण करण्याविषयीं प्रतिनिधींनीं निश्चित स्वरूपाचे आदेश दिले नाहींत. परंतु राज्यकारभाराचीं निरनिराळीं खातीं राहतील व त्या खात्यांचें प्रमुख असतील हें त्यांनीं मान्य केलें होतें. तसेंच राजकीय पक्ष किंवा पक्षपध्दति याविषयीं कांहींच आंखणी करण्यांत आली नाहीं. राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीसाठीं निवडणुकीचा संघ (अिलेक्टोरल कॉलेज) त्यांनीं निर्माण करण्याची तरतूद केली. पण प्रत्यक्ष व्यवहारांत ही तरतूद निष्फळ ठरली. घटनातंत्राच्या दृष्टीनें राष्ट्राध्यक्षाची निवडणूक संघांकडूनच होते. पण व्यवहारांत निवडणुक संघांतील लोक आपल्या पक्षाला बांधलेले असतात आणि आपल्या पक्षाच्या अुमेदवारालाच ते मत देतात. हें जरी खरें असलें तरी, घटना समितींतील प्रतिनिधींनीं ठरविलेली बहुतेक व्यवस्था काळाच्या कसोटीस अुतरली आहे. अर्थात् दोष आहेत पण अेकंदर पध्दति व्यवहारांत कार्यक्षम आहे.

तेरा राज्यांपैकीं किमान नअू राज्यांची तरी घटनेला संमति असणें जरूर होतें. बऱ्याच चर्चेनंतर तशी संमति मिळाली. तरी सुध्दां सर्व लोकांचें समाधान झालें नाहीं.

सरकारची स्थापना झाली तरी सामान्य नागरिकांचे हक्क कोणते हा प्रश्न शिल्लक राहिलाच. १७८९ च्या पावसाळ्यांत न्यू यॉर्क शहरांत पहिल्या झालेल्या कॉंग्रेसच्या बैठकींत मूळ घटनेंत दहा दुरुस्त्या करण्यांत आल्या. या दुरुस्त्या बिल ऑफ राअिटस् म्हणून प्रसिध्द आहेत.

त्या दुरुस्त्या पुढीलप्रमाणें आहेत :–

१ लें कलम

धर्मस्थापना किंवा धर्मपालनाच्या स्वातंत्र्याला बंदी करणारा किंवा भाषणस्वातंत्र्य किंवा वृत्तपत्राचें स्वातंत्र्य, अथवा शांतपणें अेकत्र जमण्याचा जनतेचा हक्क आणि सरकारकडे गाऱ्हाणें दूर करण्यासाठीं अर्ज करण्याचा हक्क, यांचा संकोच करणारा कायदा कॉंग्रेस करणार नाहीं.

२ रें कलम

स्वतंत्र राज्याच्या संरक्षणासाठीं सुव्यवस्थित सैन्याची जरुरी असल्यामुळें, शस्त्रें बाळगण्याच्या आणि वापरण्याच्या जनतेच्या हक्कावर अतिक्रमण केलें जाणार नाहीं.

३ रें कलम

शांतता काळांत, मालकाच्या संमतीवाचून कोणाच्याहि घरांत सैन्याचा तळ ठेवण्यांत येणार नाहीं आणि युध्दकाळांत कायद्यानें ठरवून दिलेल्या पध्दतीखेरीज अितर रीतीनें असा वापर केला जाणार नाहीं.

४ थें कलम

व्यक्तीची, घराची, कागदांची आणि मालमत्तेची अयोग्य झडती किंवा ताबा घेतला न जाण्याचा जनतेचा हक्क अबाधित राहील. शपथेवर किंवा प्रतिज्ञेवर सांगितलेलें संभाव्य कारण दिल्याशिवाय आणि विशेषतः ज्या जागेची झडती घ्यावयाची असेल तिचें वर्णन दिल्याशिवाय, व ज्या माणसांचा अथवा मालाचा ताबा घ्यावयाचा असेल त्यांचें वर्णन दिल्याशिवाय अधिकारपत्र (वॉरंट) काढलें जाणार नाहीं.

५ वें कलम

अुच्च ज्यूरीनें (पंचांनीं) दोषारोप लेखन केल्याखेरिज किंवा आरोप रुजू केल्याखेरीज प्राणघातक किंवा अितर तऱ्हेनें बदनामीकारक गुन्ह्याबद्दल, कोणाहि असमास शिक्षा भोगावी लागणार नाहीं. युध्दकाळांत किंवा सार्वजनिक धोक्याच्या प्रसंगीं प्रत्यक्ष कामगिरीवर असतां भूदलांत किंवा नौदलांत अथवा राखीव लष्करांत अुद्‌भवलेल्या अशा तऱ्हेच्या

खटल्यांना मात्र हा नियम लागू नाहीं. तसेंच अेकाच गुन्ह्याबद्दल अेकाद्या माणसाच्या जिवाला किंवा त्याच्या अेकाद्या अवयवाला दोन वेळां शिक्षा पत्करावी लागणार नाहीं. अेकाद्या फौजदारी खटल्यांत स्वत:विरुध्द साक्ष देण्याची सक्ति कोणावरहि करण्यांत येणार नाहीं. कायद्याच्या योग्य मार्गाखेरीज अन्य तऱ्हेनें जीवन, स्वातंत्र्य किंवा मालमत्ता हीं कोणाही माणसाची काढून घेतली जाणार नाहींत. सार्वजनिक अुपयोगासाठीं खाजगी मालमत्ता घेतांना योग्य भरपाअी दिली जाईल.

६ वें कलम

सर्व फौजदारी खटल्यांत आरोपीला, ज्या राज्यांत आणि ज्या जिल्ह्यांत गुन्हा घडला असेल तेथील नि:पक्षपाती ज्यूरीपुढें आपली चौकशी जलदीनें आणि सार्वजनिक रीत्या होण्याचा हक्क राहील. तसेंच आरोपाचें कारण आणि स्वरूप जाणण्याचाहि आरोपीला हक्क राहील. विरोधी साक्षीदारा-समोर रुजवात होण्याचा, आपल्या बाजूनें साक्षीदार आणण्याचा आणि आपल्या बचावासाठीं वकील देण्याचा हक्कहि त्याला राहील.

७ वें कलम

सामान्य कायद्यानें चालणाऱ्या वीस डॉलरपेक्षां अधिक पैशाच्या खटल्यांत, ज्यूरीपुढें चौकशी चालण्याचा हक्क अबाधित राहील, आणि ज्यूरीनें चौकशी केलेल्या कोणत्याहि गोष्टीची सामान्य कायद्यांतील नियमाबाहेर, अमेरिकेंतील कोणत्याही न्यायालयांत चौकशी होणार नाहीं.

८ वें कलम

अवाढव्य जामीन घेतला जाणार नाहीं, तसेंच अवाढव्य दंडहि केला जाणार नाहीं. क्रूर आणि प्रचलित नसलेली शिक्षाहि देण्यांत येणार नाहीं.

९ वें कलम

कांहीं हक्कांची घटनेमध्यें नोंद करणें याचा अर्थ जनतेच्या अितर हक्कांना नकार देणें किंवा त्याची किंमत कमी लेखणें असा लावला जाणार नाहीं.

१० वें कलम

घटनेनें अमेरिकन राष्ट्राला न दिलेले आणि घटक राज्यांना (स्टेट्सनां) न नाकारलेले अधिकार त्या राज्यांजवळ किंवा लोकांजवळ राहतील.

घटना आणि बिल ऑफ राअिटस् ही अमेरिकन श्रध्देची तिसरी आणि चौथी कोनशिला होय. भाषणस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, छळापासून मुक्तता, ज्यूरीपुढें चौकशी, यांची जनतेला हमी मिळाली.

नवें लोकसत्ताक राज्य

अमेरिकेचा पहिला राष्ट्राध्यक्ष म्हणून जॉर्ज वाशिंग्टन याची शांतता-पूर्वक स्थापना झाल्यावर, अमेरिकन राज्यक्रान्तीची पूर्तता झाली.

अमेरिकन क्रान्ति खरिखुरी क्रान्ति होती. कष्ट, कटुता, धडपड, दीर्घकाळपर्यंत आणि अतिशय तीव्र अशा प्रसूतिवेदना या सर्वांचा क्रान्तिकाळांत अनुभव आला. जुन्या संवयी आणि रूढी पार बदलून गेल्या. परंतु या क्रान्तीनें आपल्या बालकांची आहुती घेतली नाहीं. तसेंच सूड भावनेचे पश्चात दुष्परिणाम घडून आले नाहींत. अमेरिकेंत राहिलेल्या हेसियन लोकांची ससेहोलपट झाली नाहीं कीं, त्यांचा समूळ नाश करण्यांत आला नाहीं. ब्रिटिशांच्या कांहीं पक्षपाती लोकांना कठोरतेनें वागविण्यांत आलें. पण दुसरे परत आले व नवीन राष्ट्राचे नागरिक म्हणून शांततेनें राहूं लागले. रक्तपात झाला नाहीं कीं, शुद्धि करण्यांत आली नाहीं. तीव्र राजकीय तंटे होते. परंतु शस्त्र-शक्तीनें सरकार अुलथून टाकण्याचा गुप्त कट कोणत्याहि लहानशा गटानेंहि केला नाहीं. १७८६ मध्यें झालेलें शेजचें बंड व १७९४ सालचें व्हिस्की बंड असे स्थानिक व छोटेसे अुठाव झाले. परंतु दोन्ही अुठावांचीं कारणें प्रामाणिक व सत्य होतीं. बंड शमविण्यास सरकार समर्थ आहे हें आढळल्याबरोबर बंडाचा मोड झाला, परंतु बंडाबाबत कोणालाहि फांशी देण्यांत आलें नाही. शेज आणि त्याच्या साथीदारांना माफी मिळाली व व्हिस्की बंडाच्या पुढाऱ्यांना राजद्रोहाबद्दल शिक्षा ठोठावण्यांत आल्या परंतु त्यांनाहि राष्ट्राध्यक्षानीं माफी केली.

अशा प्रकारचें धोरण कां ठेवण्यांत आलें ? अितर लोकांपेक्षां अमे-रिकन लोक अधिक सद्गुणी होते म्हणून तर निखालस नव्हे. ते सुदैवी होते अेवढेंच. सुदैवी अशा दृष्टीनें कीं, भिन्न मतांना स्थान मिळेल अशी राज्यपद्धति त्यांनीं तयार केली आणि नव लोकसत्ताकाचे पहिले नेते असलेलीं माणसें अुत्तम होतीं.

अमेरिकन नेते शेवटीं माणसेंच होतीं. त्यांच्या ठिकाणीं दोष होते. त्यांनीं चुका केल्या पण त्यांच्यापैकीं अेकाचीहि अनिर्बंध सत्ता मिळविण्याची अिच्छा नव्हती किंवा त्यांनीं तसा प्रयत्न केला नाहीं. आपल्याबरोबर ज्यांचें पटत नाहीं अशांना ठार मारणें किंवा तुरुंगांत टाकणें हाच राज्य

चालविण्याचा अेकमेव मार्ग होय असें त्यांच्यापैकीं अेकालाहि वाटत नव्हतें.

स्वतंत्र लोकसत्ताकाचें स्वप्न साकार करण्याचें ध्येय त्यांच्यापुढें होतें. आणि अत्यंत कळकळीनें त्या ध्येयानुसार वागण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. क्वचित हा प्रयत्न अुगाचच भपकेबाज होअी, क्वचित हास्यास्पद होअी. प्लूटार्कच्या ग्रंथांत वाचलेल्या रोमन लोकसत्ताकांतील रोमन लोकांप्रमाणें ते स्वतःला समजत. वृत्तपत्रांत पत्र लिहिणारा अेकादा छोटचाशा गांवांतील वकील पत्राखालीं "सिनसिनाटस" किंवा "ब्रूटस ज्यूनिअर" अशी सही करतांना आढळे. प्राचीन रोमन पद्धतीच्या वस्त्रांत अुभारलेला जॉर्ज वाशिंग्टनचा अेक दुर्दैवी पुतळा आढळतो. या गोष्टींचा अुपहास करणें सोपें आहे. अमेरिकेंत येणाऱ्या पाहुण्यांनीं अुपहास केलाहि. पण जेव्हां ते लोक "लोकसत्ताक सद्‌गुण" आणि "लोकसत्ताक साधेपणा" असें म्हणत तेव्हां त्यांच्या मनांत खरोखरच कांहीं तरी अर्थ होता. त्या शब्दांनुसार जगण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. रोमच्या सुरवातीच्या काळापेक्षां अधिक चांगल्या रीतीनें स्वतंत्र लोकसत्ताकाच्या ध्येयानुसार वागण्याचा त्यांनीं प्रयत्न केला.

अमेरिकन लोकसत्ताकाच्या सुरवातीच्या नेत्यांपैकीं कांहींच्या कार्याचा आणि विचारांचा आपण आतां परिचय करून घेअू या.

स्वातंत्र्ययुद्धाचें यश आणि लोकसत्ताकाची यशस्वी स्थापना बऱ्याच प्रमाणांत ज्या व्यक्तीच्या वर्तनावर अवलंबून होती अशी व्यक्ति म्हणून जॉर्ज वॉशिंग्टनला पहिलें स्थान देणें रास्त. अेका दृष्टीनें पाहिलें तर, कडक, अुदात्त, शांत व जरासा अगम्य असा वॉशिंग्टन होता. आपल्या बरोबरीच्या नसलेल्या जनतेंत सहजपणें मिसळून जाण्याची त्याची वृत्ति नव्हती. शरीरानें व मनानेंहि अतिशय कणखर तो होता. परंतु नवनिर्मितीची किंवा तत्वज्ञाची वृत्ति त्याच्यापाशीं नव्हती. स्वभाव रागीट पण राग बहुतेक ताब्यांत ठेवणारा. क्वचित् मात्र रागाचा भडका अुडे. जनतेचें लक्ष खेचून घेणारें आकर्षक वक्तृत्व त्याच्याजवळ नव्हतें. आणि तरीसुद्धां तो थोर होता.

त्याच्यावर पडलेल्या कोणत्याहि ओझ्यानें तो दबून गेला नाहीं. त्यानें स्थापन केलेल्या राष्ट्राकडून त्याला कोणत्याही प्रकारचा सन्मान वा पारितोषिक मिळणें सहज शक्य होतें. पण कांहीं मूर्ख मंडळींनीं आपण नव्या राष्ट्राचें राजा व्हावें अशी पत्र लिहून त्याला सूचना केली, तेव्हां त्यानें ही सूचना नुसती नाकारली अेवढेंच नव्हे तर, अगदीं स्पष्टपणें

भेदक शद्बांत सांगितलें कीं, "तुमच्या स्वत:बद्दल किंवा भावी पिढीबद्दल अथवा माझ्याबद्दल तुम्हांला कांहीं कळकळ असेल, आदर असेल तर, असले विचार तुमच्या मनांतून काढून टाका आणि अशा प्रकारचा भाव माझ्याजवळ पुन्हां व्यक्त करूं नका." त्याला आपल्या घराविषयीं अत्यंत प्रेम होतें. पण स्वातंत्र्ययुद्धाच्या काळांत सहा वर्षेपर्यंत तो घराकडे वळला नाहीं. तो सधन होता तसाच मोठा अुत्तम व्यवस्थापक होता. परंतु स्वातंत्र्यासाठीं स्वत:चें जीवन आणि संपत्ति त्यानें वाहून घेतल्यावर आपल्या डोळ्यांदेखत आपली संपत्ति कमी होत असतां त्यानें अेक चकार शद्ब काढला नाहीं. त्याची महत्वाकांक्षा त्याचा देश आणि देशबांधव यांच्याभोंवतींच गुरफटलेली होती. अनेक वेळा देशबांधवांच्या वृत्तीनें, कमकुवत देशभक्तीनें आणि त्यांच्या अितर गोष्टींनीं मनुष्यसुलभ खिन्नता त्याच्या ठिकाणीं येअी. परंतु मरेपर्यंत देशबांधवांसाठींच तो झटत राहिला. यामुळेंच जनतेनें त्याला शिव्याशाप दिले तरी जनतेचा वॉशिंग्टनवर विश्वासच होता. अत्यंत थोर शीलाचा तो गृहस्थ होता. त्याला जें रास्त वाटलें तें करण्यासाठीं त्यानें कशाचीहि पर्वा केली नाहीं. जनतेनें आपुलकीनें त्याला कांहीं टोपण नांव दिलें अशा तऱ्हेचा माणूस तो नव्हता. पण जेव्हां लोकांनीं त्याला "राष्ट्रपिता" म्हणून संबोधिलें तेव्हां तो शाद्बिक फुलोरा नव्हता तर, साधें अुघड सत्य होतें.

जॉर्ज वॉशिंग्टन हा अमेरिकेचा पहिला अध्यक्ष होता तर जॉन ॲडॅम्स हा दुसरा अध्यक्ष. बुटका, मिथ्याभिमानी, चिकित्सक, स्वतंत्र आणि तिखट वृत्तीचा असा ॲडॅम्स होता. १६३६ मध्यें अिंग्लंडमधून आलेल्या अेका बेकार सुताराचा पणतु व अेका शेतकऱ्याचा मुलगा असलेला ॲडॅम्स व्यवसायानें वकील होता. तारतम्य न ठेवतां बोलण्याचा त्याचा स्वभाव होता. त्याच्या स्वभावांत गोडी नव्हती. त्याच्याजवळ जाणाऱ्याला कांटे बोचण्याचाच संभव असे. पण तो मोठा समर्थ माणूस होता. आणि देशासाठीं स्वार्थत्यागपूर्वक थोर सेवा करण्याची वृत्ति त्याच्याजवळ होती. सेनापतिपदासाठीं वॉशिंग्टन हाच योग्य आहे असें आढळतांच तो स्वत: न्यू अिंग्लंडचा रहिवासी असतांहि व्हर्जीनियाच्या वॉशिंग्टनला सेनापति करण्यासाठीं त्यानें प्रयत्न केला. हिंसक वृत्तीचा क्रांतिकारक तो नव्हता. परंतु "बोस्टन टी पार्टी" ही अत्यंत भव्य घटना होती असें त्याचें मत होतें. त्याची तत्त्वें मोठीं ताठर होतीं. थॉमस जेफर्सनबरोबर तात्त्विक भूमिकेवरून तो भांडला. आपल्या दैनंदिनींत जेफर्सनविषयीं अतिशय कटु व विषपूर्ण अुद्गार त्यानें काढले. पण त्याबरोबरच म्हातारपणीं अितक्या मअूपणें आणि

सहजपणें त्यानें जेफर्सनबरोबर समझोता केला कीं, त्या दोघांतील त्यानंतरचा पत्रव्यवहार म्हणजे, वृद्ध झालेले पण अजून ताकद असलेले दोन देव, मानवां-विषयींच्या क्षुल्लक पण आवश्यक गोष्टींचाच जणूं काय विचारविनिमय करीत आहेत, असा आढळतो. व्यवसायानें वकील असलेल्या आणि दर्यावर्दी जीवनाचा अनुभव नसलेल्या ॲडॅम्सनें अमेरिकन नौदलाची स्थापना केली. राष्ट्राध्यक्ष या नात्यानें तो लोकप्रिय नव्हता,पण आपलें कर्तव्य त्यानें मोठ्या कळकळीनें पार पाडलें. जनतेला त्याच्याविषयीं आपुलकी वाटावी अशा गोष्टी त्याच्याजवळ नव्हत्या, अुलट जनता त्याच्याविषयीं आदरपूर्वक संतापच व्यक्त करी. परंतु अमेरिकेंतील तो पहिला राज्यशास्त्रज्ञ होय. त्याच्या खोंचक प्रश्न विचारण्याचा आणि आग्रही वृत्तीचा न्यू अिंग्लंडमधील लोकांत अद्यापहि आढळ होतो.

तिसरा राष्ट्राध्यक्ष व्हर्जीनियाचा थॉमस जेफर्सन. याचें जीवन अेवढें व्यापक होतें कीं, कांहीं शद्वांत तें मांडणें कठीण आहे. अुंच, करड्या डोळ्यांचा आणि भुऱ्या केसांचा जेफर्सन संशोधक, विचारवंत लेखक आणि तत्वज्ञ होता. जनतेची त्याला विशेष कदर होती. अेक नवीन आणि कार्यक्षम नांगर जसा त्यानें बनविला तसाच, स्वातंत्र्याचा जाहीरनामाहि त्यानें तयार केला. त्याच्या काळचा तो अेक अुत्तम शिल्पकार होता. त्याच्या आराखड्यानुसार बांधण्यांत आलेले त्याचें "मॉण्टिसेलो" नांवाचें घर जगांतील अेक कलापूर्ण गृह म्हणून मानलें जातें. नवीन गोष्टींविषयीं, लोकांनीं मनांत आणलें तर ते काय करूं शकतील, असल्या गोष्टींविषयीं त्याला विशेष आवड होती. कलांचाहि तो भोक्ता होता. तो व्हायोलिन वाजवीत असे. खाजगीत आणि समकालीनांच्या विषयीं तो अत्यंत कटुतेनें व अन्यायानें वागे. त्याचें राजकारण तेढें असें. क्वचित् त्याची वागणूक कपटाचीहि असे. परंतु तो अमेरिकेंतील लोकशाहीचा पहिला कट्टर पुरस्कर्ता होय. दीर्घ आयुष्यांत त्याचा जनतेवरील विश्वास कधींच ढळला नाहीं. राज्यकारभाराचा आणि माणसांचा विस्तृत अनुभव घेतल्या-नंतर १८१६ मध्यें त्यानें लिहिलें "जनतेच्या वर्चस्वाविरुद्ध श्रीमंतांनीं चाल-विलेल्या चडफडीनें किंवा भित्र्यांनीं चालविलेल्या आरडाओरडीनें भिअून शरण जाअूं नका. जीवन आणि मालमत्ता आणि त्यांचा वापर, या संबंधीचे प्रत्येक नागरिकाला असणारे समान हक्क हाच लोकशाहीचा खरा आधार आहे. मानवी मनाच्या प्रगतीनुसार कायदे आणि संस्था प्रगट झाल्या पाहिजेत हें मी जाणतो. नवीन शोधांनीं, नवीन सत्यें स्पष्ट झाल्यानें, मानवी मन जसें प्रगत होतें, अधिक सुसंस्कृत बनतें तशा संस्था सुधारल्या पाहिजेत आणि

त्यांनीं काळाबरोबर राहिले पाहिजे." सर्व माणसांना सारखा व पुरेसा न्याय मिळाला पाहिजे असे त्याला वाटत असे. "भीतीला पिछाडीला ढकलून आणि आशेला पुढें ठेवून माझ्या जीवनाचें तारूं मी हांकारतों" असें तो म्हणे. व्हर्जीनियांत चिरनिद्रा घेत असलेला हा माणूस मानवी जीवनावर श्रद्धा ठेवणारा होता. बऱ्यावाईटांचा अनुभव घेऊनहि सामान्य नरांतून नारायण निर्माण होऊं शकेल ही त्याची श्रद्धा कायम राहिली.

चलाखी, वक्तृत्व, आकर्षक व्यक्तिमत्व, शौर्य असे अनेक गुण असलेला अलेक्झांडर हॅमिल्टन हा अमेरिकन लोकसत्ताकाचा अेक संस्थापक होता, तसाच समर्थ लेखक होता. आर्थिक व्यवहारांतहि तो तज्ञ होता. वॉशिंग्टनचा आवडता अधिकारी असलेला हॅमिल्टन अमेरिकेचा पहिला अर्थमंत्री झाला. **स्वतंत्र आणि स्वावलंबी शेतकरी ज्यांत आहेत असें राष्ट्र अमेरिका बनावी असें जेफर्सनचें स्वप्न होतें.** पण हॅमिल्टन अुद्योगधंदे आणि भांडवल यांच्याकडे वळला. सर्वसाधारण जनतेविषयीं त्याला फारसा विश्वास नव्हता. अधिक बुद्धिवंतांनीं राज्य चालवावें आणि जनतेला मार्गदर्शन करावें असे त्याचे विचार होते. "अुच्च कुलीन, श्रीमंत, आणि सुसंस्कृत" अशा लोकांविषयींच आपल्याला विशेष प्रेम आहे हें तो कबूल करी. बुद्धिवंतांची समानता त्याला मान्य होती पण सामान्य जनतेच्या बडबडीकडे लक्ष द्यावें असें त्याला वाटत नसे. परंतु हॅमिल्टन क्रांतिकारक नव्हता असें समजणें चूक ठरेल. सर्वोत्तम आणि समर्थ व्यक्तींनीं चालविलेलें केंद्रिभूत राज्य त्याला पाहिजे होतें. कदाचित त्याला राजेशाहीहि मान्य झाली असती. पण जगांत नमुनेदार ठरावें असें स्वतंत्र आणि स्वाधीन राज्य त्याला हवें होतें. थाटामाटाची त्याला आवड होती. पण पैशाची त्यानें कधीं काळजी केली नाहीं कीं, पैसा कधीं त्याच्या हाताला चिकटला नाहीं. मानवी स्वभावाविषयीं हॅमिल्टन आणि जेफर्सन यांच्या कल्पना परस्पर विरोधी होत्या. त्यामुळें ते अेकमेकांचे शत्रु होते. परंतु अमेरिकन राष्ट्र अस्तित्वांत आणणारी घटना तयार करण्याचें श्रेय हॅमिल्टनलाही आहे. आणि अमेरिकन राष्ट्राची पत परत मिळविण्याचें श्रेय सर्वस्वी हॅमिल्टनलाच दिलें पाहिजे. टाळतां येण्यासारख्या अेका द्वंद्वांत सत्तेचाळीसाव्या वर्षी त्याचा मृत्यु झाला. पण त्याच्या सामर्थ्यशाली व्यक्तित्वाची छाप राष्ट्रावर राहिली.

अमेरिकन लोकसत्ताकाची स्थापना करणारांपैकीं चौघेजण अशा प्रकारचे होते. मूळ संस्थापकांत सर्व प्रकारची माणसें होतीं. परंतु अेक स्वतंत्र राष्ट्र अुभारण्याच्या अिच्छेंत मात्र त्यांचें अैक्य झालेलें होतें. स्वित्झर्लंडमधून आलेला गलाटिन, व्हर्जीनियांतील ली बंधू, साअूथ कॅरोलिनाचा

रूटलेज, मेडिसन आणि मन्रो असे दुसरेहि लोक होते. यांच्यापैकीं प्रत्येक जण राष्ट्राध्यक्ष झाला. जुन्या लोकांच्या शिकवणुकींतच हे वाढलेले होते. या शिवाय सरहद्दीवरचे लोक होतेच. राज्यक्रान्ति चालू असतांना, ॲलेघेनी पर्वताच्या खिंडींतून शिकारी आणि सुरवातीचे वसाहतवाले यांचा प्रवाह वाहूं लागला होता. तेथें त्यांना कोणत्याच कायद्याचें बंधन नव्हतें. तरीसुद्धां पहिली गोष्ट, त्यांनीं अेकत्र जमून, कायदे करण्याची केली. केण्टुकीमध्यें आणि टेनेस्सीमध्यें नवीन वसाहतवाल्यांनीं आपलीं सरकारें स्थापन केली आणि त्याची लेखी नोंद केली. रेड अिंडियनांबरोबरच्या लढाअींतील अनुभवी व अनेक हाल भोगलेल्या सरहद्दीवरच्या लोकांनीं आपल्या बंदुकी जरा बाजूला ठेवल्या आणि ते अेकत्र झाले. आपण कोणाला मिळावें या विषयीं त्यांचा पक्का निश्चय नव्हता. पण स्वतंत्रतेनें जगावयाचें हें त्यांना कळत होतें. क्रान्तीचा त्यांना चांगलासा अुमग पडणें शक्य नव्हतें. परंतु रक्त सांडून त्यांनीं जमिनी मिळविल्या होत्या आणि त्या स्वातंत्र्यांत टिकविण्याची त्यांची अिच्छा होती. सरहद्दीवर तत्वापेक्षां व्यवहारच महत्वाचा होता. त्या ठिकाणीं स्वातंत्र्य व्यवहार्य होतें अेवढेंच नव्हे तर, तें आवश्यकहि होतें.

पांच राष्ट्राध्यक्षांची निवड शांततेनें झाल्यानंतर १८१२ सालीं अिंग्लंडबरोबर कांहींसें अनिर्णित असें दुसरें युद्ध झालें. तज्ञ निरीक्षक आतां मान्य करूं लागले कीं, नव्या जगांतील नव्या लोकसत्ताकाचा हा नवा प्रयोग आतां टिकणार. पण जागतिक घडामोडींत त्याचें स्थान कोणतें हा प्रश्न अुरलाच.

अमेरिका म्हणजे आपलें नशीब अुजळवूं पाहणाऱ्या ब्रिटनमधील किंवा अितर युरोपांतील लोकांचें स्थान असें अद्यापहि मानलें जात होतें. नंदनवनाचा आढळ झाला नाहीं म्हणून कांहींची घोर निराशा झाली. दुसरे कांहीं लोक आले. त्यांची फसवणूक झाली आणि त्यांनी नव लोकसत्ताकाची ध्येयें म्हणजे ढोंगीपणा आहे असा आहेर केला. परंतु आलेल्या कांहीं लोकांची भरभराट झाली.

देश, राष्ट्र, या नात्यानें, अमेरिका अद्याप बलाढ्य किंवा महत्वाची सत्ता बनलेली नव्हती. परंतु आपल्या सामर्थ्याचें विचित्र आणि मनोरंजक असें थोडेंफार प्रदर्शन अमेरिकेनें केलेलें होतें. जेफर्सनच्या कारकीर्दींत अमेरिकेनें बार्बरी चांच्यांना खंडणी देण्याचें नाकारलें आणि अमेरिकन नौदलानें तळापासून चार हजार मैल दूरवर जाअून शूर चांच्यांचाहि पराभव करण्याचा पराक्रम केला. जेफर्सनच्याच कारकीर्दींत लुअीझिआनाचा विस्तृत प्रदेश फ्रान्सकडून विकत घेण्यांत आला. १८१२ च्या लढाअींत

वॉशिंग्टन ब्रिटिशांच्या हातीं पडलें होतें आणि व्हाअीट हाअूस जाळण्यांत आलें होतें तरी, न्यू ऑर्लिन्स येथें अँड्र्यू जॅकसन नांवाच्या सेनापतीनें ब्रिटिशांवर चांगलाच विजय मिळविला. तसेंच अमेरिकन लढाअू जहाजांनीं आणि नौसैनिकांनीं जगांतील बलाढ्य अशा ब्रिटिश आरमाराला चांगलीच टक्कर दिली. परंतु युरोपच्या दृष्टीनें या गोष्टी क्षुल्लक आणि कमी महत्वाच्या होत्या. अेका दृष्टीनें तें रास्तच होतें. अमेरिकेजवळ तयार आणि शिस्तीचें सैन्य नव्हतें कीं आरमार नव्हतें. जगाच्या नकाशावर अमेरिका म्हणजे अेका बाजूला पडलेलें अेक प्रश्नचिन्हच राहिलें. अमेरिका राष्ट्र होतें पण जागतिक घडामोडींत तें फारच थोडा भाग घेत होतें.

अमेरिकनांच्या दृष्टीनें मात्र परिस्थिति निराळी होती. चालल्या होत्या त्या पध्दतीनेंच गोष्टी घडाव्या अशीच त्यांची अिच्छा होती. त्यांना मोठें सैन्य नको होतें, बलाढ्य आरमार नको होते. आपल्या देशाचा विकास करण्याची त्यांची अिच्छा होती. जगांतील राष्ट्रांशीं व्यापार करावा, विचारांची आणि वस्तूंची देवघेव करावी आणि शांततेचे संबंध राखावे, अेवढीच त्यांची अिच्छा होती. त्यांना अधिक कांहीं नको होतें.

या गोष्टी करण्याची त्यांना केवळ अिच्छा होती अेवढेंच नव्हे तर, ते त्या प्रत्यक्ष कृतींत आणीत होते. पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावरील दोन विस्तृत महासागर अमेरिकेचें संरक्षण करीत होतें. अमेरिकेच्या अुत्तरेकडील आणि दक्षिणेकडील राष्ट्रें लष्करी दृष्ट्या बलाढ्य नव्हती. कोणत्याहि सत्तेकडून धोक्याची भीति नव्हती. यामुळें अमेरिका आपलें जीवन आपल्या कल्पनेप्रमाणें चालवूं शकत होती आणि हें अनेक वर्षें चाललें.

धोका निर्माण होण्याची अेकच शक्यता होती. अेकाद्या परकी बलाढ्य सत्तेनें पश्चिम गोलार्धांत आणखी वसाहत करून, अुत्तर किंवा दक्षिण अमेरिकेंत युरोपशीं घनिष्ट संबंध असलेलें आणि अमेरिकेशीं शत्रुत्व करणारें राज्य स्थापलें असतें तरच, धोका येणार होता. म्हणून १८२३ सालीं जेव्हां नव्या जगांतील स्पेनच्या वसाहतींनीं स्पेनची सत्ता अुलथून लोकसत्ताक राज्यें स्थापन केलीं तेव्हां त्यावेळचा राष्ट्राध्यक्ष जेम्स मन्रो यानें अमेरिकन धोरणासंबंधानें पुढील घोषणा केली :

"प्रस्तुत प्रसंगीं तत्त्व म्हणून असें जाहीर करणें अिष्ट कीं, स्वतंत्र आणि स्वाधीन झालेल्या अमेरिकन खंडांत कोणत्याहि युरोपीय सत्तेनें वसाहत करतां कामा नये."

अुत्तर आणि दक्षिण अमेरिकेच्या कारभारांत परकी सत्तेनें हस्तक्षेप करण्याबाबत मन्रोनें पुढील गोष्टी मांडल्या :

"अटलांटिक महासागराच्या पलीकडील किनाऱ्यावर राहणाऱ्या बांधवांच्या स्वातंत्र्याबाबत आणि सौख्याबाबत अमेरिकन नागरिकांना मित्रभाव वाटतो. युरोपीय सत्तांच्या त्यांच्याविषयींच्या झगडयांत आम्हीं अद्यापपर्यंत कोणताहि भाग घेतलेला नाहीं आणि हें आमच्या धोरणाशीं सुसंगतहि नाहीं. आमच्या हक्कांवर आक्रमण झालें किंवा त्यांना जबरदस्त धोका निर्माण झाला तरच आम्हीं त्याला विरोध करूं किंवा आमच्या संरक्षणाची तयारी करूं. या गोलार्धांतील हालचालींशीं आवश्यक म्हणून आम्हीं जवळून निगडित आहों; आणि त्याचीं कारणें अगदीं उघड आहेत. दोस्त राष्ट्रांची राज्यपध्दति अमेरिकन पध्दतीपेक्षां निराळी आहे. हा फरक दोन्हीं देशांतील सरकारांमध्यें जो फरक आहे त्यांतून निर्माण झाला आहे. रक्त सांडून आणि संपत्तीचा नाश सोसून जीं राज्यपध्दति निर्माण करण्यांत आली तिच्या रक्षणासाठीं हें सर्व राष्ट्र वाहून घेत आहे. तेव्हां आमचा निष्कपटीपणा व अमेरिका आणि त्या सत्ता यांच्यामध्यें असलेला मित्रभाव स्पष्ट व्हावा म्हणून, आम्हाला असें जाहीर करणें आवश्यक वाटतें कीं या गोलार्धांतील कोणत्याहि विभागांत त्यांची राज्यपध्दति सुरू करण्याचा त्यांचा प्रयत्न आमची शांतता आणि सुरक्षितता धोक्यांत आणणारा आहे असें आम्हीं मानूं. कोणत्याहि युरोपीय सत्तेच्या आज असलेल्या वसाहतींत किंवा तिच्या ताब्यांतील प्रदेशांत आम्हीं ढवळाढवळ आजपर्यंत केलेली नाहीं आणि यापुढें करणार नाहीं. पण ज्या राज्यांनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें आहे आणि टिकविलें आहे व ज्यांच्या स्वातंत्र्याला आम्हीं मान्यता दिली आहे त्या राज्यांना कोणत्याहि युरोपीय सत्तेनें जुलूम करण्यासाठीं किंवा अितर मार्गांनीं त्यांचें नियंत्रण करण्यासाठीं अडथळा केला तर ही गोष्ट अमेरिकेशीं शत्रुत्व व्यक्त करणारी आहे असेंच मानलें जाईल." हें मन्रो तत्त्व अद्यापहि अमेरिकेच्या धोरणांतील प्रमुख मुद्दा आहे.

आवश्यकतेंतून हें तत्त्व निर्माण झालें. नव्या जगांतील घडामोडीं-बाबत अिंग्लंड आणि अमेरिका यांच्यांत झालेल्या बोलण्यानंतर हें तत्व आलें. या तत्वाची मुत्सद्देगिरीची भाषा दूर केली कीं त्याचा सरळ अर्थ असा होतो कीं, "नव्या जगांतील घडामोडींत परकी सत्तांनीं ढवळाढवळ करतां कामा नये. अशी ढवळाढवळ झाल्यास अमेरिका त्याला विरोध करील." या तत्वाला जगांतील मोठ्या सत्तांनींहि विरोध दर्शविला नाहीं. या मौनाला कारण होतें.

त्या वेळीं, नेपोलियनिक युध्दांच्या धक्क्यांतून आणि नाशांतून युरोप

नुकतेंच मुक्त होत होतें. पश्चिमेकडे वसाहती स्थापण्याचा फ्रान्सचा आणि स्पेनचा सुरवातीचा जोर थंडावला होता. स्वतंत्र होण्याचा निश्चय केलेल्या पश्चिम गोलार्धातील आपल्या वसाहती परत जिंकण्याची शक्ति स्पेनजवळ नव्हती. युरोपांतील प्रतिस्पर्ध्यांची ब्रिटनला भीति वाटत होती. शिवाय दक्षिण अमेरिकेंतील लोकसत्ताकांबरोबर ब्रिटनचे संबंध सलोख्याचे होते म्हणून ब्रिटननें अमेरिकन धोरणालाच पाठिंबा दिला. फ्रान्सला शांतता हवी होती. सॅन फ्रॅन्सिस्कोजवळ रशियानें आपलीं ठाणीं स्थापलीं होतीं. परंतु रशियाला वसाहतींची महत्वाकांक्षा नव्हती. वाटाघाटी करून, आपले हक्क ५४° ४०′ अक्षांश रेषेपर्यंत मर्यादित करण्याची रशियाची तयारी होती. यामुळें हें जमलें. आणि पश्चिम गोलार्धातील अमेरिकाच नव्हे तर अितर सर्व राज्येंहि आपल्या मार्गानें जाण्यास मोकळीं झालीं.

नव्या जगांतील शेजाऱ्यांबरोबर अमेरिका नेहमींच शहाणपणानें, न्यायानें वागलेली नाहीं. परंतु अमेरिकेला माहित आहे आणि शेजाऱ्यांनाहि माहित आहे कीं, पश्चिम गोलार्धातील कोणत्याहि राज्यावर परकी सत्तेनें सशस्त्र आक्रमण केल्यास किंवा तें काबीज केल्यास ती सत्ता आणि अमेरिका यांत युध्दच अुद्‌भवेल. दुसरा मार्गच राहणार नाहीं.

मन्रो तत्त्व ही व्यावहारिक आवश्यकता होती. परंतु जुन्या जगांतील भांडणें, सत्तेची धडपड, भानगडी––या सर्वांपासून नवें जग मुक्त राहावें अशी त्यामागें कळकळ होती. जेफर्सननें ही कळकळ पुढील शब्दांत अगदीं स्पष्टपणें मांडली. "आमचें पहिलें आणि मूलभूत तत्व हें कीं, युरोपांतील भांडणांत आपण पडावयाचें नाहीं. युरोपालाहि आमच्या व्यवहारांत पडूं द्यावयाचें नाहीं हा आमचा दुसरा दंडक आहे. युरोपांतील घडामोडींची कृष्ण छाया पडत आहे. तरीसुध्दां आमचे श्रम फुकट गेलें असें मी मानीत नाहीं. स्वातंत्र्य आणि ज्ञान हळुहळू प्रगति करीत आहेत ही आशा बाळगीतच मला मृत्यु येअील. रानटीपणा आणि जुलमी सत्ता यांनीं युरोपांतील विज्ञान आणि स्वातंत्र्य यांना झांकाळून टाकलें तरी, ज्ञान आणि स्वातंत्र्य यांचें रक्षण करून पुनर्प्रतिष्ठा करण्यास हा देश राहील."

हें अगदीं स्प्ट बोलणें आहे. अमेरिकन लोकांनाहि अनेक वर्षें असेंच वाटत होतें. जीवन, राज्यपध्दति आणि मानवी हक्क यांचा आपण अेक नवीन प्रयोग करीत आहों याची त्यांना जाणीव होती. या प्रयोगासाठीं त्यांना अेकलेपणा हवा होता. याच कार्यासाठीं आपला जन्म आहे, अशी त्यांची समजूत होती ; मग ती बरोबर असो की चुकीची असो. त्यांना मदत

करण्यासाठीं येणाऱ्या युरोपच्या रहिवाशांचें ते स्वागतच करीत; परंतु युरोपीय पाहुण्यानें आपल्या जुन्या निष्ठांचें गांठोडें अमेरिकेच्या प्रवेशव्दारांतच फेंकून दिलें पाहिजे अशी त्यांची अिच्छा असे. अमेरिकन जीवनपध्दति हीच योग्य होय असें त्यांना मोठ्यानें सांगावेसें वाटे. आणि अमेरिकन जीवनपध्दतीवर कोणी टीका केल्यास त्याला ते आवेशपूर्ण विरोध करीत.

त्या प्रवृत्तींत चांगल्या आणि वाअीट गोष्टींचीं बीजें होतीं. त्यामुळें अमेरिकन लोक स्वावलंबी, स्वाधीन, आपल्या स्वातंत्र्याविषयीं विशेष जागृत आणि भविष्यासाठीं साहस करण्यास तयार असलेले असे बनले. पण त्याबरोबरच, बढाअीखोर, शेखी मिरवणारे, टीकेनें खवळून जाणारे, वगैरे आहेरहि त्यांना मिळाले. अेका अमेरिकनानें दलदलीच्या व मलेरियाच्या भागांत बांधलेल्या कांहीं लांकडी झोपड्या दाखवून, हें पहा आम्हीं मोठें शहर वसविल्याचें म्हटलें तेव्हां त्याच्या बरोबरच्या युरोपीय प्रवाशाला हंसावें कीं वेड्याची बडबड म्हणून दुर्लक्ष करावें हेंच समजेना. परंतु अमेरिकन मनुष्य आपल्या स्वप्नांत गुंग होता. त्याचे डोळे, रस्त्यांतील डुकरें आणि थंडीनें कांकडणारे निस्तेज लोक पहात नव्हते. पन्नास वर्षांनंतर काय घडलें पाहिजे तें त्याच्या डोळ्यांना दिसत होतें. म्हणूनच, न्यू अथेन्स, पामिरा, अीडन, अित्यादि नांवें गांवांना देण्यांत त्याला कांहींच हास्यास्पद वाटत नव्हतें. वेस्ट मॅगॅलोपोलिसमधील मुलींची शाळा शिक्षणाचें केंद्र म्हणून ऑक्सफर्डची बरोबरी करूं शकत नाहीं आणि अर्धवट वॅाढलेल्या वॉशिंग्टन शहरांत पार्थीनॉनसारखें सौंदर्य नाहीं असें युरोपीय माणसानें दाखवून दिलें कीं, अमेरिकनांना वाटे स्वातंत्र्याचा प्रसाद या कलुषित मनाच्या युरोपीयनांना अुमगतच नाहीं. अुलट अज्ञानी आणि बढाअीखोर बालक म्हणून युरोपीयन लोक अमेरिकेची संभावना करीत. अशा प्रकारच्या अेकमेकांविषयीं गैरसमजुती त्यावेळीं होत्या आणि आजहि आहेत.

राजकीय आणि मानसिक दृष्ट्याहि अमेरिकेनें युरोपापासून फारकत करून घेतली होती. त्याबरोबरच, जागतिक व्यवहारांत युरोपनें अमेरिकेचें सहकार्य मागितलें नाहीं कीं मिळविण्याची अिच्छा केली नाहीं असें म्हणणें योग्य ठरेल. कोणत्याहि तऱ्हेचा बडेजाव, मानमरातब नसलेला, साध्या पोषाखांतील अशा अमेरिकन वकीलाचें युरोपांतील राष्ट्रांच्या दरबारांत वजन पडत नसे. अर्थात नामवंत असेल अशा वकीलाचें चांगलें स्वागत होअी आणि त्याचा बडेजाव राखला जाअी. अशा तऱ्हेचे कांहीं वकील होते. परंतु सर्वसाधारण युरोपच्या हितसंबंधी गोष्टींत अमेरिकन वकीलाचा सल्ला

विचारला जात नसे कीं त्याच्या राष्ट्राच्या सहकार्याची अपेक्षा केली जात नसे. परंतु अमेरिकेविषयीं मित्रभाव असे आणि अमेरिकन प्रयोगाविषयीं औत्सुक्यहि आढळे. डॅनियल वेबस्टरसारखा नामवंत अमेरिकन नागरिक ब्रिटनमध्यें किंवा अितर युरोपांत गेला तर त्याचें मोठ्या आनंदानें स्वागत होअी. माणसांचा आणि पैशाचा ओघ अमेरिकेकडे सतत चालू राहिला. शिवाय, ग्रंथ, कला, संगीत, शिल्प, विज्ञान आणि याविषयांचे तज्ज्ञ याबाबतींत अमेरिकेचें तोंड युरोपकडेच वळलेलें होते. जगांच्या ज्ञानांत अमेरिकन व्यक्तीहि भर घालूं शकते यांची जाणीवहि युरोपांत हळुहळू झाली. परंतु युरोप-अमेरिकेला जोडणारे हे दुवे असतांहि विचार, भावना आणि जीवनपध्दति याबाबतींत दोन्हीं गोलार्ध अेकमेकापासून दूर गेले. ही घटना अपरिहार्य होती.

१८४० सालांतील सर्वसाधारण अमेरिकनाला युरोप म्हणजे पुराण-वस्तुसंग्रहालय वाटत असें. तेथें गेलें तर मनोरंजन होण्याचा संभव होता. पण तेथल्या सर्व वस्तु भूतकालांतील होत्या. ज्यांच्यापासून दूर जाण्याचा त्यानें प्रयत्न केला होता अशा त्या गोष्टी होत्या असेंच विचार त्याच्या मनांत येत.

अुलट त्याच काळांतील युरोपीय माणसाला वाटे अमेरिका म्हणजे जेथें रेड अिंडियन लोक जनतेच्या डोक्याची कांतडी काढतात असा अर्धवट सुधारलेला रानटी प्रदेश होय. अमेरिकन आप्तांकडून येणारी पत्रें मनोरंजक वाटत पण त्यांतील कल्पना मात्र युरोपीयनांना तऱ्हेवाअीक वाटत.

अशा प्रकारची परिस्थिति होती. तरी अमेरिकेची प्रगति चालूच होती. प्रगतीची गति आतां चांगलीच वाढली होती. राष्ट्राचा विस्तार पश्चिम, दक्षिण, आणि अिशान्येकडे झाला. अमेरिकन शब्दांत सांगावयाचे म्हणजे पृथ्वीवरील कोणत्याच गोष्टीबरोबर देशाच्या वाढीची तुलना करणें शक्य नव्हतें. ॲपेलेचिअन्स पर्वतामागें अडकून पडलेलीं तेरा राज्यें पाऱ्यासारखीं आतां झटकन् सर्वत्र पसरलीं. १८२१ पर्यंत व्हरमॉण्ट, मिसिसिपि, अल्बामा, अिलिनॉय, अिंडियाना, केण्टुकी, टेनेस्सी, लुअिझिआना, मेन, मिसोरी आणि ओहिओ अशीं अकरा नवीं राज्यें संघराज्यांत सामील झालीं. पश्चिमेकडील सुपीक पण धोक्याच्या प्रदेशांत आपली चीजवस्तु घेअून लोक राहण्यास जाअूं लागले. नदीमार्गानें जाअून रेड अिंडियन लोकांच्या टोळ्या आणि हवामान यांच्याशीं लोकांनीं टक्कर दिली आणि नव्या भूमीवर आपलीं पावलें रोंवलीं. साहसी व्यक्तींनीं सरहद्दींचा रस्ता धरला. युरोपांतून आलेल्या डेन्स, स्वीडिश, जर्मन्स, आयरिश वगैरे लोकांनीं दुःख भोगून नवीन वसाहती केल्या. समुद्रा-वरील कष्टाचा प्रवास करून युरोपांतून लोक येत होते. आल्यावरहि विस्तृत

प्रदेश तुडवून ते आपल्याला राहण्यास योग्य असा प्रदेश शोधून काढत होते.

अेवढे कष्ट, दु:ख कशासाठीं सहन करतां असा प्रश्न विचारला असता तर त्यांच्यापैकीं कोणीहि सांगितलें असतें कीं, नशीब काढण्यासाठीं आम्ही आलों आहों. आणि पुष्कळ वेळां त्यांचें नशीब अुजळेहि.

अमेरिकेचा विस्तार आणि त्या विस्ताराची गति याबाबत तर्कशुद्ध स्पष्टीकरण देणें शक्य नाहीं. विस्तार झाला म्हणून झाला. सुपीक जमिनीनें साहसी लोकांना आणि ज्यांचें स्वगृहीं नीट चालत नव्हतें अशा कमकुवतांनाहि लोहचुंबकासारखें खेंचून घेतलें. कांहीं दिवसांपूर्वी जेथें फक्त रेड अिंडियनांच्या भटक्या टोळ्या होत्या, तेथें थोड्याच दिवसांत जगांतील सर्व ठिकाणांहून आलेल्या माणसांचा महापूर लोटला. अेका माणसाच्या आयुष्याच्या काळांत तीन हजार मैल रुंदीचें अेक खंड, अशा पुरानें कावीज केलें. यासाठीं धडपड, रक्त आणि युद्ध यांची किंमत द्यावी लागली. १८२३ सालीं अमेरिकन वसाहतवाले टेक्ससमध्यें आले आणि १८३५ मध्यें मेक्सिकन सरकारांतून फुटून त्यांनीं आपलें स्वतंत्र लोकसत्ताक राज्य स्थापन केलें. पुढें अमेरिकेला जोडून घेण्याची त्यांनीं विनंति केली. दहा वर्षेपर्यंत हा प्रश्न लोंबकळत राहिला. परंतु टेक्ससनें आपलें स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवलें. पुढें १८४६ मध्यें मेक्सिको बरोबरच्या लढाअीचा मोबदला देअून टेक्सस, न्यू मेक्सिको आणि कॅलिफोर्निया लोकसत्ताकांत सामील करून घेण्यांत आलीं. पुष्कळ विचारवंत अमेरिकनांनीं मेक्सिको बरोबरच्या लढाअीचा आक्रमक युद्ध म्हणून निषेध केला. पण अमेरिकन ध्येयाची पूर्तता म्हणून अितरांनीं लढाअीला पाठिंबा दिला. स्वातंत्र्याचें फळ अेकदां चाखलेल्या टेक्सन लोकांना मेक्सिकोच्या सत्तेखालीं जाण्याची अिच्छा नव्हती. शिवाय पॅसिफिकच्या रोखानें पश्चिमेकडे होत असलेल्या विस्तारानें टेक्ससला कधींच गुरफटून टाकलें असतें. अशा प्रकारें आणखी विस्तृत प्रदेश लोकसत्ताकांत सामील झाला.

अेकावन्न वर्षांत अमेरिकेचा विस्तार अटलांटिकपासून पॅसिफिकपर्यंत झाला. मध्य-पश्चिम विभागांत वस्ती झाली. नैॠत्येकडील आणि वायव्येकडील भूप्रदेशाचा शोध करून तेथें वसाहत करण्यांत आली. नवीन प्रदेशासाठीं आल्प्स अेवढे अुंच पर्वत आणि डॅन्यूब नदीहून रुंद पात्राच्या नद्या ओलांडण्यांत आल्या. क्षाराच्या मैदानांत आणि डेथ व्हॅलीच्या भूप्रदेशांत अनेक दिवस धडपड करून नकाशावर अज्ञात आणि विस्तृत अमेरिकन वाळवंट म्हणून नोंद असलेल्या प्रदेशांत अमेरिकन ध्वज आणि अमेरिकन भाषा यांचा प्रवेश झाला. भटके ज्यू, नशीब काढूं अिच्छिणारे अिंग्रज,

जर्मन्स, स्विस, फ्रेंच, अिटालियन, स्कँडिनेव्हियन, नेपोलियनच्या युद्धांतील माजी सैनिक, १८३० आणि १८४८ च्या युरोपांतील क्रान्तींत हद्दपार झालेले लोक, अुपासमार होत असलेले आयरिश शेतकरी—ज्याला ज्याला संधि हवी होती तो अमेरिकेकडे वळला आणि अमेरिकन बनला.

दरम्यान आणखी अेक मोठी प्रवृत्ति अुगम पावली. औद्योगिक क्रान्तीच्या पाठोपाठ अनेक माणसांचें काम करणारीं यंत्रें आलीं आणि अमेरिकन अुद्योगधंदे आणि कारखाने निर्माण झाले, गजबजूं लागले. विकत घेअून, अुसनी आणून, चोरून, नक्कल करून, अशा सर्व अुपायांनीं अमेरिकनांनीं शक्तीवर चालणाऱ्या लेथ, माग, अिंजिन्स वगैरे सर्व यंत्रांत सुधारणा केल्या. जुन्या वस्तूंत सुधारणा करण्यांत अमेरिकन लोक मोठे चतुर होते. याबाबत न्यू अिंग्लंड मधील शेतकरी विशेष प्रसिद्ध होते. कनेक्टिकट्चे किसान तर फारच हरहुन्नरी होते. जलशक्ति, कोळसा, लोखंड आणि सर्व धातु यांचा भरपूर सांठा त्यांच्याजवळ होता. त्यांच्यामध्यें पहिल्या दर्जाचे कारागीर होते. अमेरिकनांनीं बांधलेलीं जहाजें जगांत आश्चर्यकारक ठरलीं. कोणत्याहि प्रकारचीं बंधनें नव्हतीं. चातुर्य आणि शोधक बुद्धीला पूर्ण वाव होता. वाफेवर चालणाऱ्या बोटीचा संशोधक फुल्टन याच्या बोटी हडसन नदींत चालू लागण्यापूर्वीं, कमींत कमी चार लोकांनीं तरी असल्या बोटींचा शोध लावलेला होता. हुशारी आणि कसब यांना किंमत दिली जात होती. कसल्याहि कसबी माणसाचें अमेरिकेंत चीज होत होतें. अेलि व्हिटनी नांवाच्या अेका अमेरिकनानें कापसाचा जिन पूर्वींच तयार केला होता.

जिन हा अमेरिकन संशोधनाचा अगदीं साधा असा अेक नमुना होता. जिनचा शोध लागेपर्यंत कापसांतील सरकी हातानें काढावी लागे. अत्यंत कष्टकारक असें हें काम असे. अेक नीग्रो अेका दिवसांत फक्त कांहीं पौंड कापूसच साफ करूं शकत असे. यामुळें कापूस पिकविणें, नीग्रो गुलामांची मदत घेतली तरी फारसें फायदेशीर होत नसे.

कापूस साफ करणाऱ्या जिन सारख्या यंत्रामुळें ही परिस्थिति बदलून गेली. १७९२ मध्यें लागलेल्या या शोधाचा सर्व दक्षिण विभागांत लवकरच प्रसार झाला. अमेरिकेंतील कापसाचें अुत्पादन १७९१ सालीं १,४०,००० पौंड होतें तें १८१० सालीं ८,९०,००,००० पौंडांवर गेलें. यापूर्वीं दक्षिणेंत नीळ आणि तंबाखू हीं दोन मोठीं व्यापारीं पिकें होतीं. आतां कापूस हें प्रमुख पिक झालें. कापसाला जगाच्या बाजारपेठेंत फार मागणीहि होती. परंतु कापूस पिकविणें म्हणजे गुलाम राखणें होतें आणि अधिक कापूस पिकवावयाचा तर अधिक गुलाम पाहिजेत, अशी परिस्थिति होती.

या परिस्थितीचीं अनेक कारणें होतीं. नीग्रोंची गुलामगिरी ही दक्षिणेंतील फार जुनी संस्था होती. अुत्तरेकडेहि थोड्याफार प्रमाणांत गुलामगिरी होतीच पण तेथें ती बऱ्याच प्रमाणांत नष्ट झालेली होती. अुत्तरेकडील हवामान अतिशय त्रासदायक होतें. शिवाय न्यू अिंग्लंडमधील किंवा सरहद्दीवरची शेती कौटुंबिक प्रयत्नांवर प्रामुख्यानें चाले, तेथें कोणतेंहि व्यापारी पीक होत नसे. अशा प्रकारच्या अनेक विरोधी कारणांमुळें गुलामांकडून काम करवून घेणें फायद्याचें ठरत नसे.

दक्षिणेंत परिस्थिति निराळी होती. तेथील हवामान गुलामांच्या पध्दतीला पोषक होतें. हवा अुष्ण व सौम्य होती. आफ्रिकेंतून आणलेला नीग्रो तेथें तगण्याचा अधिक संभव होता. आणि बिनकसबी माणूस मोठ्या प्रमाणावर पिकवूं शकेल असें तंबाखूसारखें पीकहि तेथें पहिल्यापासून होतें.

तरीसुध्दां, अेक वेळ अशी होती कीं, तेव्हां गुलामगिरीची पध्दति दक्षिणेंत मृतप्राय झालेली होती. वॉशिंग्टन आणि जेफर्सन या दोघांचीहि अिच्छा ती पध्दति नष्ट व्हावी अशीच होती. दक्षिणेकडील विचारवंतांचीहि ती मरावी अशीच अिच्छा होती. मानवी हक्क किंवा अेक मानवी दुष्कृति या दृष्टीनें गुलामीकडे पाहिलें नाहीं तरी, गुलामांच्या साहाय्यानें शेती करणें ही शेतीची मागासलेली आणि अुधळपट्टीचीच पध्दति होय. निष्ठेखेरीज, स्वतंत्र शेतकरी आपल्या शेताची जेवढी काळजी घेअील तेवढी काळजी गुलाम घेअील हें अगदीं अशक्यच होतें. अुलट, मळेवाला जर चांगला माणूस असेल तर त्याला गुलामांची जबाबदारी वर्षानुवर्षे घ्यावी लागे. ज्या पध्दतींतून तो फायदा काढीत होता त्याच पध्दतीशीं चमत्कारिक रीतीनें मळेवाला बांधला गेला होता.

कापसाच्या पिकाची भरभराट होअूं लागल्यावर मात्र अेकंदर रागरंग पालटला. अधिक कापसासाठीं अधिक गुलामांची जरूरी पडूं लागली आणि गुलामांची संख्या वाढली तर अधिक कापूस पिकूं लागला. आणि या दोहोंच्या वाढींतून संपत्ति मिळविण्याचा मोका मिळे. अर्थात् यामुळें गुलामगिरी दक्षिणेंत नष्ट तर झाली नाहींच ; पण अुलट तिचीं मुळें अगदीं खोलवर गेलीं.

दक्षिणेंतील सगळ्याच लोकांजवळ गुलाम होते असें नव्हे. कांहीं मूठभर लोकांच्या ताब्यांत गुलामांची मोठी संख्या होती. अितर कांहीं लोकांजवळ थोडेफार आणि क्वचित् अेकादाच गुलाम असे. तरीसुध्दां गुलामांच्या मालकांची संख्या थोडीच होती. मोठमोठ्या मळ्यांच्या मालकांना गुलामगिरी चांगलीच फायदेशीर होती. मध्यम प्रतीच्या मळेवाल्यांना

ती मध्यम प्रतीनेंच फायदेशीर पडे. पण गुलाम विकत घेण्यास पैसे नसलेल्या सामान्य शेतकऱ्याला गुलामगिरी बिलकुल मानवणारी नव्हती. परंतु गुलामांचे मालक हेच समाजांतील श्रीमंत आणि पुढारी होते. यामुळें त्यांनीं विरोध मारून टाकला.

पश्चिमेकडे अमेरिकेचा विस्तार होत असतांनाच्या काळांत, अेकाच वेळीं शेजारीं शेजारीं दोन निरनिराळ्या समाजव्यवस्थांचा विकास होत होता. अेक, स्वतंत्र शेतीसहित अुत्तरेंतील वाढती औद्योगिक व्यवस्था आणि दुसरी, गुलाम मजुरांसहित वाढत असलेली मळ्यांची शेती.

कालांतरानें, या दोन्हीं व्यवस्थांचा झगडा अुत्पन्न होणें अपरिहार्य होतें आणि तो तसा झालाहि. त्यांच्यातील भेद अेवढे तीव्र होते कीं, त्यांच्यांत झगडा निर्माण झाला नसता तरच नवल. हीच वस्तुस्थिति अब्राहम लिंकननें थोडक्यांत पुढीलप्रमाणें मांडली. "दुहीनें पोखरलेला डोलारा केव्हांतरी कोसळणारच. अर्धे लोक गुलाम आणि अर्धे लोक स्वतंत्र असलेलें हें सरकार फार काळ टिकणार नाहीं अशी माझी खात्री आहे. संघराज्य बरखास्त व्हावें अशी माझी अिच्छा नाहीं ; राष्ट्राची अिमारत कोसळावी अशीहि माझी अिच्छा नाहीं ; पण त्यांतील दुही नष्ट व्हावी अशी मात्र माझी अपेक्षा आहे. राष्ट्रांतील सर्व लोक अेक गुलाम तरी होतील नाहींतर, स्वतंत्र तरी होतील."

अमेरिकन लोकसत्ताकाचा विकास होत असतां अुत्तर दक्षिणेचा सत्तेसाठीं झगडा मात्र सतत चालू होता. तो तीव्र होअी, सौम्य होअी आणि पुन्हां वादळ अुठे. संघराज्यांत नवीनच सामील होणाऱ्या पश्चिमी राज्यांवर हा झगडा केंद्रिभूत झाला. हीं नवीं राज्यें गुलामी राहणार कीं स्वतंत्र राहणार ? दक्षिणेकडील व्यवस्था तीं स्वीकारणार कीं अुत्तरेकडील स्वीकारणार ? अेका बाजूनें सर्व राज्यें आपल्या पक्षासाठीं काबीज केली तर अंतिमतः दुसऱ्या पक्षाचें काँग्रेसमध्यें अल्पमत होणार हें निश्चित होतें. निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या प्रकारच्या तडजोडी झाल्या. पण त्यामुळें समझोता झाला नाहीं, झगडा पुढें ढकलला गेला अेवढेंच. पहिल्या पांच अध्यक्षांपैकीं चार व्हर्जीनियांतून पुरवून राष्ट्राचें नेतृत्व करणाऱ्या दक्षिणेला आढळूं लागलें कीं, आर्थिक व राजकीय दृष्टयाहि हळुहळू आपणाला अुत्तरेवर अवलंबून राहावें लागणार आहे ; आणि ही परिस्थिति बदलण्यासाठीं अुद्योगधंदे अुभारावे तर, मळ्यांची पध्दति मोडून टाकावी लागली असती.

या वस्तुस्थितीला दोन तात्त्विक प्रश्नांची जोड मिळाली.

पहिला प्रश्न घटक राज्यांच्या हक्कांचा. संघराज्याची मर्यादा कोणती ?

संघ कधींहि मोडतां न येणारी कायम स्वरूपाची संघटना आहे काय? का संघ म्हणजे अेकाद्या राज्याला फुटून निघावेंसें वाटलें तर फुटून निघतां येअील अशी निव्वळ भागीदारी? संघ शब्दाचें महत्त्व अधिक कीं राज्य शब्दाचें महत्त्व अधिक? वृक्ष मारण्याचा धोका पत्करल्याशिवाय फांद्या तोडतां येणार नाहींत, असा अमेरिका हा वृक्ष आहे का? नुकसान सोसावें न लागतां बंद करतां येण्याजोगी ही धंदेवाअीक व्यवस्था आहे काय? आणि अनेक वर्षें माणसाला टोंचीत असलेला प्रश्न—अेकादा मनुष्य प्रथम अमेरिकन आणि नंतर व्हर्जीनियन कीं, प्रथम व्हर्जीनियन आणि नंतर अमेरिकन यांत बरोबर कोणतें असा हा प्रश्न होता.

स्वातंत्र्य आणि मानवी हक्क यांना प्रतिज्ञाबध्द झालेल्या देशांत गुलामगिरीचें अस्तित्व असावें काय? हा दुसरा प्रश्न. हे दोन्हीं प्रश्न अेकमेकांत सोडवितां न येण्यासारखे गुंतून गेले.

गुलामगिरी ही असह्य अशी मानवी चूक आहे, अशा तऱ्हेनें गुलामगिरीचा धिक्कार करणारे, कळकळीचे आणि धार्मिक प्रवृत्तीचे स्त्रीपुरुष अुत्तरेंत निर्माण झाले. क्वचित् अगदीं बेफामपणें ते बोलत: पण त्यांचे बोल ज्वलंत श्रध्देंतून निर्माण झालेले होते. गुलामगिरीचा प्रसार करण्याला त्यांनीं आवेशपूर्ण विरोध केला. अुत्तरेंत पळून आलेल्या गुलामाला, दक्षिणेंतील त्याच्या मालकास त्याला नेण्याची मोकळीक देणाऱ्या कायद्यांचा त्यांनीं निषेध केला. गुलामगिरींतून पळून जाण्यास गुलामांना मदत देणाऱ्या गुप्त संस्था त्यांनीं स्थापन केल्या. सरहद्दीवरच्या भागांत गुलामगिरी जाअू नये म्हणून त्यांनीं माणसें पाठविलीं व शस्त्रास्त्रें पुरविलीं. या वृत्तीचे लोक थोडे होते. पण ते लोक निश्चयी, खात्री पटलेले, त्या कार्यासाठीं वाहून घेतलेले व त्यासाठीं आवाज अुठवणारे असे होते. त्यांना ॲबॉलिशनिस्ट म्हणत. गुलामगिरीचा निषेध करतां करतां, सर्व दक्षिणेचा ते निषेध करूं लागले.

श्रध्दा असलेल्यांना गुलामगिरीविरोधी लोक दैवी वीर वाटत. पण दक्षिणेकडील लोकांना, संबंध नसलेल्या कार्यांत अुगाचच ढवळाढवळ करणारे ते वेडे वाटत. गुलामगिरी विरोधी लोकांनीं गुलामगिरीच्या दोषांवर व छळावर पुस्तकें लिहिलीं. त्याला अुत्तर म्हणून दक्षिणेकडील लोक न्यू अिंग्लंडमधील कामगारांचे कामाचे जादा तास व कमी पगार याकडे बोट दाखवीत. हें सगळें खरें होतें, पण त्यानें प्रश्न सुटला नाहीं. सुरवातीला हळुहळू पण पुढें अगदीं त्वरेनें दोन्हीं मतें पक्की झालीं. गुलामगिरीचा पुरस्कार न करणारे दक्षिणेकडील लोक म्हणूं लागले कीं, आमचा व्यवहार आमच्या

मताप्रमाणें चालविण्याचा आमचा हक्क आहे, मग त्याकरितां संघराज्यांतून बाहेर पडावें लागलें तरी हरकत नाहीं. आणि गुलामगिरी रद्द करण्याचा आग्रह न धरणारे अुत्तरेकडील लोकहि म्हणूं लागले कीं, यादवी माजली तरी हरकत नाहीं पण संघराज्य टिकविलेंच पाहिजे. १६ ऑक्टोबर १८५९ या दिवशीं जॉन ब्राअून आणि त्याचे साथीदार यांनीं व्हर्जीनियांतील हार्पर्स फेरी या गांवावर गुलामांना मुक्त करण्यासाठीं सशस्त्र हल्ला केला. हा हल्ला फसला. पण जॉन ब्राअूनचें नांव अमेरिकन अितिहासांत न पुसण्यासारखें नोंदलें गेलें. संघराज्याला पडलेल्या भेगेची आतां मोठी दरी झाली. दक्षिणेकडील लोकांनीं ज्यांची धास्ती घेतली होती तें गुलामांचें बंड पेटवणारा खुनी वेडा म्हणून दाक्षिणात्यांनीं जॉन ब्राअूनला शिव्याशाप दिले. अुलट अुत्तरेकडील लोकांच्या दृष्टीनें, यांत ज्यांना त्याचें कृत्य पसंत नव्हतें असेहि लोक होते, जॉन ब्राअून हा आपल्या मतासाठीं शूरासारखे मरण पत्करणारा वीर ठरला. १८६० च्या अध्यक्षीय निवडणुकींत नवीन रिपब्लिकन पक्षानें सर्व स्वतंत्र राज्यांत बहुमत मिळविलें. दक्षिणेकडील लोकांची मतें मात्र डग्लस, ब्रेकनरिज आणि बेल या तीन अुमेदवारांत विभागलीं गेलीं आणि रिपब्लिकन पक्षाचा अुमेदवार अिलिनॉयचा अब्राहम लिंकन अमेरिकेचा अध्यक्ष झाला.

अब्राहम लिंकन

अब्राहम लिंकनचा जन्म केण्टुकी राज्यांत अेका ओंडच्याच्या झोपडींत १२ फेब्रुवारी १८०९ या दिवशीं थॉमस लिंकन नांवाच्या एका गोड स्वभावाच्या पण सामान्य अशा माणसाच्या पोटीं झाला. लिंकनची आओी नॅन्सी हँक्स ही व्हर्जीनियांतून विल्डरनेस रोड नांवाच्या मार्गानें केण्टुकींत आलेल्या अेका स्त्रीची अनौरस मुलगी होती. अेकच खिडकी आणि अेकच दरवाजा असलेल्या अेका झोपडींत धान्याचा तूस आणि अस्वलाच्या कातडयावर त्याचा जन्म झाला. आज वॉशिंग्टनमध्यें लिंकन मेमोरियल नांवाची संगमरवरी दगडाची अेक भव्य अिमारत आहे. तेथें असलेला लिंकनचा पुतळा पाहण्यास रोज शेंकडों लोक येतात. विचारी दिसणारा आणि कांहींसा ओबडधोबड असा त्याचा चेहरा पाहून—अेका थोर माणसाचा चेहरा पाहण्यास मिळालेला पाहून ते नम्र होतात. शिवाय अमेरिकेंतील सर्वांत कमी परिमाणाच्या अेक पेनी या तांब्याच्या नाण्यावर त्याचा मुखवटा आणि स्वातंत्र्य हा शद्ब आहे. भव्य पुतळा आणि जनतेच्या वापरांत असलेलें अेक छोटें नाणें या दोन्हींहि गोष्टी लिंकनला साजेशाच आहेत. कारण तो थोर तर होताच. पण सामान्य माणसासाठींच तो जगला, मरण पावला आणि सामान्य माणसावर त्याचें प्रेम होतें.

लिंकन घराणें अमेरिकेंत अनेक पिढयांपासून होतें. लिंकन घराण्यांतील लोक मोठे तगडे असत. फारसे मोठे न होणारे पण अगदींच सामान्य नव्हे अशा तऱ्हेची या घराण्यांतील लोकांची परंपरा होती. लिंकनचे आजोबा व्हर्जीनियांतील अेका तुकडीचे कॅप्टन होते. राज्यक्रान्तीनंतर केण्टुकींत आलेल्या सुरवातीच्या लोकांबरोबर ते केण्टुकींत आले आणि रेड अिंडियन लोकांकडून ते तेथें मारले गेले. लिंकनची आजी केण्टुकींत कशी आली याचा अुल्लेख वर केलाच आहे. आओीच्या व बापाच्या बाजूनेंहि लिंकनचे पूर्वज नवीन मार्ग चोखाळणारे होते. लिंकनचें बालपणहि मळलेली वाट सोडून नवी वाट शोधणारेंच होतें.

लिंकनच्या बापानें आपली बायको, अब्राहम व अेक मुलगी यांच्यासह अिंडियाना राज्यांत स्थलांतर केलें. तेथें त्यांनीं जंगल साफ करून आपली झोंपडी बांधली. वाळलेल्या पानांच्या शय्येवरच त्यांना निजावें लागत असे. वर्षांतील बहुतेक काल ते अनवाणीच चालत. लिंकनचा बाप शिकार करी

आणि थोडी शेतीहि करीत असे. आअी मुलांकडे व झोपडीकडे बघे. आठव्या वर्षाचा बाळ लिंकन कुऱ्हाड चालविण्यास शिकला होता. आपल्या छोट्या बहिणीसह नअू मैलांवरील अेकच खोली असलेल्या शाळेंत तो दररोज त्यावेळीं जात असे.

अब्राहम नअू वर्षांचा असतांना त्याची आअी वारली. त्याच्या बापानें पुन्हा लग्न केलें. परंतु सावत्र आअीनें लिंकनचा व त्याच्या बहिणीचा पोटच्या मुलांप्रमाणें प्रतिपाळ केला. लिंकनची वाढ होअून अुंच शरीरयष्टीचा तो अेक तगडा जवान बनला. झाडें तोडण्याच्या कामांत तो तरबेज झाला तसेंच अुत्तम कुस्तीबाज म्हणूनहि त्यानें नांव मिळविलें. पोट भरण्यासाठीं तो अनेक कामें करी. परंतु वाचन आणि मनन मात्र त्याचें सतत चालू असे. अिंडियाना सरहद्दीवर फारशी पुस्तकें मिळत नसत. पण सांपडतील तेथून तो पुस्तकें मिळवी आणि तीं वारंवार वाचीत असे. तो आपल्या मित्रांना सांगे, "मला जी माहिती पाहिजे असते ती पुस्तकांत असते. मी न वाचलेलें पुस्तक मला आणून देअील तोच सर्वोत्तम मित्र". विस्तवाच्या अुजेडांत जमिनीवर निजून, तो रात्रीं अुशीरापर्यंत पुस्तकें वाचीत असे. वाचणें आणि वाचलेल्या गोष्टींचें मनन करणें असा त्याचा अुद्योग चाले.

गप्पा मारणें आणि कोट्या करण्यांचीहि त्याला आवड होती. तो अुत्तमपैकीं गोष्टी सांगे. यामुळें त्याला काम करण्यापेक्षां गोष्टी सांगणें जास्त आवडतें अशी कांहीं लोक त्याची निंदा करीत. परंतु काम करण्याची अिच्छा असेल तेव्हां तो अगदीं सक्त मेहनतीनें काम करतो हेंहि सर्व लोक मान्य करीत. केव्हां आपला मुद्दा सिद्ध करण्यासाठीं किंवा केव्हां गंमत म्हणून गोष्टी सांगण्याचा त्याचा अुद्योग सतत चालूच असे. गोष्टींबरोबर आणखी अेक गोष्ट होती. केव्हां केव्हां तो अगदीं खिन्न होअून जाअी आणि अशा वेळीं त्याचा चेहरा पार अुतरून जाअी. जगांतील अत्यंत खिन्न असा माणूस तो कदाचित असावा.

कशाची तरी त्याच्या मनाला ओढ लागलेली होती. पण आपल्याला काय हवें आहे याचा त्याला अुमज पडलेला नव्हता. कांहीं दिवस त्यानें अेक दुकान चालविलें आणि त्यांत तो कर्ज करून बसला. अनेक वर्षें तो कर्ज फेडीत होता. पण सर्व कर्ज त्यानें फेडलें. पुढें त्यानें कायद्याचा अभ्यास केला. होडीवाला, मोजणीदार, पोस्टमास्तर असे त्यानें अनेक व्यवसाय केले. लवकरच तो भाषणें करूं लागला. सामान्य लोकांना समजेल अशीं सोपीं त्याचीं व्याख्यानें असत. वयाच्या पंचविसाव्या वर्षी अिलिनॉयच्या विधिमंडळांत तो निवडून आला. तेथें त्यानें राजकारणाचा

आणि मानवी व्यवहाराचा धडा गिरविला. पण अद्यापहि त्याला हवें असलेलें सांपडलेलें नव्हतें. त्याचें अेका मुलीवर प्रेम बसलें. पण लग्न होण्यापूर्वीच ती मुलगी मरण पावली. त्याची आई लहानपणींच वारली होती; व त्याची बहीण आधींच वारली होती. त्याच्या जीवनांत हें मृत्यूचें संगीत सतत चालू होतें. त्याच्या सर्व गमतीदार कथा मृत्यूचें गूढ अुकलूं शकल्या नाहींत.

वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षीं खिशांत फक्त सात डॉलर घेअून वकीलीचा व्यवसाय करण्यासाठीं तो अिलिनॉयमधील स्प्रिंगफील्ड येथें आला. त्या वेळीं स्प्रिंगफील्डची वस्ती १,५०० होती. अर्थात या पूर्वीं न्यू ऑर्लिन्ससारख्या मोठ्या गांवांत तो गेलेला होता. परंतु अेकंदरीनें त्याच्या दृष्टीनें स्प्रिंगफील्ड हें मोठेंच गांव होतें.

स्प्रिंगफील्डमध्यें तो स्थायिक झाला. हुशार, महत्वाकांक्षी, पण त्रासदायक स्वभावाच्या मेरी टॉड नांवाच्या स्त्रीशीं त्यानें विवाह केला. त्याला मुलेंहि झालीं. मुलांनीं त्याचे कागद, शाअी अिकडेतिकडे अुडवली तरी, मुलांशीं खेळतांना तो अगदीं रमून जाअी. वकील म्हणून त्याची प्रसिद्धी झाली व तो अेक यशस्वी वकील बनला. त्याच्या प्रामाणिकपणावर जनतेचा विश्वास होता. प्रामाणिक अॅब या नांवानें लोक त्याला संबोधीत. बाजू न्याय्य असल्याशिवाय लिंकन खटला चालविणार नाहीं अशी लोकांची खात्री असे. अेक वेळ कॉंग्रेसमध्येंहि तो निवडून आला. परंतु पुन्हां मात्र निवडून येअूं शकला नाहीं. आणि त्या वेळीं असें भासलें कीं, अेका छोट्याशा गांवांतील अेक वकील व स्थानिक महत्वाची व्यक्ति म्हणूनच लिंकनच्या आयुष्याचा शेवट होणार. त्याचें स्प्रिंगफील्डमधील जीवन पूर्ववत चालू होतें. जुनाट काळ्या रंगाचे कपडे व खराब झालेली अुंच हॅट असा त्याचा पोषाख असे. मनन, मधून मधून खिन्नता, कोट्या, गोष्टी—या सर्व गोष्टी चालू होत्या. त्यानें अनेक मित्र जोडले. पण त्याची खरी पारख करणें कठीण होतें. वयाच्या चाळीसाव्या वर्षींच जनता 'म्हातारा अॅब,' म्हणूनच त्याला ओळखीत होती. त्याची पत्नी व व्यवसायांतील भागीदार हीं दोघेंच त्याला मि. लिंकन या नांवानें संबोधीत.

१८५४ च्या सुमारास गुलामगिरीविषयीं आणि संघराज्याच्या परिस्थितीविषयीं त्याच्या मनांत विचार घोळत होते. गुलामांच्या मालकांविषयीं त्याच्या मनांत वैयक्तिक किंवा दीर्घद्वेष नव्हता. पण पेअेरिया येथील अेका भाषणांत त्यानें सांगितलें, "मनुष्य स्वभावांतील स्वार्थावर गुलामगिरी अुभारली आहे. पण गुलामगिरीचा विरोध मानवी

स्वभावांतील न्यायबुद्धीवर आधारलेला आहे." पण यानंतर कांहीं काळ त्यानें कांहींच हालचाल केली नाहीं. १८५८ मध्यें त्या वेळचा अेक सुप्रसिद्ध वक्ता स्टीफन अे. डग्लस याच्याविरुद्ध लिंकन सिनेटच्या निवडणुकीस अुभा राहिला. त्या वेळीं लिंकननें दुहीनें पोखरलेलें घर या मुद्यावर आधारलेलें आपलें भाषण केलें. डग्लस व लिंकन यांनीं गुलामगिरीच्या प्रश्नाची आपल्या प्रचारांत चर्चा केली. पण या झगड्यांत अेका बाजूला सरळ, बेडौल असा अेका छोट्याशा गांवांतील वकील आणि त्याचा प्रतिस्पर्धी जनता ज्याला छोटा राक्षस म्हणून म्हणे असा अेक खंदा वक्ता डग्लस निवडून आला. पण लिंकनचे पुढील शब्द जनतेच्या हृदयांत घुसून बसले :

"आपल्याला नीग्रोविषयीं आपुलकी नसेल तर, त्याला त्याच्या मार्गानें जाअू द्या अेवढीच माझी मागणी आहे.

"अीश्वरदत्त स्वातंत्र्यप्रेमावर आपली मदार आहे. सर्व ठिकाणच्या सर्व भागांतील सर्व माणसांचा वारसा म्हणून स्वातंत्र्याचा सांभाळ करण्याची प्रवृत्ति टिकविणें यांतच आपला बचाव आहे. ही वृत्ति मारून टाकली तर, तुमच्या भोंवतीं जुलमाची बीजें पेरली गेलीं म्हणून समजा. गुलामगिरीच्या शृंखलांची तुम्हीं संवय कराल तर, आपल्याच अवयवांना त्या धारण करण्यास तुम्हीं तयार कराल.

"दोन तत्त्वांचा हा सनातन लढा आहे. अेक सर्वसामान्य मानवी हक्क आणि दुसरें, राजांचे अीश्वरदत्त हक्क. तुम्ही कष्ट करा, भाकरी करा म्हणजे मी ती खाअीन. ती कोणत्या स्वरूपांत येतें, हा महत्वाचा प्रश्न नाहीं. पण तेंच जुलमी तत्त्व आहे. असें सांगणारी ती प्रवृत्ति आहे."

त्याच्या भाषणांत अुपहास आणि विनोदहि होता. अेका काळोख्या रात्रीं भाषण करतांना त्याचा चेहरा दिसावा म्हणून कोणीतरी त्याच्या तोंडासमोर दिवा धरला. त्यावेळीं आपल्या भाषणाची सुरवात करतांना त्यानें म्हटलें, "मित्रहो जितका तुम्ही मला कमी पहाल तितका मी तुम्हांला अधिक प्रिय होअीन." अेका मिजासी गृहस्थाची भव्य प्रेत यात्रा निघाल्याचें त्याला कळलें तेव्हां तो अुद्‌गारला, "आपली अेवढीं भव्य प्रेत यात्रा निघेल असें जनरल 'क्ष' ना आधीं समजतें तर ते पुष्कळ वर्षापूर्वींच मरायला तयार झाले असते." पण त्याच्या अितर शब्दांची लोकांच्या मनांत जागृत स्मृति राहिली. हे शब्द म्हणजे "लोक स्वतंत्र आहेत, ते स्वतंत्र राहिले पाहिजेत. गुलामगिरी हा दोष आहे. लोकशाही हीच सत्य गोष्ट. लोकशाही कृतींत अुतरवून वागणें शक्य आहे." शेवटीं, पश्चिमेकडील लोकांनां जमीन व गुलामगिरीचा द्वेष अशा सरहद्दीवरील तत्वांना प्रतिज्ञेनें बांधलेल्या

नवीन रिपब्लिकन पक्षाच्या परिषदेंत अब्राहम लिंकनला अध्यक्षपदासाठीं पक्षाचा अुमेदवार म्हणन निवडण्यांत आले. अमेरिकेचा अध्यक्ष म्हणून त्याची निवड झाल्यावर, त्यानें आपलें घर विकलें, आपलें सामान स्वतःच बांधलें आणि त्याच्यावर "अे. लिंकन, व्हाअिट हाअूस, वॉशिंग्टन" असा पत्ता लिहिला, त्या वेळीं तो अेकावन्न वर्षांचा होता. तरी आपल्या जुन्या मित्रांचा निरोप घेतांना तो म्हणाला :

"मित्रहो, सुमारें पंचवीस वर्षें मी तुमच्यांत राहिलों. मी तरुण असतांपासून आतां म्हातारा होअीपर्यंत येथें राहिलो. माझ्या मुलांचा जन्म येथेंच झाला आणि त्यांपैकीं अेक येथेंच मृत्यु पावलें. आज तुम्हांला सोडून, जनरल वॉशिंग्टनवर पडलेल्या कामापेक्षां अधिक कठीण कामगिरी शिरावर घेण्यास मी जात आहे. वॉशिंग्टनला जशी अीश्वरी कृपा मिळाली तशी अीश्वरी कृपा मला मिळेल तरच मी यशस्वी होअीन. आतांहि अीश्वरानें आमच्या पूर्वजांसारखा आमच्यावर अनुग्रह करावा अशी आपण प्रार्थना करूं या. त्या अीश्वरालाच तुम्हीं शरण जा. अेवढें बोलून मला आतां गेलेंच पाहिजे. मी किती काळ राहणार हें मी सांगूं शकत नाहीं."

यादवी

रिपब्लिकन पक्षाच्या अध्यक्षाला मान्यता न देण्याची दक्षिणेनें प्रतिज्ञा केली होती. २० डिसेंबर १८६० या दिवशीं साअूथ कॅरोलिना राज्य संघराज्यांतून फुटून निघालें. दोन महिन्यांच्या आंत आल्बामा, मिसिसिपी, फ्लॉरिडा, लुअिझिआना आणि जॉर्जिया या राज्यांनींहि कॅरोलिनाचें अनुकरण केलें. ८ फेब्रुवारी १८६१ या दिवशीं फुटून निघालेल्या सहा राज्यांचे प्रतिनिधि अल्बामा राज्यांतील मॉण्टगोमेरी येथें अेकत्र जमले आणि त्यांनीं अमेरिकन राष्ट्रसंघ (कॉन्फीडरेट स्टेट्स ऑफ अमेरिका) स्थापन केला. दोन आठवड्यांनीं टेक्सस् राज्यहि राष्ट्रसंघांत सामील झालें. ४ मार्च रोजीं लिंकननें अध्यक्षपदाची जागा स्वीकारली. त्यावेळच्या आपल्या भाषणांत त्यानें आपली भूमिका साधेपणानें पण निश्चयपूर्वक मांडली. तो म्हणाला यादवी युध्दाचा महत्वाचा प्रश्न माझ्या हातांत नाहीं. आपल्या हातीं आहे. सरकार तुमच्यावर सक्ति करणार नाहीं. सार्वत्रिक कायदा आणि राज्यघटना या दृष्टीनें विचार करतां, या राज्यांचा हा संघ कायम स्वरूपाचा आहे. कोणतेंहि राज्य आपल्या कृतीनें कायदेशीरपणें संघराज्याबाहेर जाअू शकत नाहीं.

परंतु, अेक महिन्यांतच यादवीची पहिली ठिणगी पडली आणि व्हर्जीनिया, अर्कान्सिस, टेनेस्सी आणि नॉर्थ कॅरोलिना हीं चार दाक्षिणात्य राज्यें राष्ट्रसंघांत सामील झालीं. अशा तऱ्हेनें सुरू झालेलें हें युध्द चार वर्षें टिकलें. मोठ्या शौर्यानें व त्वेषानें हें युध्द लढलें गेलें. दक्षिणेकरितां देहत्याग केलेले लोक अशा विश्वासानें मेले कीं, आपल्या पूर्वजांनीं मिळविलेल्या स्वातंत्र्यासाठींच आपण मरत आहों. अुत्तरेसाठीं मरणाऱ्यांची श्रध्दा होती कीं, आमच्या पूर्वजांनीं अुभारलेलें संघराज्य टिकविण्यासाठीं आपला प्राणत्याग आहे. शक्यतों बिनचूक असलेल्या अंदाजाप्रमाणें यादवी युध्दांत ६,१०,००० लोक लढाअींत मारले गेले किंवा जखमी होअून आणि रोगांनीं मरण पावले.

बुल रन, चॅन्सेलर्स व्हिले, ॲण्टिअेट्म, व्हिक्सबर्ग, गेटीसबर्ग, चिकॅमॉगा या ठिकाणीं महत्वाच्या चकमकी झाल्या. पण यावरून यादवी युध्दाची खरी ओळख होणार नाहीं. स्त्री-पुरुषांच्या हृदयांत खरी हकिगत होती. थोर, मृदु स्वभावाचा आणि हाताखालच्या सैनिकांचा केवळ पूजास्थान

बनलेला दक्षिणेचा सेनापति ली यानें डोळे दिपवून टाकणाऱ्या कौशल्यानें युध्द चालविलें. वीराला साजेशा धैर्यानेंच त्यानें पराभव स्वीकारला आणि पराजित दक्षिणेला शांतता आणि न्याय यांचा मार्ग दाखविला. यादवीचा आत्मा, रंगेल दक्षिणी घोडेस्वार आणि निर्णायक गेटीसबर्गच्या लढाओंत खंबीरपणें तोंड देणाऱ्या संघराज्याचें सैनिक यांच्या ठिकाणीं सांपडणें शक्य होतें. आपल्याला पटलेल्या कार्यासाठीं सर्व प्रकारचा त्याग करून, अतोनात कष्ट आणि दुःख सहन करणाऱ्या पण अितिहासाला अज्ञात असलेल्या दोन्हीं बाजूंच्या असंख्य जनतेच्या हृदयांत यादवीचा खरा अितिहास सांठवलेला होता. पण गेटीसबर्ग येथें धारातीर्थीं पडलेल्यांच्या स्मृतीला वंदन करतांना लिंकननें काढलेल्या अुद्गारांचा पुनरोच्चार करणेंच अिष्ट :

"सत्याअैंशीं वर्षांपूर्वीं आपल्या पूर्वजांनीं स्वातंत्र्यावर अुभारलेल्या आणि सर्व माणसें जन्मतः समान या तत्वाला प्रतिज्ञाबध्द झालेल्या राष्ट्राला जन्म दिला.

"आतां तें राष्ट्र कीं आणखी दुसरें राष्ट्र तगूं शकेल याची यादवीच्या भट्टींत आपण कसोटी लावीत आहों. यादवींतील अेका मोठ्या रणांगणावर आपण जमलों आहों. राष्ट्र जगावें म्हणून ज्यांनीं आपल्या प्राणांची आहुती दिली त्यांच्या चिर निद्रेसाठीं त्या रणांगणाचा कांहीं भाग आपण देत आहों. आपण असें करावें हें अगदीं योग्य आहे.

"पण अुच्च भमिकेवरून पाहिल्यास आपण ही भूमी देअूं शकत नाहीं, अर्पण करूं शकत नाहीं, पवित्र करूं शकत नाहीं. येथें लढलेल्या जिवंत आणि मृत वीरांनीं ही भूमी पूर्वींच पवित्र केलेली आहे. त्यांत कमीजास्त करणें आपल्या शक्तीबाहेरचें आहे. येथें लढलेल्यांनीं आतांपर्यंत चालविलेलें कार्य पुरें करण्यासाठीं वाहून घेणें हेंच आतां जिवंत असलेले आपण करूं शकतों. आतां येथें असलेल्यांनीं आपल्यापुढील कार्य पुरें करण्यासाठीं वाहून घेणें जरूर आहे. ज्यांनीं आपली सर्व निष्ठा ज्या कार्यासाठीं खर्च केली त्या सन्माननीय मृतांपासून आपण त्यांच्या कार्याविषयीं अधिक अुत्कृष्ट निष्ठा घेअूं शकतों. येथें असलेले आम्हीं असा दृढ निश्चय करतों कीं येथें मृत झालेल्यांचा देहत्याग व्यर्थ जाणार नाहीं. या राष्ट्रांत अीश्वरी कृपेनें स्वातंत्र्य पुनर्जन्म घेअील; आणि लोकांचें, लोकांकडून आणि लोकांसाठीं चाललेलें राष्ट्र पृथ्वीवरून नष्ट होणार नाहीं."

लिंकननें पुन्हा अध्यक्षपदाचा स्वीकार करतांना केलेल्या भाषणाचा पुनरोच्चार करणेंहि अिष्ट :

"कोणाहि विषयीं द्वेषभाव नको. सर्वांविषयीं दयाबुद्धि ठेवून आणि

अीश्वरानें दिलेल्या न्यायी बुध्दीनें पाहून आपल्यापुढील कार्य पुरें करण्याचा आपण प्रयत्न करूं या. राष्ट्राच्या जखमा आपल्याला बांधावयाच्या आहेत. ज्यांनीं लढाअींत सर्व प्रकारचीं दुःखें सहन केलीं ते, मृतांच्या विधवा आणि पोरकी अर्भकें, यांची आपणाला काळजी घ्यावयाची आहे. आपल्यामध्यें आणि सर्व राष्ट्रांत चिरशांतता नांदेल यासाठीं शक्य तें सर्व आपणाला करावयाचें आहे."

या शब्दांत अमेरिकेची विशिष्ट वृत्ति आहे. याच वृत्तीनें अब्राहम लिंकननें युध्द चालविलें आणि शांतता प्रस्थापित करण्यास त्याला अवसर मिळाला असता तर त्यानें हीच प्रवृत्ति कायम राखली असती. पण यादवीचा शेवट झाल्यावर दहा दिवसांनीं, १४ अेप्रिल १८६५ या दिवशीं अेका मारेकऱ्यानें त्यावर खुनी हल्ला केला आणि दुसऱ्या दिवशीं तो मरण पावला.

पुनर्रचना

आतां, अमेरिकन राष्ट्रापुढें पुनर्रचना, पुनर्घटना आणि समेट करण्याचें कार्य अुभें राहिलें.

२२ सप्टेंबर १८६२ या दिवशीं दक्षिणेंतील गुलामांची मुक्तता करण्यांत आली. लिंकननें अेक जाहिरनामा काढून असा हुकूम काढला कीं, जानेवारी १८६३ पासून आणि पुढेंहि संघराज्याविरुध्द अुभारलेल्या बंडांत सामील झालेल्या राज्यांतील व जिल्हयांतील सर्व गुलाम कायमचे स्वतंत्र राहतील. घटनेमध्यें करण्यांत आलेल्या तेराव्या व चौदाव्या दुरुस्तीनुसार असें ठरविण्यांत आलें कीं, "अमेरिकेंत किंवा अमेरिकेच्या अंमलाखालील मुलखांत गुलामगिरी किंवा सक्तीचें दास्य असणार नाहीं; आणि अमेरिकेंत जन्मलेले किंवा अमेरिकेचे नागरिकत्व मिळालेले आणि अमेरिकेच्या अंमलाखालीं असलेले लोक अमेरिकेचें आणि ते ज्या राज्यांत राहतात त्या राज्यांचे नागरिक राहतील. अमेरिकेच्या नागरिकांना देण्यांत आलेले हक्क आणि मोकळीक यांचा संकोच करणारा कायदा कोणत्याहि राज्यानें करूं नये किंवा त्याची अंमलबजावणी करूं नये. तसेंच कायद्याच्या रास्त व्यवहाराखेरीज अितर मार्गानें कोणाहि अिसमाचें जीवित, स्वातंत्र्य किंवा मालमत्ता काढून घेण्यांत येणार नाहीं."

अशा प्रकारें अमेरिकेंतील मानवी गुलामगिरीचा शेवट झाला. तसेंच कोणतेंहि राज्य फुटून निघण्याची किंवा अमेरिकेची अनेक लोकसत्ताक राज्यांत फाळणी होण्याची शक्यताहि संपली. युध्दाच्या चार वर्षांनीं हे दोन प्रश्न कायमचे मिटविले. १७७६ मध्यें जन्मास आलेले अमेरिकन राष्ट्र १८६५ मध्यें अेकसंघ झालें.

तरीसुध्दां, अनेक प्रश्न शिल्लक राहिलेच होते. अेकाअेकीं गुलाम स्वतंत्र नागरिक बनले, पण त्यांच्यापैकीं कित्येकांना नागरिकत्वाच्या जबाबदारीची फारच थोडी जाणीव होती. दक्षिणेंतील मळ्यांची शेती कोसळून पडली. चार वर्षांच्या युध्दानें दक्षिणेची परिस्थिति अगदीं हलाखीची झाली होती. दक्षिणेंतील गोऱ्या पुढाऱ्यांपैकीं अनेक युध्दांत मारले गेले. अुरलेल्यांनीं संघराज्याशीं अेकनिष्ठ राहण्याची शपथ घेतली. परंतु संघराज्याविषयींची शत्रुत्वाची भावना त्यांच्या मनांतून नष्ट झालेली नव्हती.

लिंकन जर जिवंत राहतां तर, पुनर्रचनेचा आणि दक्षिणेंतील राज्यांना

परत संघराज्यांत आणण्याचा प्रश्न अधिक शहाणपणानें आणि हुशारीनें हाताळण्यांत आला असता. परंतु अेकंदरींत हे प्रश्न आडमुठेपणानें हाताळण्यांत आले. देशाची थोरवी वाढविण्याच्या दृष्टीपेक्षां दक्षिणेला शिक्षा करण्याची सूडभावना असलेल्या माणसांनीं हें कार्य केलें.

पण अमेरिकन जनतेला अेका गोष्टीबद्दल मात्र श्रेय दिलें पाहिजे. युध्दाबद्दल मोठ्या प्रमाणावर डोकीं मारण्यांत आलीं नाहींत. रक्तमय शुध्दिहि करण्यांत आली नाहीं.

लिंकन आणि सरकारांतील अितर नेत्यांचा खून करण्याचा कट करणाऱ्या माथेफिरूंना मात्र फांशीं देण्यांत आलें. लिंकनचा प्रत्यक्ष खून करणाऱ्याचा शोध करण्यांत येअून, त्याला गोळी घालण्यांत आली. दक्षिणेंतील अेका कुप्रसिध्द तुरुंगाचा प्रमुख असलेल्या अेका अर्धवट अधिकाऱ्याला फांशीं देण्यांत आलें. राष्ट्रसंघाचा (कॉन्फीडरेसीचा) माजी अध्यक्ष जेफर्सन डेव्हिस यास त्याच्या कांहीं सहकाऱ्यांसह कांहीं काळ तुरुंगांत ठेवण्यांत आलें. पण पुढें त्याची मुक्तता झाली. यापलीकडे विशेष कांहीं घडलें नाहीं.

दक्षिणेंतील थोर सेनापति किंवा मुत्सद्दी ली, जॉन्सन, स्टीफन्स, हॅम्प्टन, लॉंगस्ट्रीट—यांच्यापैकीं अेकाचीहि राजद्रोहाबाबत चौकशी करण्यांत आली नाहीं.

पराभवांतहि चमकणारें लीचें अुदाहरण अितरांना आदर्शवत् होतें. आपल्या मोठ्या नांवाचा आणि कीर्तीचा त्याला धंद्यासाठीं अुपयोग करतां आला असता. त्यानें जर आपल्या आठवणींचा ग्रंथ लिहिला असता तर, दक्षिणेंतील प्रत्येक कुटुंबानें अुपासमार पत्करूनहि तो ग्रंथ विकत घेतला असता. पण मग लीचें महत्व राहिलें नसतें. शिक्षणाविषयीं त्याला नेहमींच कळकळ होती. त्यामुळें दक्षिणेंतील अेका छोट्याशा कॉलेजचें प्रमुखपद त्यानें पत्करलें. कळकळीनें आणि सहनशील चिकाटीनें आपलें कर्तव्य त्यानें पार पाडलें. ली त्या कॉलेजांत गेला त्यावेळीं त्या कॉलेजचें नांव वॉशिंग्टन कॉलेज असें होतें. आतां तें कॉलेज "वॉशिंग्टन अँड ली कॉलेज" या नांवानें प्रसिध्द आहे.

कटुता आणि वैर मागें राहिलें. अन्यायहि घडला. कांहीं काळ दक्षिणेला लष्करी राजवटीखालीं राहावें लागलें. दक्षिणेच्या माजी सैनिकांना हाल सोसावे लागले. अेकाअेकीं मुक्त झालेल्या नीग्रोंनाहि त्रास सहन करावा लागला. दोन्हीं बाजूंच्या गुंडांकडून नीग्रोंचा छळ झाला. राज्यकारभार-विषयक कोणताच अनुभव नसलेल्या नीग्रोंना मतदानाचा अधिकार मिळाला

आणि सरकार स्थापन करण्यांत त्यांचें साहाय्यहि घेण्यांत येअू लागलें. अर्थात् मग ही सरकारें अुधळीं, भ्रष्ट आणि नालायक ठरलीं यांत कांहीं नवल नाहीं. नवीन सरकारांनीं अनेक समर्पक आणि प्रगतीपर कायदे केले. पण कसलीच चाड नसणाऱ्या कांहीं गोऱ्या लोकांनीं कायदेमंडळांतील नीग्रो सभासदांचा आपल्या फायद्यासाठीं अुपयोग करून घेतला. अुलट अत्यंत जबाबदार अशा गोऱ्या लोकांना सक्तीनें बाजूला सारण्यांत आलें. अेकंदर परिस्थितीचा पुरा विचार कोणीच केलेला नव्हता. अर्थात् ही परिस्थिति कायम टिकणार नव्हती.

१८७७च्या सुमारास दक्षिणेंतील राज्यांची सरकारें गोऱ्या लोकांच्या हातीं आलीं. परंतु मुक्त झालेल्या नीग्रोंना परत दास्यांत ढकलण्यांत आलें नाहीं. दक्षिणेचा युध्दांत पराभव झाला, युध्दानें दक्षिणेची दैना अुडवली, पण दक्षिण पुन्हां संघराज्यांत आली होती. यादवींत भाग घेतलेले दक्षिणेंतील लोकच राज्यांचे गर्व्हनर, प्रतिनिधि, सिनेटर होणार होते. तेहतीस वर्षांनी झालेल्या स्पॅनिश-अमेरिकन युध्दांत फिटझूघ ली आणि दक्षिणेंतील अितर सैनिक संघराज्याच्या बाजूनें लढले आणि त्यांनीं आपली कामगिरी अेकनिष्ठपणें आणि अुत्तम तऱ्हेनें पार पाडली. सुरवातीलाहि अेका थोर दाक्षिणात्यानें म्हटल्याप्रमाणें, यापूर्वीं अेवढा नाश जसा झाला नव्हता, तशी पुनर्घटनाहि अितक्या जलदीनें पूर्वीं झाली नव्हती. खंदकांतून सैनिक बाहेर आले आणि शेतांत त्यांनीं लगोलग नांगर धरला. अेप्रिलमध्यें मानवी रक्तानें शिपडून निघत असलेलीं शेतें, जूनमध्यें पिकानें हिरवींगार दिसूं लागलीं. अमेरिकन राष्ट्राला यादवीनें जबर धक्का बसला होता. पण झालेल्या जखमा भरून आल्याच. पुनर्रचनेंत चुका झाल्या, धडपडावें लागलें, दोषहि राहिले, पण अेक झालेल्या जनतेनें प्रगति केली.

ब्रॉंझचें युग, शिशाचें युग

देशाची प्रगति झाली पण ही प्रगति कोणत्या दिशेनें झाली असा प्रश्न अनेक नामवंत आणि शहाण्या अमेरिकनांनीं आणि युरोपियनांनीं विचारला. अमेरिकन अितिहासांत हा प्रश्न सतत विचारला जातो व आजही आहे.

तुम्हीं कुठें जात आहां, तुमचा विचार तरी काय आहे, तुम्हीं अमुकच गोष्टी कां करतां आणि शेवटीं तुम्हीं करणार तरी काय—असे अनेक प्रश्न अुभे केले जातात.

या सर्व प्रश्नांना अेक नमुनेदार अमेरिकन अुत्तर असें देण्यांत येतें कीं, "आम्हीं कोठें जात आहों हें आम्हांला माहित नाहीं, पण आम्हीं मार्गावर मात्र निश्चित आहों". या अुत्तरांत सत्यांश आहे; पण तें अर्धसत्य आहे. नुसतें गप्प बसण्यांत अमेरिकन लोकांना समाधान केव्हांच वाटत नाहीं. नुसतें स्वस्थ बसण्यापेक्षां अेकादी अनिष्ट गोष्ट करण्यांतंहि त्यांना आनंद वाटतो. कसलीच अुभारणी न करण्यापेक्षां चुकीच्या जागीं अुभारणी करून ती पुन्हां मोडण्यांत त्यांना सौख्य वाटेल. अमेरिकन लोकांत चिंतनशील तत्वज्ञ होअून गेले आहेत. पण अेकंदरीनें अमेरिकन लोकांची प्रवृत्ति चिंतनशील नाहीं. कांहींतरी कृति करण्याची त्यांना हौस असते, अेकादी गोष्ट झटपट अुरकून दुसऱ्या गोष्टीकडे वळावयाचें अशी त्यांची प्रवृत्ति आहे. करण्यासारखें कांहींच नसतें तेव्हांच ते खरे दुःखी असतात. गेल्या जागतिक आर्थिक मंदींत यामुळेंच अमेरिकन लोक विशेष खिन्न झाले. त्यावेळीं अमेरिकन अितिहासांत प्रथमच असा प्रसंग आला कीं, जीवनांत कसली हालचालच होत नव्हती. आजच्या चुकांची भरपाअी अुद्यां होअूं शकेल अशी आशावादी वृत्ति त्यांच्या ठिकाणीं आहे. परंतु यामुळेंच त्यांना त्रास भोगावा लागतो. अशा आशावादीपणांतच त्यांचा कमकुवतपणा आहे आणि त्यांचें सामर्थ्यहि आहे. त्यांचें जीवन स्तब्ध नसतें, वाहतें असतें. नवीन शिकण्यास आणि नवीन प्रयोग करण्यास त्यांची नेहमींच तयारी असते. पृथ्वीवरील नंदनवन जरी त्यांच्या स्वाधीन केलें तरी त्यांतहि सुधारणा करण्याच्या खटपटीला ते ताबडतोब लागतील.

अमेरिकन लोकांच्या स्वप्न सृष्टीचें स्वरूप निरनिराळ्या वेळीं निरनिराळें होतें. सरहद्दीवरच्या लोकांचें लढाअू स्वातंत्र्य, संस्थापकांचें लोकसत्ताक, जेफर्सननें रंगविलेलें शेतकऱ्यांचें लोकसत्ताक, अॅन्ड्र्यू जॅक्सनची

सरहद्दीची लोकशाही, 'मी जसा गुलाम होणार नाहीं तसा धनीहि होणार नाहीं, हीच माझी लोकशाहीची कल्पना' असें सांगणाऱ्या लिंकनची लोकशाही, लीनें दाखविलेला निःस्वार्थी सन्मानाचा व स्वार्थत्यागी कर्तव्यशीलतेचा आदर्श, सुसंस्कृत, वैभवशाली, पण लोकसत्ताक पद्धतींत बसणारी सरदारशाही असलेली अुत्तम प्रकारची दक्षिणेंतील मळचांची पद्धति, न्यू अिंग्लंडचें प्युरिटन स्वप्न, कॉनकॉर्डची साधी राहणी आणि अुच्च विचारसरणी—या व न्यू झिआन्स, न्यू हार्मनी, गांवांचे विविध प्रयोग अशा विविध स्वरूपांत अमेरिकन ध्येयजीवनाचा आविष्कार झाला. कम्यूनिझम, समाजवाद, अनेक पत्न्या किंवा अनेक नवरे करण्याची पद्धत, ब्रह्मचर्य, नियोजित प्रजोत्पादन, पैगंबराची सत्ता, वयोवृद्धांची हुकूमत, भूतपिशाच्चांचें मार्गदर्शन, सामाजिक जीवनाचे असे सर्व प्रकारचे प्रयोग अमेरिकेच्या कोणत्या ना कोणत्या भागांत करण्यांत आले आहेत. राष्ट्राविरुद्ध किंवा शेजारच्या विरुद्ध हे प्रयोग करण्यात आले नाहींत तोंपर्यंत असल्या सर्व प्रयोगांना वाव मिळाला. त्यांना पुरेसा अवसर राहिला.

यादवी युद्धानंतर कमींत कमी पन्नास वर्षें तरी अमेरिकन ध्येय, काम, विकास आणि संपत्ति याभोंवतींच फिरत होतें. काम करणें हा सद्गुण ठरला जात होता. पैसा मिळविणें हें सद्गुणाचें लक्षण ठरत होतें. पैसा मिळविलेल्यांना समाजांत मानमरातब मिळत होता. कांहींतरी भव्य करणें, अुभारणें याला महत्व मिळत होतें. कृतीच्या आकारालाच सद्गुणत्व प्राप्त झालें होतें. जे काम करीत नसत किंवा पैसा मिळवीत नसत ते आळशी भोजनभाऊ मानले जात. त्यांना मानमरातब मिळत नसे. कोणत्याहि माणसाच्या कृतींत नाविन्य आढळलें, भव्यता आढळली, किंवा त्या कृतीला बाजारांत किंमत असली तर, त्या माणसाला समाजांत मोठेपणा मिळे. विजेच्या दिव्यासारख्या वस्तूंचें नाविन्य, अुपयुक्तता अनुभवायला मिळत होती, म्हणूनच अेडिसनसारख्या संशोधकाचा अुदोअुदो झाला. पण पदार्थविज्ञानशास्त्र आणि गणित याचा थोर विचारवंत विलार्ड गिब्स् याचें नांवहि क्वचित् अैकूं येत होतें. ती व्यवहारांत अुपयुक्त आहे कां आणि तिची किंमत काय आहे, या कसोटीवरच प्रत्येक वस्तु पारखली जात होती.

अशा प्रकारच्या स्पर्धाशील, आवेशी आणि प्रेरक प्रवृत्तीमुळें अनेक भौतिक कार्यांचा अुठाव झाला आणि अनेक योजना पुऱ्या झाल्या. पर्वत ओलांडून आणि वाळवंटें पार करून खंडाखंडांना जोडणारे आगगाडीचे राक्षसी रस्ते तयार झाले. मानवी शक्तीपेक्षां राक्षसी शक्तीला साजेशीच तीं कामें होतीं. निर्जन ठिकाणीं शहरें निर्माण झालीं. लांकडासाठीं

जंगलेच्या जंगलें तोडण्यांत आलीं. लोखंड, शिसें, सोनें, तेल, टिन, रुपें—ही पृथ्वीच्या पोटांतील संपत्ति प्रचंड प्रमाणावर बाहेर काढण्यांत आली. लोखंडाच्या प्रचंड भट्ट्या रात्रंदिवस धडाडूं लागल्या. ग्रेट ब्रिटन आणि जर्मनी या दोन्हीं राष्ट्रांच्या अेकत्रित अुत्पन्नाअेवढें पोलाद अमेरिकेंत १९०० च्या सुमारास तयार होअूं लागलें होतें. तारायंत्र, टेलिफोन, विजेचे दिवे, अटलांटिकमध्यें टाकलेली केबल, कापणीचें यंत्र, मळणीचें यंत्र, झोडणीचें यंत्र, असे नवे शोध आणि जुन्या यंत्रांतील सुधारणा सतत चालू होत्या. सर्वच शोध अमेरिकन नव्हते. पण कोणताहि नवा शोध हातीं लागला कीं अमेरिकन माणूस त्यांत सुधारणा करी, त्याचे अुत्पादन करी आणि त्यांत पैसे मिळविण्याचा प्रयत्न करी. अेका छोट्याशा सेफ्टी पिनमधूनहि वैभवशाली बनतां येअी. तेल, रेल्वे, खाणी, यंत्रें, शोध अित्यादि सर्वच गोष्टींतून माणसांनीं संपत्ति मिळविली. "अधूनमधून दिवाळें निघे, मंदी येअी, पण त्यामुळें भिअून अुपयोग नाहीं. पुन्हां प्रयत्न करूं आणि यश मिळवूं. आज पैसा घालविला, अुद्यां मिळविला" अशी त्या काळांत अमेरिकन प्रवृत्ति होती. ॲन्ड्र्यू कार्नेजीसारखा माणूस आपल्या पोलादाच्या कारखान्यावर चाळीस कोटी डॉलर्स मिळवू शकला. फारच उत्तम! अेक मेहनती गरीब मुलगा काय करूं शकतो, त्याचें हें अुदाहरण आहे. टेलिफोन, विजेचे दिवे आणि मोटार या गोष्टी प्रत्येकाजवळ असल्याच पाहिजेत अशी सर्वसाधारण माणसाची वृत्ति बनत होती. तुम्हाला नकोना; ठीक आहे. ह्या अनेकांना त्यांची आवड आहे; आज कामाचा दिवस आहे, वेळ आहे. कामाच्या वेळीं कोणालाच स्वस्थता नाहीं. नाट्यगृहें, कारखानें, कोट्याधीश, नवीन विद्यापीठें, नवीन तुरुंग—सर्वच कांहीं भव्य प्रमाणांत होअूं लागलें होतें. पण अुत्साह असा होता कीं याहि गोष्टी आवडल्या नाहींत तर या पाडून टाकूं आणि अधिक मोठ्या, अधिक सुबक अशा गोष्टी पुन्हां अुभारूं. सर्व राष्ट्र कार्यमग्न, गडबडींत असलेलें आढळत होतें. आम्ही कामांत आहों, काम चालू आहे; कुठें जावयाचे तें माहीत नाहीं, पण आम्ही वाट चालत आहों हें खचित! हीच भावना सर्वत्र होती.

अर्थात् या गोष्टी त्यावेळच्या सर्वच अमेरिकनांना लागू नव्हत्या. परंतु त्या काळच्या जीवनाचा अेकंदर रोख असा होता. त्याहि वेळेला देशांत पैशाची पूजा न करणारे, सरळ, पापभीरू असे लक्षावधी लोक होतेच. या गोष्टी आम्हांला नको. पैसा आणि यश यापेक्षां अुच्चतर आणि अधिक टिकणारें असें कांहींतरी आम्हाला हवें आहे असें सांगणारे लोकहि त्या काळांत होतेच. अशा लोकांत अमेरिकेच्या दुसऱ्या राष्ट्राध्यक्षाचा पणतु चार्लस

फ्रान्सीस ॲडॅम्स या पासून तो पूलमन कंपनीच्या, नव्हे संघराज्य सरकारच्या सत्तेविरुद्धहि, संघटना करण्याच्या आणि संप करण्याच्या हक्कासाठीं लढणारा व अिलिनॉयचा गव्हर्नर असलेला जॉन पी. ॲल्टजेल्ड, असे लोक होते. पण अेकंदर गडबड, आवाज, अुभारणी, पैसा, ओरड, यांवरच त्या वेळचें जीवन अुभारलेलें होतें. अन्याय, छळ आणि विषमता यांचा द्वेष्टा आणि अुत्कृष्ट लेखक असलेल्या मार्क ट्वेनसारख्या माणसानें आपलें सर्व आयुष्य आणि पैसा खिळे जुळविण्याच्या अेका यंत्रावर खर्च केला आणि शेवटीं त्याच्या पदरीं यश आलें नाहींच. अशी प्रवृत्ति कां आढळत होती? नुसते लेखक असणें पुरेसें नव्हतें. सर्वसाधारण अमेरिकन माणसाला असणारी यंत्रांची आवड मार्क ट्वेनलाहि होती. शिवाय त्याचें यंत्र यशस्वी झालें असतें तर, क्लार्क टेबर यांप्रमाणेंच आपण यशस्वी होअू आणि अितर लक्षाधीशांसारखा आपणहि लक्षाधीश होअू अशी त्याला आशा होती.

अमेरिकन लक्षाधीश ही अेक अपूर्व व्यक्ति युरोपला वाटूं लागली. खिशांत भरपूर पैसा भरून ते युरोपमध्यें येत. दरिद्री बनलेल्या सरदार आणि राजपुत्रांबरोबर ते आपल्या मुलींचीं लग्नें लावीत. चित्रें, पुतळे, दुर्मिळ ग्रंथ, राजवाडे, बऱ्यावाअीट कलात्मक वस्तु विकत घेण्याचा ते सपाटा लावित. कलावंतांना मदत कर, दिवाळखोर, लबाड, प्रामाणिक कलावंत अशा सर्वांनाच मदत करण्याचा त्यांना छंद असे. मुद्दाम मोडतोड केलेल्या वस्तु जुन्या म्हणून अमेरिकन लक्षाधीश विकत घेत. अर्थात यांत मूर्खपणा किंवा बालिशपणाच असे असें नव्हे. पण पुष्कळसा पैसा मिळविलेल्या माणसाला त्याचें काय करावें हें समजूं नये, तशी त्यांची स्थिति असे. पण सुधारणेच्या निदर्शक अशा वस्तु खरेदी कराव्या अशी मात्र पुसट कल्पना त्यांच्या मनांत असे. क्वचित् जे. पी. मॉर्गन यांच्यासारख्या कांहींना, आपण काय करीत आहों याची जाणीव असे. पण बहुतेकांना त्याची जाणीव नसेच. पुष्कळ वेळां त्यांना फसविण्यांत येअी आणि त्यांची टिंगल होअी. परंतु अमेरिकन श्रीमंतांनीं विकत घेतलेल्या वस्तु अमेरिकेंत येत आणि जनतेच्या आनंदांत आणि फायद्यांत भर पडे.

या सर्व प्रकारांतून काम आणि पैसा यांचा अितर कार्यांत अुपयोग करण्याची प्रवृत्ति निर्माण झाली. पैसा मिळविलेल्या पुष्कळांना संपत्ति मिळवून स्वस्थ बसणें पसंत पडेना. अुद्योगांत सतत निमग्न राहून पैसा मिळविल्यानंतर निरुद्योगी बसणें त्यांना अशक्य होअी. पैशानें अेक प्रकारचें अस्वास्थ्यच निर्माण झालें. पण पैसा म्हणजे सत्ता याची मात्र त्यांना कल्पना होती. सामान्य नागरिक आणि गरीब मुलें म्हणूनच त्यांनीं आयुष्याला

सुरवात केलेली असे. यामुळें मानमरातब मिळविण्याची त्यांना अिच्छा होअी. जरूर तर, पैसा खर्चून त्यांना आपल्या मुलींना 'पदवीधर' युरोपियन नवरे मिळविता येत असत. स्वतःसाठीं त्यांनीं या पदव्या मिळवावयाच्या, पण अमेरिकेंत पदव्यांची पद्धतीच नव्हती! परंतु पैशाचा विनियोग तर केलाच पाहिजे.

गरीबींतून, कष्टांतून वर आलेल्यांपुढील ही समस्या सोडविण्याचा निराळचा दृष्टीनें प्रयत्न झाला. चाळीस कोटींचे मालक असलेले अँड्र्य कार्नेजी यांनीं आपल्या संपत्तीचा बराचसा भाग गरिबांच्या अुपयोगासाठीं मोफत ग्रंथालयें स्थापन करण्यांत खर्च केला. जॉन डी. रॉकफेलर म्हणत, "अीश्वरानेंच ही संपत्ति मला दिली". जगांतील सर्व लोकांना अुपयुक्त ठरणारी औषधाबाबत व विज्ञानाबाबत कार्य करणारी रॉकफेलर फाअुंडेशन ही संस्था त्यांनीं स्थापन केली. गुगेनहीम सारख्या कुटुंबानें गरजू कलावंत, लेखक, गवअी आणि विद्वान अशांना लक्षावधि डॉलर मदत देणारी अेक संस्था स्थापन केली. मेलन आणि क्रेस यांनी खरेदी केलेली अुत्कृष्ट चित्रें आतां सार्वजनिक कलासंग्रहालयांत आहेत. कोणीहि अमेरिकन नागरिक कलासंग्रहालयांत जाअून तीं आतां पाहूं शकतो. जे. पी. मॉर्गन यांच्या मार्गदर्शनाखालीं दुर्मीळ ग्रंथांचा व हस्तलिखितांचा केलेला संग्रह सर्व जनतेला आतां खुला आहे. अमेरिकन जीवनांत निर्माण झालेली ही अेक आश्चर्यकारक आणि चित्तवेधक प्रथा आहे.

अशा प्रकारच्या प्रथेबरोबरच, या काळांतील दरोडेखोर लक्षाधीशांचा अुल्लेख करण्याबद्दल माफी मागण्याची आवश्यकता नाहीं. या लोकांना जनतेची बिलकूल पर्वा नव्हती. भल्याबुऱ्या मार्गांनीं आपल्या संपत्तीचें रक्षण करण्यावर त्यांचें लक्ष असे. "खड्डयांत गेली जनता" असे अुद्गार त्यांच्यापैकीं अेकानें काढले होते. दुसरा अेक म्हणे, अीश्वरानें देशाचें भवितव्य धंदेवाल्यांच्या हातीं सोंपविलें आहे. ते निष्ठुर, पैशाचे लोभी आणि स्वार्थी होते. क्वचित् त्यांच्यापैकीं कांहीं दूरदर्शीहि होते. सारांश धंदेवाल्यांपैकीं वाअीट लोकांना दरोडेखोरांची अुपमा देणेंच योग्य. पण जे चांगल्या वृत्तीचे होते त्यांनीं ज्या कौशल्यांनीं पैसा मिळविला त्याच कौशल्यानें तो वापरला. अशा प्रकारच्या गडबडींत आणि धामधुमींत अमेरिकेचें औद्योगीकरण झालें. पैसा आणि मानवी जीवन यांच्या दृष्टीनें अुद्योगधंद्यांच्या अुभारणींत बरीच अुधळपट्टी झाली. पण अुद्योगधंदे अुभारले गेले. आणि तेहि अकल्पनीय अशा वेगानें अुभारले गेले. यामुळें कांहीं थोडचा लोकांच्या हातांत पैशाचें आणि त्याबरोबर सत्तेचें केंद्रीकरण झालें. परंतु

सर्वसाधारण अमेरिकन माणसाचें जीवनमान जगाच्या अितिहासांत पूर्वी कधींच पोचलेलें नव्हतें अशा अुच्च पातळीला पोंचलें. जगांतील बहुसंख्य जनतेपेक्षां सर्वसाधारण मध्यम-वर्गीय अमेरिकन माणूस सुस्थितींत होता. त्याला अधिक स्वातंत्र्य होतें आणि अधिक संधि होती.

औद्योगीकरणाच्या धामधुमींत, पैशाच्या पाठीमागें सुरू असलेल्या धांवपळींत स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यांतील कल्पना मात्र नष्ट झाल्या नाहींत. १८८०च्या सुमारास हेन्‍री जॉर्ज अेडवर्ड बेलामी आणि मजूर चळवळीच्या पहिल्या प्रणेत्यांनीं लोकशाहीवर येत असलेल्या गंडांतराविरुध्द ओरड करण्यास सुरवात केली होती. १८८८ मध्यें राष्ट्राध्यक्ष क्लेव्हलँड यांनीं असे अुद्‌गार काढले कीं, "ज्या कंपन्या वास्तविक कायद्यानें नियंत्रित आणि जनतेच्या नोकर असावयाला पाहिजेत त्याच कंपन्यांची जनता गुलाम बनली आहे." डेमोक्रॅटिक पक्षातर्फे राष्ट्राध्यक्षपदासाठीं ज्या भाषणानें विल्यम जेनिंग्ज ब्रायन याला अुमेदवार म्हणून मान्यता मिळवितां आली, त्या भाषणांत ब्रायन म्हणाला होता, "स्वातंत्र्याअितक्याच पवित्र अशा अेका प्रश्नाबद्दल मी आज बोलणार आहे. तो प्रश्न म्हणजे, माणुसकीचा आहे; मानवतेचा आहे. कारखान्यांत काम करणारा मजूर मालकाअितकाच धंदेवाला गणला गेला पाहिजे. न्यू यॉर्कमधील व्यापाऱ्याअितकाच दर्जा खेड्यांतील व्यापाऱ्याला मिळायला हवा. सकाळपासून दिवसभर शेतांत राबणारा शेतकरी, व्यापारी संघटनेवर वावरणाऱ्या अुद्योगपतीअितकाच अुद्योगपति आहे. पृथ्वीच्या पोटांत हजारों फूट खालीं जाअून काम करणारे खाणींतील मजूर, मूठभर धनपतींअितकेच धंदेवाले आहेत. या राष्ट्रांतील आणि जगांतील खपणारे मजूर पाठीशीं असतांना, मजुरांच्या डोक्यावर हा कांटेरी मुकुट आम्हीं ठेअूं देणार नाहीं. धनलोभाच्या सुळावर मानवतेचा बळी देता कामा नये."

ब्रायनजवळ कळकळ होती पण अुथळपणाहि होता. वक्तृत्व होतें, पण विचार नव्हते. यामुळें प्रतिगामी आणि संथ वृत्तीच्या मॅककिन्ले या प्रतिस्पर्धी अुमेदवारानें त्याचा पराभव केला. तरीसुध्दां त्याचें महत्त्व राहिलें आणि त्याच्या भाषणांतील चांगला भाग स्मृतिशेष झाला नाहीं. कोणत्याहि मार्गानें पैसा मिळविणारे लोक जसे अमेरिकेंत होते, तसेंच सर्वांशीं शेजारधर्मानें वागून आपलें जीवन व्यतीत करणारे लक्षावधि सामान्य लोकहि अमेरिकेंत होते. आपलें स्वातंत्र्य आणि वारसा म्हणून मिळालेले हक्क याचा त्यांना अभिमान होता. प्रामाणिक, सरळ हृदयाच्या आणि सभ्यतेनें वागणाऱ्या कोणाहि स्त्रीपुरुषाला आपल्यांत सामावून घेण्याची त्यांची

तयारी असे. आपत्तीनें गांजलेल्या किंवा अुपासमार भोगणाऱ्या जगांतील कोणत्याहि जनतेस मदत देण्याची त्यांची तयारी असे. अमेरिकन अुद्योगधंदे, भ्रष्ट अमेरिकन राजकारण, डॉलरची भक्ति हें पाहून युरोपियनांना अगदीं धक्का बसे व ते अगदीं अस्वस्थ होत. परंतु सामान्य अमेरिकनाचा जिव्हाळ्याचा मित्रभाव युरोपीयनांवर अगदीं छाप पाडी.

या सर्व गोष्टी असल्या तरी, अद्याप अमेरिकेंतील स्वातंत्र्याचेंच आकर्षण अितर जनतेला वाटत होतें. १८६० ते १९३० या काळांत तीन कोटी वीस लक्ष परदेशी लोक अमेरिकेंत आले; आणि अमेरिकन समाजांत त्यांना सामावून घेण्यांत आलें. हंगेरियन, बोहिमियन, क्रोट, सर्ब, स्लोव्हाक, पोल, ज्यू, अिटालियन, रुमानियन, रशियन, ग्रीक, ऑस्ट्रियन असे सर्व तऱ्हेचे लोक अमेरिकेंत आले. स्वातंत्र्य, संधि आणि आपलें नशीब अुजळण्याच्या जुन्या हेतूनेंच ते लोक आले. त्यांपैकीं कांहींना अपेक्षित लाभ झाला नाहीं. त्यांना हाल, कष्ट सहन करावे लागले. परंतु पुष्कळांना अपेक्षित संधि मिळाली, अपेक्षित सौख्य मिळवितां आलें. अर्थात् सर्वांनाच समान किंवा अुत्तम संधि मिळाली असें म्हणतां येणार नाहीं. जाहिराती, लक्षाधीश होण्याची अेजंटांनी लावलेली आशा यामुळें लक्षावधि लोक सामान्य मजूर म्हणून आले. त्यांना आपलें जीवन कारखान्यांत, गिरण्यांत आणि खाणींत कष्ट करण्यांतच घालवावें लागलें. पण आम्हीं असें मात्र म्हणूं शकतों कीं, सर्व वंशीयांना स्वातंत्र्याचा मार्ग येथें खुला राहिला. कांहींना कष्ट सोसावे लागले, कांहींना सहजपणें स्वातंत्र्याचा मार्ग आक्रमिता आला पण अॅडॅम्स, ब्राअून, स्मिथ, डग्लस या नांवांअितकींच अॅडॅमिक, प्यूपिन, स्टीनमेट्झ, लॅझॅरस, सारोयन हीं नांवेंहि अमेरिकन नांवें आहेत. त्यांच्या जोमानें, बुध्दीनें आणि त्यांच्या विशिष्ट मूल्यानें ते अमेरिकन बनून गेले. त्यांनीं किंवा त्यांच्या पूर्वजांनी आणलेल्या देणग्यांनी ही भूमी समृद्ध झाली. तेहि आज आमच्या रक्तामांसाचे बनले आहेत.

जागतिक सत्ता म्हणून अभ्युदय

१८९८ मध्यें अमेरिका जागतिक महत्त्वाची सत्ता बनली. आर्थिक, औद्योगिक दृष्टचा जागतिक शक्ति म्हणून अमेरिकेचें श्रेष्ठत्व यापूर्वींच प्रस्थापित झालें होतें. पण स्पॅनिश-अमेरिकन युद्धापासून राजकीय दृष्टचाहि महत्वाच्या राष्ट्रांत अमेरिकेची गणना होअू लागली.

स्पॅनिश-अमेरिकन युद्धाचें दिखाअू कारण क्यूबाची स्पेनच्या गुलामगिरींतून मुक्तता करणें हें होतें. युद्धाचा भडका अुडण्यास तावडतोबीचें कारण हॅवाना बंदरांत "मेन" या अमेरिकन लढाअू जहाजावर झालेला प्रहार होय. या हल्ल्यांत २६० अमेरिकन नौसैनिक आणि अधिकारी मारले गेले. आपलें स्वराज्य स्थापूं अिच्छिणाऱ्या पश्चिम गोलार्धांतील कोणत्याहि जनतेविषयीं अमेरिकेला आपुलकी वाटत असे. "मेन" जहाजाच्या दुःखदायक घटनेंमुळें अमेरिकेला धक्काच बसला व जनता क्रुद्ध झाली. परंतु अनेक वर्षांपासून क्यूबा खालसा करण्यांत यावें असें मत अमेरिकेंत मांडलें जात होतें. क्यूबाबरोबरील अमेरिकन व्यापार व क्यूबामध्यें गुंतलेलें अमेरिकन भांडवल याला महत्व आलेलें होतें. थोडी चिकाटी आणि युक्ति वापरली असती तर, रक्तपाताशिवाय स्पेन आणि अमेरिकेमधील विवाद्य प्रश्नांचा निकाल लागूं शकला असता. पण हें घडलें नाहीं, आणि युद्ध झालें.

स्पेनबरोबर लढाअी झाली तर अमेरिकेंत काय घडेल याचें भविष्य वर्तवणारा अेक लेख युद्धापूर्वी पंधरा वर्षें अेका अमेरिकन पत्रकारानें प्रसिद्ध केला होता. अमेरिकन आरमाराचा नाश होअील, न्यू यॉर्कवर तोफा डागल्या जातील, अमेरिकन शहरांवर बॉम्बफेंक होअील अशा प्रकारचें निराशाजनक चित्र त्या लेखांत रंगविण्यांत आलें होतें. पण प्रत्यक्ष जें घडलें तें बरोबर विरुद्ध होतें.

युरोपांतील सत्तेबरोबर मोठें युद्ध चालविण्याची अमेरिकेची बिलकुल तयारी नव्हती. परंतु स्पेनचीहि कांहींच तयारी नव्हती. अमेरिकन आरमार कार्यक्षम व अतिशय दक्ष होतें. अुलट स्पॅनिश आरमार अगदींच दुर्लक्षिलेलें व त्याच्याजवळ पुरेशीं शस्त्रास्त्रेंहि नव्हती. मॅनिला आणि सॅन्टिअॅगो येथील लढचांत स्पॅनिश जहाजांनीं मोठचा धैर्यानें तोंड दिलें. पण धैर्यानें तोफांचें काम होअू शकत नाहीं. स्पॅनिश अरमारांतील दोन काफिल्यांचा पूर्ण नाश झाला आणि यासाठीं विसापेक्षांहि कमी अमेरिकन

सैनिक बळी द्यावे लागले. लास ग्युआसिमास, अेल कॅनी आणि सॅन जुआन येथें स्पॅनिश सैन्यानें मोठें कौशल्य आणि शौर्य दाखविलें, पण चार महिन्यांच्या आंतच स्पॅनिश आरमार आणि लष्कर यांची शक्ति कोसळून पडली आणि नवीन जगांतील शेवटलें स्थानहि स्पेनला गमवावें लागलें.

अमेरिकेला मिळालेल्या निर्णायक आणि झटपट विजयानें युरोप आश्चर्य-चकितच झालें. अमेरिकेला श्रीमंत आणि समृद्ध राष्ट्र म्हणून मानण्यांत येअी. पण लष्करी दृष्टचा सामर्थ्यवान म्हणून अमेरिकेला मान नव्हता. अेकाद्या नवख्या पहिलवानानें नामवंत पहिलवानाला हरवावा असा परिणाम या युद्धामुळें युरोपवर झाला. जागतिक राजकारणांत अेक नवीन आणि अपरिमित शक्तीची आणखी अेक सत्ता निर्माण झाली..

अमेरिका आणि अमेरिकन नागरिक यांच्यावर या लढाअीचा काय परिणाम झाला? पोर्टो रिको अमेरिकेच्या ताब्यांत आलें. जेव्हां लढाअी पुकारण्यांत आली, तेव्हां अमेरिकन कॉंग्रेसनें पुढील आशयाचा अेक ठराव संमत केला होता. "क्यूबा बेटावर सार्वभौम सत्ता गाजविण्याची, अंमल ठेवण्याची किंवा नियंत्रण ठेवण्याची अमेरिकेची आकांक्षा नाहीं. फक्त तेथें शांतता प्रस्थापित करण्याचा अमेरिकेचा हेतु आहे. हा हेतु साध्य झाला कीं, त्या बेटाचा कारभार आणि सत्ता तेथील जनतेच्या हातीं देण्याचा निश्चयहि अमेरिका व्यक्त करीत आहे." कॉंग्रेसच्या ठरावाच्या मर्यादेनुसार अमेरिकेनें क्यूबावर संरक्षक अधिकार मिळविले. ग्वॅम अमेरिकेच्या हातीं आलें. स्पेनला दोन कोटी डॉलर देअून अमेरिकेनें स्थानिक जनतेचा विरोध असतांहि फिलिपाअीन्सवर अधिसत्ता मिळविली. याचवेळीं हवाअी बेट आपण होअून अमेरिकेंत सामील झालें.

आपलें भवितव्य घडविण्यासाठीं आमच्या कारभारांत कोणीहि ढवळाढवळ करूं नये असें म्हणणारें अमेरिकन राष्ट्र अेकाअेकीं दूरवर पसरलेल्या मुलखाचें मालक बनलें. तेथील जनता अमेरिकेच्या दास्यांत पडली. अमेरिकन साम्राज्याचा हा जणूं पायाच घातला गेला, असें भासलें. अमेरिकन ध्येयाशीं विरोधी म्हणून फिलीपाअीन्स काबीज करण्यास विरोध करणाऱ्या नामवंत अमेरिकनांनीं "अमेरिकन साम्राज्यवाद" म्हणूनच त्याची संभावना केली. पण प्रत्यक्ष अनुभव पाहणें अिष्ट.

क्यूबांतील लढाअी संपतांच लष्करी गव्हर्नर जनरल वुड यानें घटना बनविण्यासाठीं क्यूबांतील जनतेची अेक घटना समिति भरविली. घटना तयार करण्यांत आली आणि क्यूबा अेक लोकसत्ताक राज्य बनलें. राष्ट्राध्यक्ष, अुप-राष्ट्राध्यक्ष, सिनेट आणि प्रतिनिधि सभा अशी राज्यपद्धति निर्माण करण्यांत

आली. परंतु घटनेंतील 'प्लॅट' दुरुस्तीनें क्यूबाचें स्वातंत्र्य आणि अैक्य टिकविण्यासाठीं क्यूबांतील कारभारांत हात घालण्याचा हक्क अमेरिकेला देण्यांत आला. पुढील वीस वर्षांत क्यूबाच्या कारभारांत अमेरिकेनें अनेक वेळां ढवळाढवळ केली. पण १९३४ सालीं क्यूबाबरोबर झालेल्या नव्या तहानें 'प्लॅट' दुरुस्ती रद्द करण्यांत आली व क्यूबाच्या अंतर्गत कारभारांत हात घालण्याचा अमेरिकेचा अधिकार नष्ट करण्यांत आला. आर्थिक दृष्टचा आणि क्यूबांत गुंतविलेल्या अमेरिकन पैशामुळें क्यूबा अमेरिकेशीं बांधलें गेलें आहे. हीं बंधनें क्यूबाला नेहमींच फायदेशीर ठरतात असें नाहीं. परंतु दोन्हीं देशांत अधिकाधिक मित्रभाव राहील अशी अपेक्षा ठेवली जाते. आपला कारभार चालविण्यास क्यूबा पूर्ण समर्थ असल्याचेंहि आढळून आलें आहे.

पोर्टो रिकोंतील जनतेला अमेरिकन नागरिकत्व मिळतें. तेथील कारभार, अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनीं नेमलेला गव्हर्नर, तेथील जनतेनें निवडलेल्या विधिमंडळाच्या साहाय्यानें चालवितो. पोर्टो रिकोंतील आर्थिक प्रश्न बिकट आहे आणि पालक या नात्यानें अमेरिकेनें तो प्रश्न सोडविला आहे असें म्हणतां येणार नाहीं. तरीसुद्धां शिक्षण आणि सार्वजनिक स्वच्छता, रस्ते, व्यापार या दृष्टीनें प्रगति झाली आहे. पोर्टो रिकोंतील नवीन पिढीला राज्यकारभार चालविण्याचेंहि शिक्षण दिलें जात आहे.

१९०० सालच्या अेका कायद्यानें हवाअीच्या सर्व नागरिकांना अमेरिकन नागरिकत्व बहाल करण्यांत आलें आणि अमेरिकेचा प्रदेश म्हणून तेथील कारभार चालतो. थोडचाच काळांत हवाअी अमेरिकेंतील अेक राज्य बनेल हें निःसंशय. हवाअीचा कारभार अमेरिकेच्या अध्यक्षांनीं नेमलेला गव्हर्नर पाहतो. याशिवाय, जनतेनें निवडलेलें सिनेट आणि प्रतिनिधि सभा असें विधिमंडळहि तेथें आहे. अमेरिकन कॉंग्रेसमध्यें हवाअीचा अेक प्रतिनिधि असतो. हवाअी बेटें अतिशय सुपीक असून, अुष्ण कटिबंधांतील अनेक तऱ्हेचें अुत्पन्न तिथें मिळतें. अेकंदर प्रदेशहि सुंदर आहे. अमेरिकन राज्यपद्धतीवर तेथील लोक खूष आहेत. शेवटीं घटक राष्ट्राचा दर्जा मिळविण्यावर त्यांची दृष्टी आहे.

फिलीपाअीन्सचा प्रश्न अपूर्व व अुल्लेखनीय असा आहे. फिलीपाअीन्सवर सक्तीनें ताबा मिळविण्यांत आला यांत बिलकुल संशय नाहीं. १९०२ पर्यंत अमेरिकेविरुध्द फिलीपाअीन अुठाव चालू होता. पण अमेरिकन अंमलाखालीं शाळा व रस्ते बांधण्यांत आले, कॉलरा आणि देवी हे रोग बव्हंशीं नष्ट करण्यांत आलें. शाळेंत जाणाऱ्या मुलांची संख्या १८९८ सालीं पांच हजारांपेक्षांहि कमी होती. परंतु १९२० सालीं ही संख्या दहा लाखांवर

गेली. मनिलांतील बालमृत्यूचें प्रमाण शेंकडा ८० टक्क्यांवरून २० टक्क्यांवर आलें. मोठमोठ्या जमिनींची शेतकऱ्यांना विकत घेतां येतील अशी विभागणी करण्यांत आली. १९०० सालीं ७० लाख असलेली लोकसंख्या आज अेक कोटि साठ लक्षांअेवढी वाढली आहे. "स्थिर सरकार स्थापंन झाल्याबरोबर" फिलीपाअीन्समधून निघून जाण्याचें अभिवचन १९१६ सालीं अमेरिकेनें दिलें. १९३४ च्या टायडींग्ज-मॅक्डफी कायद्यानें असें ठरविण्यांत आलें कीं, फिलीपाअीन प्रमुखाच्या नेतृत्वाखालील वसाहतीच्या दहा वर्षांच्या स्वराज्यानंतर फिलीपाअीन्सला पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत यावें. १९३५ मध्यें संमत झालेल्या घटनेनुसार अेक राष्ट्राध्यक्ष आणि अेक राष्ट्रीय असेंब्ली असावी. त्या सर्वांची निवड मतदानानें व्हावी असें ठरविण्यांत आलें. धार्मिक, वृत्तपत्रीय आणि संघटनेच्या स्वातंत्र्याची घटनेंत हमी देण्यांत आली. जपाननें फिलीपाअीन्सवर स्वारी करीपर्यंत ही सर्व व्यवस्था सुरळीत चालू होती. अुद्योगी, बुद्धिवान आणि समर्थ अशा फिलीपाअीन्स जनतेला अमेरिकन अंमलाखालीं निश्चित कांहीं फायदे झाले. परंतु स्वराज्याचा अधिकार त्यांनीं प्रतिपादन केला आणि अमेरिकेनेंहि तो अधिकार मान्य केला. जपानी आक्रमणाविरुद्ध फिलीपाअीन्सची जनता व अमेरिकन यांनीं बरोबरीनें फिलीपाअीन्सचें रक्षण केलें. हा प्रतिकार अितक्या अेकोप्यानें चालू होता कीं, जनरल मॅकार्थर यांनीं "फिलमेरिकन" असा अेक शद्बच तयार केला. आणि कोणताहि अपराध नसतां गेलेलें स्वातंत्र्य मिळवून देण्याचें अभिवचन अमेरिकेनें फिलीपाअीन्सला दिलें होतें.

ग्वॅम, मिड्वे आणि वेक हे अमेरिकेचे पॅसिफिकमधील आरमारी तळ आहेत. गेल्या महायुद्धांत अमेरिकेला हे तळ गमवावे लागले होते. १९१७ सालीं डेन्मार्ककडून दोन कोटी पन्नास लक्ष डॉलरला विकत घेतलेलीं डॅनिश वेस्ट अिंडीज आतां व्हर्जिन बेटें या नांवानें अमेरिकेच्या ताब्यांत आहेत.

क्यूबाचें लोकसत्ताक, फिलीपाअीन्सचें वसाहतीचें स्वराज्य, पोर्टो रिकोच्या जनतेला अमेरिकन नागरिकत्व आणि हवाअीला राज्याचा दर्जा देणाऱ्या अमेरिकन साम्राज्यवादाची अशी हकीगत आहे. हा साम्राज्यवाद नेहमींच शहाणपणानें व निःस्वार्थीपणानें वागलेला नाहीं. परंतु हातांत सांपडलेल्या प्रदेशांना शाळा, आधुनिक वैद्यकीय अुपचार व स्वराज्याची पद्धति या गोष्टी देण्याचें श्रेय साम्राज्यवादाला दिलें पाहिजे. "तुम्हीं आहां तसेंच राहिलें पाहिजे. तुम्हीं आमचे गुलाम म्हणून वावरलें पाहिजे" अशी दंडेली कोणत्याच जनतेला दाखविण्यांत आली नाहीं. "तुमचा कारभार कायमचा चालविण्याची आमची अिच्छा नाहीं. अर्थात् तें आम्हांला अशक्य नाहीं.

पण त्यामुळें आम्हींच अस्वस्थ होऊं. अमेरिकन ध्वजाखालीं गुलामगिरी आम्हाला केव्हांच मान्य नाहीं. आम्हाला वाचन, लेखन, शाळा, रुग्णालयें हवीं, गुलामगिरी नको. आमच्या राष्ट्राला स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं पडलेल्या कष्टांची आम्हांला आठवण आहे. मांडलिक राष्ट्रापेक्षां, पश्चिम गोलार्धांतील प्रश्न सोडविण्यासाठीं आमच्याशीं सहकार्य करणारे स्वतंत्र शेजारी आम्हांला हवे." अशा प्रकारची वृत्ति अमेरिकेनें आपल्या ताब्यांतील लोकांबाबत दाखविली.

अमेरिकेचें तत्त्व आणि व्यवहार अशा प्रकारचा आहे. चुका केलेल्या नाहींत असा दावा आम्हीं मांडत नाहीं आणि मांडू शकत नाहीं. कोणतेंच राष्ट्र दोषरहित नाहीं. अमेरिकेचें यशहि डागळलेलें आहे. शेजाऱ्यांना बंधनांत टाकणाऱ्या आणि त्यांचा नाश करणाऱ्या प्रत्येक पावलानंतर, बंधनें सैल करणारें आणि त्यांची सुधारणा करणारें पाऊल टाकण्यांत आलें. हैती, निकारागुआ, डोमिनिकन रिपब्लिक येथें अनेक वेळां अमेरिकन सैन्य पाठविण्यांत आलें. परंतु तें सैन्य मागेंहि घेण्यांत आलें. शेजारच्या मेक्सिकोंतील क्रान्तिकाळांत आणि नंतरच्या धामधुमीच्या काळांत अेकदां व्हेराक्रूझ येथें अमेरिकन नौदलाचे सैनिक अुतरलेहि होते आणि अमेरिकन हद्दींत शिरून करण्यांत आलेल्या व्हिलाच्या हल्ल्यांत अमेरिकन सैन्य मेक्सिकन भूमीवर घुसलेंहि होतें. पण कांहींच न जिंकतां अमेरिकन सैन्य परत आलें. मेक्सिकोबरोबर लढाई झाली नाहीं. आम्हांला जिवंत राहण्यास थोडी जागा पाहिजे, समान सौख्याच्या पट्ट्यांत मध्य अमेरिकेला ढकललें पाहिजे अशी ओरड अमेरिकेनें केली नाहीं. डॉलरचें राजकारण, दडपशाहीचें राजकारण आपोआप नष्ट झालें. आणि त्या अैवजीं मालक म्हणून नव्हे तर, शेजारी म्हणून राहूं अिच्छिणारें राजकारण पुढें आलें. आज यासाठीं चाललेल्या धकाधकींत मेक्सिको, मध्य अमेरिकेंतील लोकसत्ताक राज्यें आणि दक्षिण अमेरिकेंतील दोन खेरीज अितर राष्ट्रें अमेरिकेच्या बाजूला स्वखुषीनें आहेत.

पनामा कालव्याचा प्रदेश हा चाळीस मैल लांबीचा आणि दहा मैल रुंदीचा अेक पट्टा आहे. १८ नोव्हेंबर १९०३ या दिवशीं नवीनच स्थापन झालेल्या पनामाच्या लोकसत्ताकाबरोबर झालेल्या तहानुसार, या पट्ट्याचा "वापर, ताबा आणि नियंत्रण" हीं अमेरिकेनें मिळविलीं. त्यावेळीं पनामा सरकारला अेक कोटी डॉलर देण्यांत आले आणि पुढें नअु वर्षांनीं वार्षिक भाडें देण्यांत येअू लागलें. सध्यां हें भाडें वार्षिक चार लक्ष तीस हजार डॉलर आहे. पनामा विभागाचा गव्हर्नर हा वॉशिंग्टनमधील युद्धखात्याच्या सेक्रेटरीला जबाबदार असतो; आणि युद्धकालांत या जागीं एकाद्या लष्करी

अधिकाऱ्याचीच अध्यक्ष नेमणूक करतात.

पनामा कालवा ही अिंजिनिअरिंगची मोठी आणि यशस्वी कामगिरी आहे. शांततेच्या व्यापारासाठीं दोन महासागरांना हा कालवा जोडतो. पण युद्धकाळांत अमेरिकेच्या आरमारी संरक्षणांतील हा कालवा म्हणजे अेक मर्मस्थान आहे. परंतु हा पट्टा मिळविण्यासाठीं कोलंबियाच्या लोकसत्ताका-विरुद्ध, रक्तहीन कां होअीना, पण क्रान्तीला अमेरिकेनें पाठिंबा दिला आणि दक्षिण अमेरिकेंत संशयाचें आणि पेंचप्रसंगाचें वातावरण निर्माण केलें ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं. परंतु, कालांतरानें अमेरिकेच्या सुस्वभावी वागणुकीमुळें अडचणी दूर झाल्या. १९२२ मध्यें पनामांतील अुठावाबाबतच्या गैरसमजुती दूर करण्यासाठीं आणि कालव्याच्या विभागांतील मालकी हक्कादाखल अमेरिकेनें कोलंबियाला २ कोटी ५० लक्ष डॉलर दिले. पूर्वींचें साम्राज्यवादी धोरण सोडून शेजारधर्माचें धोरण अवलंबिण्याच्या मार्गावर या घटनेनें आणखी अेक पाअूल टाकण्यांत आलें.

असा आहे अमेरिकेचा पूर्वेतिहास. त्यांत पूर्णत्व आहे असें आम्हीं म्हणत नाहीं. फक्त जर्मनी आदि राष्ट्रांच्या शेजाऱ्यांबरोबरील वागणुकीशीं ही वागणूक तोलून पहा अेवढेंच आमचें म्हणणें आहे. दुसऱ्या राष्ट्रांना दास्यांत लोटण्यासाठीं आमचे लोक फिरत नसतात. अेकाद्या वंशाला किंवा राष्ट्रालाच स्वामित्वाचे गुण मिळालेले असतात असे विचार अमेरिकन राष्ट्राला कधींच आकर्षक वाटलेले नाहींत. अशा प्रकारच्या कल्पना बाळगणारा कोणताहि माणूस व्यक्तिवादी विचारसरणीच्या अमेरिकन राष्ट्राचें नेतृत्व करूं शकणार नाहीं.

परिचित अमेरिका

१९०० सालापासून आतांपर्यंत अमेरिकन जीवनांत फरक, बदल घडलेला आहे. झगडा करावा लागला. थिओडोर रूझव्हेल्ट यांचें "स्क्वेअर डील", वुड्रो विल्सन यांचें "न्यू फ्रीडम्", फ्रँकलिन डिलानो रूझव्हेल्ट यांचें "न्यू डील" या सर्वांचा या झगड्यांत भाग आहे. अेक प्रकारें कोणत्याहि स्वतंत्र देशांत चालणारा हा सनातन झगडा आहे. पुरोगामी आणि प्रतिगामी, आहे ती स्थिति टिकविणारे आणि सुधारणावादी, जनतेच्या हातीं फार सत्ता असे मानणारे आणि जनतेला अधिक सत्ता दिली पाहिजे असें म्हणणारे—यांच्यामधील हा झगडा आहे. परंतु, प्रयत्नशील, अद्याप शिकाअू असलेल्या आणि अेकाद्या वर्गासाठीं नव्हे तर सर्व जनतेला काय अुपयुक्त ठरेल हें शोधू पाहणाऱ्या, अेका राष्ट्राचा हा झगडा आहे.

यांत अेकादा कायदा महत्त्वाचा नाहीं कीं अेकादा राष्ट्राध्यक्ष अुल्लेखनीय नाहीं. महत्व आहे तें झगड्याला, प्रयत्नाला. अमेरिकन जनतेला तुम्हीं दुसरें कांहींहि म्हणा पण अमेरिकन जनता सहज दबून जाणार नाहीं.

गेल्या शतकांतील नवव्या दशकांत भांडवलशाहीला भरती आलेली होती. त्यावेळीं असें वाटत होतें कीं, आर्थिक आणि त्याबरोबरच राजकीय सत्तेचें केंद्रीकरण अशा पराकोटीला जाअील कीं, कोट्याधीशांच्या हातीं राष्ट्राचीं सूत्रें जातील. पण तसें कांहींच घडलें नाहीं. अेकीकडे मोठमोठ्या कंपन्या आणि कोट्याधीश सर्व सत्ताधीश होत असतांनाच जनता म्हणूं लागली होती कीं, लहान मुलांनीं कारखान्यांत काय म्हणून काम करावें ? मालक अेकी करतात मग कामगारांनीं संघटित कां होअं नये ? आमच्या राज्यसरकारांचा आणि शहरांतील कारभार नीटपणें कां चालत नाहीं ? दारिद्र्याचा अभाव आणि थोडीफार संपत्ति या जुन्या अमेरिकन कल्पनेचें काय झालें ? अमेरिकन अुद्योगधंदे कसे चालतात, फायदा कोणाला मिळतो आणि त्याची वांटणी कशी होते ? हे प्रश्न विचारणाऱ्यांची, सुधारणावादी, चंचल, फाजील अुत्साही, लांब केसांचे ध्येयवादी अशी संभावना झाली. पण प्रश्न विचारण्याचा अुद्योग त्यांनीं सोडला नाहीं. त्यांच्या प्रश्नांतून अनेक बदल, सुधारणा आणि प्रयोग झाले.

अमेरिकन अुद्योगधंदे पैसेवाल्यांना विकत घेतां येतील अशा वस्तूंचें अुत्पादन करण्यावर अुभारलेले नाहींत. बहुजन समाजासाठीं आणि बहुजन

समाजाला परवडेल अशा किमतींत देतां येणाऱ्या अनेक वस्तु तयार करण्यांत अमेरिकन कारखाने गुंतलेले असतात. फोर्ड मोटार, अेक डॉलर किंमतीचें घड्याळ, दहा सेंटला मिळणारा सूपचा डबा, स्वस्त वृत्तपत्र आणि मोफत रेडिओ, तयार कपडे आणि फक्त ४४ सेंट खर्चून पाहतां येअील असा कांहीं लाखांचा चित्रपट या गोष्टी अमेरिकन धंद्यांच्या खऱ्या निदर्शक आहेत. या व अशा प्रकारच्या लाखों वस्तु तयार करण्याचें कामीं सर्व कसब आणि चातुर्य खर्ची पडतें. कौशल्य वापरलें नाहीं तर, अुपयुक्त नाहीं म्हणून त्या वस्तु अमेरिकन फेंकून देतील. न पळणाऱ्या मोटार गाड्या आणि बंद पडणारीं घड्याळें किंवा वेळोवेळीं मोडणारे टेलिफोन, त्यांना नको असतात. आपण विकत घेतलेल्या वस्तु सोयीच्या, कौशल्याच्या आणि कमी किंमतीच्या असाव्यात अशी अमेरिकन लोकांची अपेक्षा असते. अर्थात् त्यांना अगदीं अुत्तम वस्तूच मिळतात असें नाहीं. पुष्कळशा युरोपीयन वस्तु अधिक सुंदर, अधिक टिकाअू असतात. परंतु मोठ्या प्रमाणावरील मागणी आणि अुत्पादन यामुळें जीवन सुलभ, सुखी आणि समृद्ध करणाऱ्या वस्तु कोणत्याहि कुटुंबाच्या आवाक्यांत असतात. मोठ्या प्रमाणांत मालाचा अुठाव करून फायदा मिळविण्याकडे अमेरिकनांची प्रवृत्ति असते. परंतु यामुळेंच जीवनमान वाढलें आणि अद्यापहि वाढत आहे. भविष्य कालांत सुधारणा करावयाची आहे, यावर अमेरिकन जनतेची पूर्ण निष्ठा आहे.

अुद्योगधंदे आणि राजकारण याबाबतींत अमेरिकेंतील समाज अद्यापहि स्थिरावलेला नाहीं. अमेरिकेचे माजी अध्यक्ष फ्रँकलिन डी. रूझव्हेल्ट हे राष्ट्रसेवेंत प्रख्यात असलेल्या व अनेक पिढ्या सुखांत असलेल्या घराण्यांतले होते. त्यांचे परराष्ट्र मंत्री असलेले कॉर्डेल हल हे आगगाडीच्या मार्गापासून दहा मैल दूर अत्यंत सामान्य परिस्थितींत जन्माला आले. त्यांचे माजी व्यापार मंत्री आणि अुधार-अुसनवार मंत्रणेचे प्रमुख हॅरी हॉपकिन्स हे खोगीर वगैरे तयार करणाऱ्या अेका माणसाचे पुत्र होत. मॅसॅच्युसेट्सचे माजी गव्हर्नर हे १६३० मध्यें मॅसॅच्युसेट्सचे वसाहतींत आलेल्या अेका अिंग्लिश सरदाराचे वंशज आहेत. न्यू यॉर्कचे सध्यांचे मेयर फिओरेलो अेच्. ला गार्दिआ हे अेका अिटालियन बँडमास्तरचे पुत्र आहेत. ले. ज. विल्यम न्यूडसेन या थोर अुद्योगपतीचा आणि यशस्वी कारखानदाराचा जन्म डेन्मार्कमध्यें झाला. सर्वोच्च न्यायालयाचे सन्माननीय न्यायाधीश फेलिक्स फ्रँकफ्युर्टर हे ज्यू आअीबापांच्या पोटीं ऑस्ट्रियांत जन्मले. या सर्व गोष्टी आम्हांला चालतात आणि आम्हांला त्यांविषयीं अभिमानहि आहे. बापजाद्यांच्या मोठेपणावर अुड्या मारणाऱ्या लोकांपेक्षां स्वतःच्या पायांवर अुभे राहणारे लोक ज्यांत आहेत आणि जेथें

प्रत्येकाच्या शक्तींना पूर्ण अवसर मिळेल असा हा देश असावा अशी आमची अिच्छा आहे. आणि वस्तुस्थिति नेहमींच या अिच्छेप्रमाणें आहे.

शिक्षणाविषयीं अमेरिकेला विशेष आदर आहे. कांहीं ठराविक वयापर्यंत सक्तीचें शिक्षण असावें आणि पुढेंहि ज्याला शिक्षण घ्यावयाचें असेल त्याला तें मोफत मिळावें अशी आमची अिच्छा असते. लढाअू जहाज किंवा रणगाडा हें अमेरिकेचे प्रतीक नाहीं. शाळागृह हेंच अमेरिकेचें नमुनेदार प्रतीक आहे. अमेरिकेंत १६०० पेक्षां अधिक विद्यापीठें आणि कॉलेजें आहेत आणि १९३८ सालीं त्यांत १३,५१,९०५ अेवढे विद्यार्थी शिक्षण घेत होते. १९४० सालीं मिशिगन विद्यापीठांत १३ हजार विद्यार्थी होते तर, अिलिनॉय विद्यापीठांत १५ हजार विद्यार्थी होते. या सर्वच विद्यापीठांचा आणि कॉलेजांचा दर्जा युरोपीयन विद्यापीठांच्या जुन्या परंपरांअितका थोर नाहीं. हिटलरपूर्व काळांतील जर्मनी, फ्रान्स आणि स्कॅन्डिनेव्हियन राष्ट्रांतील शाळा अधिक दोषरहित होत्या आणि तेथील शिक्षणपद्धतीचा अमेरिकन शाळांत मागमूसहि आढळत नव्हता. पण १९३० सालापासून अमेरिकन विद्यापीठांतून आणि कॉलेजांतून नोबेल पारितोषकें मिळविणारे तीन पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ, दोन रसायनशास्त्रज्ञ, दोन वैद्यकशास्त्रज्ञ आणि तीन साहित्यिक निर्माण झाले. कॅलिफोर्नियांत होमरचा, कान्सासमध्यें रेसाअिनचा, पेनसिल्व्हानियांत गटेचा अभ्यास चाललेला तुम्हांला आढळेल. राष्ट्रांतील प्रत्येक माणूस साक्षर व्हावा आणि शिकण्याची अिच्छा असणाऱ्या सर्वांना अुच्च शिक्षण खुलें राहावें असें अमेरिकेचें ध्येय आहे. अद्याप हें ध्येय गांठलेलें नाहीं. पण त्याकडे वाटचाल मात्र चालू आहे.

राष्ट्रीय व्यवहारावर सत्ता गाजविणारी लष्करी जात अमेरिकेंत नाहीं. अमेरिकन खड्या लष्कराचे आणि आरमाराचे अधिकारी प्रथमपासूनच राजकारणाबाहेर राहतात. अमेरिकेच्या आतांपर्यंतच्या अितिहासांत अेकहि सेनापतीनें किंवा आरमारी प्रमुखानें सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. वेस्ट पॉअींट आणि अॅनापॉलिस या लष्करी आणि आरमारी विद्यालयांत सर्वच राज्यांतील अुमेदवारांना घेण्यांत येतें. परंतु अत्यंत कठीण अशा परीक्षेनंतरच अुमेदवारांची निवड करण्यांत येते. पैसा किंवा निळें रक्त (उच्च कुलीनता) यांचा वशिला तेथें अुपयुक्त ठरत नाहीं. विद्यालयांतील अभ्यासक्रमांत नापास ठरणाऱ्यांना कसल्याहि राजकीय दडपणानें ठेवून घेण्यांत येत नाहीं. अमेरिकन सैन्य सर्व जनतेचें असतें आणि जनतेचेंच तें प्रतिनिधित्व करतें. अेक मुलकी अधिकारीच, म्हणजे अमेरिकेचा अध्यक्ष हा, अमेरिकन सैन्याचा सरसेनापति असतो.

आजच्या अमेरिकेबद्दल अशा कांहीं लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी आहेत. आमच्यापुढील सर्व प्रश्न आम्ही सोडविलेलें नाहींत याची आम्हाला जाणीव आहे. पुष्कळ काळपर्यंत अमेरिकेंतील मजूर संघटना, मजूरविषयक कायदे, औद्योगिक नियंत्रण, कारखान्यांतील सुरक्षिततेविषयींचे कायदे, ब्रिटन व युरोपांतील अनेक राष्ट्रांतील कायद्यांच्या मानानें मागासलेले होते. गेल्या तीस वर्षांपासून हें अंतर भरून काढण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे आणि अंतर कमी होत आहे. अमेरिकेंतील सामाजिक सुरक्षिततेचा कायदा परिपूर्ण नाहीं, पण त्याचा अंमल चालू आहे. गेल्या दहा वर्षांत प्रचंड प्रमाणांत वाढलेल्या आमच्या कामगार संघटना अद्यापहि आकार घेत आहेत. संपत्तीची विषमता मोठ्या प्रमाणावर आहे. प्रत्येक अमेरिकनाला चांगला पगार मिळतो, अुत्तम अन्न मिळतें, अुत्तम निवारा आहे, असें नाहीं. पण आमच्या भूतकाळापेक्षां आमचा भविष्यकाळ अुज्वल असेल अशी आमची श्रद्धा आहे. आमच्या राष्ट्राचा कणा असलेला सामान्य माणूसच भविष्याचा मालक राहणार आहे.

नफ्याच्या पाठीमागें लागलेल्या पैसेवाल्यांच्या हातीं आमच्या देशांतील सत्ता राहील अशी कांहींना भीति वाटते. अेक बेबंद जमाव आम्हीं बनूं अशीहि भीति कांहीं लोक व्यक्त करतात. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. पुढेंहि तशी होणार नाहीं. अन्याय आणि जुलूम स्वस्थ बसून सहन करण्याची आमची प्रवृत्ति नाहीं. अनिष्ट गोष्टी अुजेडांत आल्या नाहींत, जनतेनें त्यांविरुद्ध ओरड केली नाहीं, हल्ला चढविला नाहीं असें अमेरिकेंत कधींच घडलें नाहीं. चालू शतकाच्या सुरवातीपासूनची प्रगति सरळ चढत्या क्रमानें झालेली नाहीं. त्यांत चढअुतार आहेत, पण ती निश्चित प्रगति आहे. सामान्य माणसाचें स्वातंत्र्य धोक्यांत आणणारें संपत्तीचें केंद्रीकरण झालें नाहीं तोंच थिओडोर रूझव्हेल्ट यांच्यासारखा, संपत्तीचा दुरुपयोग करणाऱ्यांचा निषेध करणारा, आणि अुद्योगधंद्यांवर नियंत्रण ठेवावें असें सांगणारा माणूस निर्माण झाला. राष्ट्राध्यक्षपदावर आरूढ होतांना वुड्रो विल्सन यांनीं सांगितलें, "आमच्या औद्योगिक कामगिरीबद्दल आम्हांला स्वाभिमान वाटतो. पण मानवी श्रम विचारांत न घेण्यांस आम्हीं अद्याप सुरवात केलेली नाहीं. जनतेकडे पाठ फिरवून, खाजगी व स्वार्थी हेतूसाठीं सरकारचा अनेक वेळां अुपयोग करण्यांत आला. ज्या औद्योगिक व सामाजिक प्रवाहावर जनतेला नियंत्रण ठेवतां येत नाहीं किंवा त्याबरोबर टक्कर देतां येत नाहीं त्यापासून जनतेचें संरक्षण केलें नाहीं तर समानता किंवा संधि अुरणारच नाहीं. मला साहाय्य देण्यास सर्व प्रामाणिक माणसांना मी आवाहन करतो." फ्रँकलिन डी. रूझव्हेल्ट यांनीं

राष्ट्राध्यक्षपदाच्या आपल्या पहिल्या निवडणुकीच्या प्रचारांत आर्थिक मनोऱ्याच्या तळाच्या माणसाकडे प्रामुख्यानें जनतेचें लक्ष वेधलें आणि असा आग्रह धरला कीं, या तळाच्या माणसाला मदत देण्यासाठीं कांहींतरी केलें पाहिजे.

नुसती शाद्बिक चळवळ झाली असें नाहीं, शद्बांना कृतीची, कायद्यांची जोड मिळाली. वरील शद्बांत आढळणारी ध्येयप्रवणता, जीवनाचा न्याय्य आणि समान क्रम शोधून काढण्याची कळकळ, अमेरिकेंत नवीन नाहीं कीं तात्पुरती नाहीं. आमच्या मनांत खोल रुजलेल्या श्रद्धा आणि प्राचीन परंपरा यापर्यंत तिचा आढळ होअील. आमच्या शरीरांत ती ध्येयप्रवणता भिनली आहे. क्वचित् दारूबंदीसारख्या मूर्ख चुका ध्येयमार्ग आक्रमीत असतां आम्हीं करूं हें कबूल पण अेकदां चूक समजून आल्यावर आम्हीं ताबडतोब त्यांत दुरुस्ती करतों. स्वराज्याच्या दीर्घकालीन शिक्षणानें, धार्मिक स्वातंत्र्य आणि अुच्चार स्वातंत्र्य यांच्या दीर्घ संवयीमुळें, स्वतःच चूक ओळखण्याची कुवत आमच्या ठिकाणीं आहे. या शक्तीचा वापर होतो आणि जनतेची अिच्छा सार्वभौम राहते.

अमेरिका आणि जग

मागील अेका भागांत जागतिक महत्त्वाची सत्ता म्हणून अमेरिकेला मान्यता मिळाल्याचें आपण पाहिलें. तसेंच तिच्या कांहीं साम्राज्यवादी साहसांचा परिचयहि करून घेतला. अमेरिकन साम्राज्यवाद, साम्राज्यवाद या दृष्टीनें कृतींत कसा अुतरला हेंहि स्पष्ट करण्यांत आलें. आपलें साम्राज्य वाढवून अितर राष्ट्रांना दास्यांत लोटणाऱ्या कृतींत त्या साम्राज्यवादाचें पर्यवसान झालें नाहीं. प्रत्येक प्रदेश आपापला कारभार चालवून अमेरिकेंतील पूर्ण दर्जाचें राज्य बनण्याच्या ध्येयाकडे जात असणारा बनला. १८६७ सालीं अलास्का रशियाकडून विकत घेतल्यापासून अुत्तर अमेरिकेंत अेकहि भूप्रदेश अमेरिकेनें काबीज केलेला नाहीं. आतां अितर जगाच्या दृष्टीनें अमेरिकेची परिस्थिति कशी बदलली तें पाहूं या.

१९०० ते १९१४ या काळांत, युरोपांत सुरू होणाऱ्या महायुद्धांत अमेरिकेला पडावें लागेल असें कोणाला स्वप्नांतहि वाटत नव्हतें. युरोपच्या भांडणापासून दूर राहणें ही जुनी कल्पना आणि हा जुना सल्ला अमेरिकनांच्या मनांत पक्का ठसला होता. युरोप किंवा आशियांतील कोणत्याहि सत्तेबरोबर लढा करण्याची अमेरिकेची अिच्छा नव्हती, नव्हे अशी कल्पनाच विपरीत वाटत होती. जग लहान झालें होतें, अंतर कमी झालें होतें याची अमेरिकनांना कल्पना होती. जो सागर ओलांडण्यास दीड ते तीन महिने लागत होते तोच सागर आतां बोटीनें दहा दिवसांत ओलांडणें शक्य झालें होतें. केवळ तारायंत्र वगैरेमुळें जगांतील दूरदूरचे भूप्रदेश आतां अेकत्र बांधले जात होते. आशियांत अुद्‌भवलेल्या अेकाद्या रोगाला अमेरिकेंतील जनता बळी पडण्याचा संभव निर्माण झाला होता याची त्यांना कल्पना होती. आपला व्यापार सातासमुद्रापलीकडे पोंचला आहे याचीहि त्यांना जाणीव होती. आशियांतील दुष्काळ किंवा युरोपांतील घबराट याचा परिणाम अमेरिकेवर होत होता हें त्यांना समजत होतें. आपल्या पूर्वजांनीं कल्पनाहि केली नसेल अितका घनिष्ठ संबंध आपला अितर जगाशीं येत आहे, हें ते ओळखीत होते. तरीसुद्धां अमेरिकेची दृष्टि अंतर्गत भागाकडेच वळलेली होती, समुद्रापलीकडील भूभागाकडे वळलेली नव्हती. युरोप आणि आशियांतील घडामोडींकडे प्रेक्षक म्हणून त्यांना कुतूहल होतें. कान्ससमधील शेतकरी किंवा न्यू यॉर्कमधील कारकून समुद्रापलीकडील राज्याभिषेक, भूकंप, बंड, शोध यांच्याविषयीं

वाचीत होता. पण या घडामोडी त्याच्या जीवनापलीकडील होत्या. देशांतर करून नुकता आलेला अेकादा माणूस आपल्या मायदेशांतील राजकारणाविषयीं औत्सुक्य दाखवित असेल, पण तो अेक नवीन जीवन जगूं लागला होता, राहणीचे नवे मार्ग तो शिकत होता आणि त्यांचेंच त्याला अधिक महत्व होतें.

राजेशाही, नियंत्रित राजेशाही, अनियंत्रित राज्यसत्ता, लोकसत्ताक-- अशा प्रकारच्या आपल्या देशांतील राज्यपद्धतीपेक्षां निराळ्या राज्यपद्धति होत्या याची त्याला जाणीव होती. शाळेंतील अितिहासांत त्यानें याविषयीं वाचलेलें होतें. क्वचित् अितर अमेरिकनांकडून किंवा प्रवासानें त्यानें प्रत्यक्ष कांहीं माहिती मिळविली होती. पण अशा तऱ्हेच्या अितर राज्यपद्धति होत्या ही गोष्ट त्याला फारशी महत्वाची वाटत नव्हती. जुलमी सत्तेखालील हद्दपारितांचें अमेरिकेंत क्वचित स्वागत होअी. रशियांतील झारशाहीचा तो निषेध करीत होता. मोठ्या सत्तेच्या पायाखालीं तुडविल्या जात असलेल्या छोट्या राष्ट्रांविषयीं त्याला सहानुभूति होती आणि लहान राष्ट्रांच्या बाजूनें स्वयंसेवक म्हणून लढण्याचीहि त्याची तयारी असे. हजारो मैल दूर असलेल्या निराश्रितांना, भुकेल्यांना पैसा, अन्न, वैद्यकीय आणि अितर सर्व मदत तो देत होता. परंतु राजकीय दृष्ट्या आपल्या मार्गांत दुसरा कोणी येत नाहीं तोंपर्यंत, अितरांच्या मार्गांत जाण्याचें त्याचें धोरण नव्हतें. हळुहळू, अितर राष्ट्रेंहि लोकशाहीचा स्वीकार करतील आणि मग चांगलें जग निर्माण होअील अशी त्याला आशा वाटत असे. पण अितर राष्ट्रांवर लोकशाहीची सक्ति करण्याची त्याची तयारी नव्हती.

१९१४ सालच्या सामान्य अमेरिकनाच्या प्रवृत्तीची यावरून चांगली कल्पना येअील. ही वृत्ति भोळसर, संकुचित, अशी वाटेल. पण त्यांत प्रामाणिकपणा होता. यानंतर अेकंदर परिस्थिति झपाट्यानें पालटूं लागली.

सुरुवातीला पुष्कळशा अमेरिकनांना युरोपांतील पहिलें महायुद्ध ही वृत्तपत्रांत वाचण्यापुरतीच महत्त्वाची गोष्ट वाटत होती. त्याची झळ आपल्याला लागेल अशी त्यांना कल्पनाहि नव्हती. अेकाद्या खेळांत आपण कुठल्या तरी बाजूनें बोलतों तसेंच, परकीयांच्या या रक्तपाताच्या खेळांत कुठल्याहि बाजूनें अमेरिकन लोक बोलत. भाषा, संस्कृति, ग्रंथ, समान कल्पना, अित्यादि दृढ बंधनांनीं ब्रिटनशीं जोडलेले असल्यामुळें, पुष्कळ अमेरिकनांचा कल मित्रराष्ट्रांकडेच होता. फ्रान्सबरोबरील अैतिहासिक मैत्रीचाहि परिणाम झाला. परंतु विज्ञान आणि संगीत यांच्याबद्दल प्रसिध्द असलेल्या जुन्या जर्मनींतून लाखों अमेरिकनांचे पूर्वज आलेले होते. त्यांना

कैसरविषयीं फारसें कांहीं वाटत होतें असें नव्हे आणि जर्मनींत पुरेसें स्वातंत्र्य नव्हतें म्हणून त्यांचे पूर्वज अमेरिकेंत आलेले होते. तरीसुद्धां जुनी बंधनें अद्याप पुरेशीं कणखर होतींच.

हळुहळू परिस्थिति चिघळली. जर्मन पाणबुड्यांनीं अमेरिकन बोटी बुडविल्या आणि अमेरिकन नागरिक मृत्युमुखीं पडले. अमेरिकन सरकारनें ब्रिटन व जर्मनी या दोन्हीहि राष्ट्रांकडे निषेध प्रकट केला आणि त्यांच्या लढाअीमुळें आमच्या हक्कावर कशी गदा येते अिकडे लक्ष वेधलें पण अेक गोष्ट कायम राहिली. ब्रिटनच्या यद्धपद्धतीमुळें अमेरिकन मारले जात नव्हते. जर्मनीच्या कृतीमुळें २०९ अमेरिकनांचा जीव गेला. तरीसुद्धां युद्धापासून दूर राहण्याची अमेरिकेची अिच्छा होती. त्या वेळचे राष्ट्राध्यक्ष विल्सन यांनीं आपले सर्व प्रयत्न या दिशेनें चालू ठेवले. त्यांनी विरोधी पक्षांना शांतता प्रस्थापित करण्याची विनंति केली व तडजोडीसाठीं प्रयत्न करण्याची तयारी दाखविली. पण तें सर्व व्यर्थ ठरलें. जर्मनीनें पाणबुड्यांची अमर्यादित चढाअी करण्याचा निर्णय घेतला. जर्मन सरकारनें हा निर्णय मुद्दाम घेतला. अमेरिकन मदत मित्रराष्ट्रांना वेळेवर पोंचण्यापूर्वीच त्यांचा पराजय करण्याच्या हेतूनें, अमेरिकेबरोबर लढाअी करण्याचा धोका पत्करण्याचीहि जर्मनीची तयारी होती.

अमेरिकेला हें सरळ सरळ आव्हान होतें आणि अमेरिकेला लगोलग धोका निर्माण झालेला होता. शत्रुत्व आणि आक्रमक वृत्तीच्या कोणत्याहि राष्ट्रांच्या हातीं अटलांटिक महासागराचा ताबा राहूं देणें स्वसंरक्षणाच्या दृष्टीनें अमेरिकेला अशक्य होतें ही गोष्ट आजहि सत्य आहे. त्यांच्या देशाचा अपमान झाला होता, त्यांच्या ध्वजावर विनाकारण हल्ला झाला होता, आणि आपलें स्वातंत्र्य धोक्यांत आलें आहे असें त्यांना आढळलें. २ अेप्रिल १९१७ या दिवशीं अमेरिकन काँग्रेसपुढें बोलतांना राष्ट्राध्यक्ष विल्सन यांनीं पुढील भाषण केलें. "मी टाकीत असलेल्या पावलाचें घातक स्वरूप आणि त्याबरोबर येणाऱ्या गंभीर जबाबदारीची जाणीव ठेवून, परंतु माझ्या घटनात्मक कर्तव्याला निश्चितपणें जागृत राहून, मी काँग्रेसला असा सल्ला देतों कीं, जर्मन सरकारची अलीकडील वागणूक म्हणजे अमेरिकन जनतेविरुद्ध त्यांनीं पुकारलेले युद्धच होय. शांततेपेक्षांहि हक्क अधिक महत्वाचे असतात. ज्या गोष्टी आम्हांला विशेष जिव्हाळ्याच्या वाटतात त्या लोकशाहीसाठीं, राज्यकारभारांत हक्क असावे असें सांगणाऱ्यांसाठीं, सर्व राष्ट्रांत आणि जगांत शांतता प्रस्थापित करणारा अेकोपा करून जगाचें न्याय्य राज्य प्रस्थापित करण्यासाठीं आम्हीं लढण्यास तयार आहों."

अमेरिकन सरकार आणि जनता यांनीं या कारणासाठीं युद्ध पुकारलें.

त्यावेळीं अमेरिकेची फारशी तयारी नव्हती. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीला जेवढी तयारी होती त्याच्या निम्यानेंहि त्यावेळीं तयारी नव्हती. तरीसुद्धां २० लाख अमेरिकन सैन्य फ्रान्समध्यें उतरलें. अमेरिकेची मानवी शक्ति आणि अुद्योगधंदे लढाअीच्या दृष्टीनें संघटित करण्यांत आले. जर्मनीचे सेनापती ल्युडेनडॉर्फ यांनीं म्हटलें, "अमेरिका अशा प्रकारें युद्धांतील निर्णायक घटक बनली." जर्मनी व तिच्या सहकाऱ्यांचा संपूर्ण पराभव होअून महायुद्ध संपलें.

मारले गेलेल्या व जखमी अमेरिकनांच्या स्वरूपांत अमेरिकेलाहि चांगलेंच नुकसान सोसावें लागलें. पैसा आणि रक्त दोन्हीहि अमेरिकेला खपवावीं लागलीं. पण अमेरिकेच्या पदरांत कोणताच मुलुख पडला नाहीं. मृत सैनिकांना पुरण्यासाठीं लागणारी सहा फुटांची जागा अेवढीच भूमि अमेरिकेच्या वांट्याला आली. पण ती भूमीहि अमेरिकेच्या मालकीची नव्हती. अमेरिकेनें खर्च केलेला पैसा पूर्णपणें परत कधींच मिळाला नाहीं. ज्या गोष्टी न्याय्य वाटल्या त्याचसाठीं अमेरिका लढली. अमेरिकन राष्ट्रानें खर्च केलेला पैसा आणि घेतलेली मेहनत याबाबत कधींच कुरकूर केली नाहीं.

अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांच्यापुढें भविष्याचें अेक महान् स्वप्न होतें. राष्ट्रसंघ, जागतिक न्यायालय, जागतिक सहकार्याची यंत्रणा यांचीं त्यांना स्वप्नें पडत होतीं. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठीं त्यांनीं पुढील चौदा मुद्दे मांडले--

(१) शांततेचे खुले करार करण्यांत यावेत. यापुढें कोणत्याहि आंतरराष्ट्रीय वाटाघाटी खाजगी राहणार नाहींत. राष्ट्राराष्ट्रांचे व्यवहार मोकळेपणानें व जनतेला माहित पडतील अशा तऱ्हेनें चालावें.

(२) शांतताकाळांत आणि युद्धकाळांत, प्रादेशिक समुद्राबाहेरील सर्व समुद्र सागरी वाहतुकीसाठीं सर्वांनाच पूर्णपणें खुलें राहावेत. मात्र, अेखाद्या आंतरराष्ट्रीय कराराचें पालन करण्यासाठीं संपूर्णपणें किंवा अंशतः बंदी करतांना वरील नियम लागू राहणार नाहीं.

(३) शांततेला मान्यता आणि त्यासाठीं सहकार्य देणाऱ्या सर्व राष्ट्रांत व्यापाराची समान परिस्थिति असावी आणि शक्यतों सर्व आर्थिक अडथळे काढून टाकण्यांत यावेत.

(४) अंतर्गत सुरक्षिततेला पुरेशीं होतील अेवढींच शस्त्रास्त्रें प्रत्येक राष्ट्र राखील अशी हमी सर्वांनीं द्यावी व सर्वांकडून घेण्यांत यावी.

(५) वसाहतींबाबतच्या मालकी हक्कांबाबत अत्यंत निःपक्षपणानें

आणि मोकळेपणानें तडजोड करण्यांत यावी. परंतु ही तडजोड करतांना राष्ट्रांच्या रास्त मालकी हक्कांप्रमाणेंच, त्या त्या वसाहतींतील जनतेच्या हितसंबंधांनाहि तेवढेंच महत्व देण्यांत यावें या तत्वाचें कसोशीनें पालन झालें पाहिजे.

(६) सर्व रशियन प्रदेश खालीं करण्यांत यावा आणि रशियाविषयक सर्व प्रश्न मिटवितांना, आपला राजकीय विकास आणि राष्ट्रीय धोरण या गोष्टी स्वतंत्रपणें ठरविण्याची, कोणतेहि अडथळे निर्माण न करतां, रशियाला संधि देण्यांत यावी आणि या वृत्तीला सर्व राष्ट्रांचें खुलें व संपूर्ण सहकार्य मिळविण्यांत यावें. आपल्या मतानुसार सामाजिक व्यवस्था करूनहि जगांतील राष्ट्रांत स्थान मिळेल, शिवाय हवी असेल ती मदत देण्याचें आश्वासनहि रशियाला देण्यांत यावें. येत्या कांहीं महिन्यांत रशियाबरोबर होणाऱ्या वागणुकीवरूनच अितर राष्ट्रांच्या सदिच्छेची, रशियाच्या विशिष्ट गरजांची आणि त्यांच्या निःस्वार्थी सहानुभूतीची कसोटी लागणार आहे.

(७) सार्वभौमत्वावर कोणतेंहि बंधन न लादतां बेल्जमची पुनर्वसाहत केली पाहिजे याला सर्वांकडून मान्यता मिळण्यास हरकत नाहीं. या अेका कृत्यानेंच, अेकमेकांबरोबरच्या व्यवहारासाठीं राष्ट्रांनीं निर्माण केलेल्या कायद्यांवरचा जगांतील राष्ट्रांचा विश्वास पुन्हां प्रस्थापित होअील. या अुपायाशिवाय, आंतरराष्ट्रीय कायद्याची सर्व अिमारत व त्याचा आधार नेहमींच कमकुवत राहील.

(८) सर्व फ्रेंच मुलुख मुक्त करण्यांत यावा आणि आक्रमित प्रदेश परत करण्यांत यावा. सुमारें पन्नास वर्षें जागतिक शांतता बिघडविण्यास कारणीभूत झालेल्या प्रशियाचा १८७१ मधील अलसेस-लॉरेन बाबतचा अन्याय आतां दूर करण्यांत यावा. म्हणजे सर्वांच्या हितासाठीं पुन्हां शांततेची स्थापना होअील.

(९) राष्ट्रीयत्वाच्या स्पष्ट दिसणाऱ्या लक्षणांनुसार अिटालीच्या सरहद्दी पुन्हा ठरविण्यांत याव्या.

(१०) जगांतील राष्ट्रांत ऑस्ट्रिया-हंगेरीचें स्थान सुरक्षित राहावें आणि तसें तें टिकावें अशी आमची अिच्छा आहे. यासाठीं ऑस्ट्रिया-हंगेरीच्या जनतेला आपल्या विकासासाठीं पूर्ण स्वायत्तता देण्यांत यावी.

(११) रुमानिया, सर्बिया आणि मॉण्टेनेग्रो हे भूप्रदेश खालीं करण्यांत यावेत, ताब्यांतील मुलुख परत करण्यांत यावा. सर्बियाला समुद्रापर्यंत खुली व सुरक्षित वाट देण्यांत यावी. निष्ठा आणि राष्ट्रीयत्व यांच्या

अैतिहासिक दृष्टचा ठरणाऱ्या हद्दींनुसार बाल्कन राष्ट्रांचे आपसांतील संबंध मैत्रीच्या वाटाघाटींनें ठरविण्यांत यावे. बाल्कन राष्ट्रांना राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य आणि भूभाग सुरक्षित राहण्याची हमी देण्यांत यावी.

(१२) आटोमन साम्राज्यांतील तुर्कस्थानच्या विभागाला सुरक्षित सार्वभौमत्वाचें आश्वासन देण्यांत यावें. परंतु तुर्की सत्तेखालीं असलेल्या अितर राष्ट्रांना संशयरहित जीवितसुरक्षितता आणि स्वायत्त विकासाची अडथळेरहित संपूर्ण संधि देण्याचें आश्वासन मिळावें. आंतरराष्ट्रीय हमीनें जहाजें व व्यापार यासाठीं डार्डानेल्स हा कायमचा खुला मार्ग राहावा.

(१३) अविवाद्य अशी पोलिश जनता रहात असलेल्या मुलखाचें अेक स्वतंत्र पोलिश राज्य निर्माण करण्यांत यावें. या राज्याला खुला आणि सुरक्षित असा समुद्राकडे जाणारा मार्ग देण्याचें आश्वासन मिळावें. आणि आंतरराष्ट्रीय करारानें पोलिश राष्ट्राच्या राजकीय, आर्थिक व प्रादेशिक स्वातंत्र्याची हमी देण्यांत यावी.

(१४) लहान व मोठ्या अशा सर्व राष्ट्रांना राजकीय स्वातंत्र्याची व प्रादेशिक अभंगतेची परस्परांना हमी देण्यासाठीं निश्चित करारांनीं राष्ट्रांचा अेक सर्वसामान्य संघ बनविण्यांत आला.

अन्यायाच्या या दुरुस्तींत आणि हक्कांच्या प्रतिष्ठापनेंत साम्राज्य-विरोधी अितर सर्व सरकारें व जनता यांचे आम्हीं जिव्हाळ्याचे सहकारी आहों. आमचें हित निराळें असणार नाहीं किंवा आमच्या साध्यांत फरक राहणार नाहीं. शेवटपर्यंत आम्हीं अेकत्रच नांदूं.

न्यायाचा विजय व्हावा आणि युद्धाला प्रेरणा देणाऱ्या गोष्टी दूर केल्यानेंच स्थिर शांतता निर्माण होअू शकेल अशी आमची आकांक्षा असल्यामुळेंच, अशा व्यवस्था व करार यशस्वी होअीपर्यंत त्यांच्यासाठीं लढण्याची आमची तयारी आहे. जर्मनीच्या थोरवीचा आम्हांला हेवा नाहीं आणि या योजनेंत जर्मनीच्या थोरवीला अडथळा आणणारी कोणतीच गोष्ट नाहीं. शैक्षणिक प्रतिष्ठा किंवा शांततेच्या अितर थोरवीबद्दल आम्हांला जर्मनांचा द्वेष वाटणार नाहीं. जर्मनीच्या रास्त सत्तेला अडथळे करण्याची किंवा ती कमी करण्याची आमची अिच्छा नाहीं. न्याय, कायदा आणि रास्त वागणूक, या बाबतच्या करारांत सामील होण्याची जर्मनीची अिच्छा असेल तर, विरोधी व्यापारी व्यवस्था निर्माण करून किंवा शस्त्रास्त्रांनीं जर्मनीबरोबर लढण्याची आमची अिच्छा नाहीं. नव्या जगांत अितर राष्ट्रांबरोबर समान दर्जा जर्मनीनें पत्करावा, मात्र स्वामित्वाचा दर्जा जर्मनीला मिळणार नाहीं.

जर्मनींतील संस्थांमध्यें फेरबदल करावा असेंहि आमचें म्हणणें नाहीं. पण अेक गोष्ट आम्हांला स्पष्टपणें सांगणें आवश्यक वाटतें. यावरच पुढील बोलणीं आधारलीं जातील. आमच्याबरोबर वाटाघाटीसाठीं येणारे लोक राअीशस्टॅगमधील बहुसंख्य जनतेचे प्रतिनिधि म्हणून कां साम्राज्यवादी लष्करी पक्षाचे प्रतिनिधि म्हणून आमच्याशीं बोलणीं करणार तें स्पष्ट व्हावें.

कोणताहि संशय निर्माण होअू नये अितक्या निश्चितपणें आमचें म्हणणें आम्हीं मांडलें आहे. मी मांडलेल्या सर्व कार्यक्रमांत अेक स्पष्ट असें तत्व आहे. सर्व जनतेला व राष्ट्रांना न्याय्य वागणूक दिली जाअील आणि बलवान असो किंवा बलहीन असो सर्वांना सारखेंच स्वातंत्र्य आणि सुरक्षितता लाभेल अशा तऱ्हेनें जगण्याचा हक्क मिळावा. या तत्वावर आधारल्याशिवाय आंतरराष्ट्रीय न्यायाची कोणतीहि अिमारत अुभी राहणार नाहीं. अमेरिकेंतील जनता दुसऱ्या कोणत्याच तत्वावर कृति करूं शकणार नाहीं. या तत्वाच्या प्रस्थापनेसाठीं अमेरिकन जनता आपलें जीवित, मान आणि आपलें सर्वस्व पणाला लावण्यास तयार आहे. मानवी स्वातंत्र्याची अंतिम आणि पराकाष्ठेची लढाअी आलेली आहे. अमेरिकन जनता आपलें सगळें सामर्थ्य अुच्च साध्य, अित्यादि सर्व कसोटीला लावण्यास तयार आहे.

अशा प्रकारच्या जगाचें स्वप्न केवळ विल्सन यांनाच पडत नव्हतें. यापूर्वींहि अितरांनीं तें स्वप्न पाहिलें होतें आणि तेव्हांहि कांहींजण पाहात होते. अनेक राष्ट्रांतील सामान्य जनताहि त्या सुखस्वप्नांत गुंगत होती आणि स्वप्न खरें ठरेल अशी अपेक्षा करीत होती.

हें स्वप्न प्रत्यक्षांत कां अुतरलें नाहीं ही दीर्घ कथा येथें सांगण्यास फार वेळ लागेल. व्हर्साय परिषदेंतील वाद आणि देवघेवीची बोलणीं याच्या तपशीलांत आपण शिरूं शकत नाहीं. तसेंच व्हर्सायला अपयश कां आलें याच्याहि तपशिलांत शिरणें शक्य नाहीं. या अपयशाला अमेरिकाच अल्प प्रमाणांत किंवा बव्हंशी कारणीभूत झाली असें तुम्हीं म्हटलें तरी, त्याबद्दल वाद घालण्याची आमची अिच्छा नाहीं. वुड्रो विल्सन स्वतः ध्येयवादी, स्वप्नाळु असे थोर गृहस्थ होते. पण त्यांनीं आपलें स्वप्न प्रत्यक्षांत अुतरविण्यासाठीं आवश्यक असलेल्या कांहीं व्यावहारिक अंगांकडे दुर्लक्ष केलें. अमेरिकेंतील विरोधी पक्षीयांना बैठकीला बोलावून त्यांच्या सहकार्याची त्यांनीं शाश्वति मिळविली नाहीं. अशा प्रकारच्या जागतिक संघामुळें अमेरिकनांचें काय हित होणार आहे तें त्यांनीं अमेरिकन जनतेला स्पष्ट केलें नाहीं. संकुचित आणि स्वार्थी लोकांनीं राष्ट्रसंघांत अमेरिकेला भाग घेअूं दिला नाहीं आणि

वुड्रो विल्सन यांच्या हृदयाला अक्षरशः धक्का बसला. आपल्या स्वतःच्या कल्पनासाठींच नव्हे तर, शांतता, सुरक्षितता आणि स्वातंत्र्य यांची आशा बाळगणाऱ्या जगांतील सर्व ठिकाणच्या प्रत्येक माणसासाठींच त्यांनीं हुतात्म्याचें मरण पत्करलें. आपल्या पराभवाविषयीं व अपयशाविषयीं मरणापूर्वी त्यांनीं असें अुद्गार काढले कीं "जसें सर्वत्र अीश्वराचें अस्तित्व असतें, तितक्याच निश्चिततेनें आपली कल्पना शेवटीं विजयी होअीलच".

विल्सन यांच्या अपयशानंतर अमेरिकेच्या अलगपणांतून नव्या गोष्टी अुदयास आल्या. विमानें तयार होअूं लागलीं आणि सर्वत्र फिरूं लागलीं. अुन्हाळच्यांत पाण्याच्या थेंबाची ज्या जलदीनें वाफ व्हावी तितक्याच गतीनें जगांतील अंतर कमी होअूं लागलें. तरीसुद्धां शांततेसाठीं अमेरिका अुत्सुक होती. १९२१ सालीं अमेरिकेनें अेक निःशस्त्रीकरण परिषद भरविली. युध्दाचा निषेध करणाऱ्या केलॉग करारांत अमेरिकेनेंच पुढाकार घेतला. दरम्यान आणखी प्रगति झाली. ज्या राज्यपद्धतींना स्वातंत्र्य सहन होत नव्हतें त्यांनीं मानवी हक्क पायांखालीं तुडविले आणि 'ॲक्सिस' राष्ट्रांत अशा पद्धति जोरावूं लागल्या.

जर्मनींत नात्सीझमचा अुदय झाल्यावर आणि जपानमध्यें निर्दय, आक्रमक लष्करी पक्षाचा जोर वाढल्यावर १७७६ सालापासून अमेरिकेपुढें अुभें राहिलेल्या संकटाहून सर्वांत मोठें संकट येत आहे ही गोष्ट अधिकाधिक स्पष्ट होअूं लागली. जर्मनी आदि 'ॲक्सिस' राष्ट्रांचा हुकूमशाही प्रहार सर्व ठिकाणीं आणि सर्व लोकांना जाणवूं लागला. सर्व जगाचें स्वामित्व मिळविण्याची त्यांची अिच्छा होती आणि तसा त्यांचा प्रयत्नहि होता. स्वामित्व धारण करणारे वंश आणि गुलाम राहणारे वंश सर्वत्र स्थापण्याची त्यांची आकांक्षा होती. दास्यत्वांत आणि अंधारांत पडलेल्या जगांत स्वातंत्र्याचें अेकुलतें अेक बेट म्हणून अमेरिका राहूं द्यावी, हें त्यांना शक्य नव्हतें. अमेरिकनांचे अितर कांहींहि दोष असोत पण त्यांच्याजवळ थोडें व्यवहारज्ञान आहे. पाहतांक्षणींच त्यांना गुलामगिरी अुमगते, त्यांना हुकूमशाही समजते आणि ते तिचा द्वेष करतात; धमक्या त्यांना समजतात, पण ते त्या निमूटपणें अैकून घेणार नाहींत. ते लढाअू आहेत.

आज आपल्या बांधवांचा जे छळ करतात ते नेहमींच छळ करतील असें नाहीं. यूनोच्या रूपानें स्वतंत्र जनता आतां वाटचाल करूं लागली आहे. स्वातंत्र्यप्रेमी, शांतताप्रिय आणि न्यायप्रिय जनतेनें आमच्याबरोबर सहकार्य करावें. आमच्या रक्ताच्या आप्तांअितक्याच जिव्हाळ्यानें आम्हीं त्यांचें स्वागत करूं.

महायुद्धानंतर

या छोटयाशा पुस्तकांत आम्हीं कशा तऱ्हेचे लोक आहोंत याविषयीं थोडेसें – अमेरिकेविषयीं थोडेसें, अमेरिकेच्या श्रद्धा काय आहेत, अमेरिकेचा विकास कसा झाला, अमेरिकेचा जीवनक्रम कसा आहे, याविषयीं थोडेसें सांगण्याचा प्रयत्न केला. सर्व अितिहास आम्हीं येथें मांडला नाहीं, पण त्याला झळाळी देण्याचा प्रयत्न केला नाहीं. गुणांप्रमाणें दोषहि अुघड केले. आमच्या श्रद्धास्थानाविषयींचें सत्य सांगण्याचा आम्हीं कसून प्रयत्न केला.

आतां अेक प्रश्न – आणि तो मोठा आहे. हा प्रश्न आपणा सर्वांच्या मनांत असेल. कदाचित् परदेशीयांच्या मनांत तो प्रामुख्यानें असेल. अमेरिकेला काय हवें आहे? अुद्यांच्या जगाबाबत अमेरिकेचें ध्येय काय आहे? हेतु आणि साध्यें काय आहेत ?

अमेरिकेला जगाचें साम्राज्य नको आहे. लोकांनीं दास्यांत राहावें अशीहि अमेरिकेची अिच्छा नाहीं. सत्ता गाजविणारा वंश म्हणून वावरण्याचीहि अमेरिकेची आकांक्षा नाहीं. या सर्व कल्पना, अमेरिकन कल्पना, अमेरिकन जीवनक्रम आणि अमेरिकन जनतेचा अितिहास आणि विकास यांच्याशीं विरोधी आहेत.

युरोपमध्यें अेक अिचभरहि भूमि मिळविण्याची अमेरिकेची अिच्छा नाहीं. पश्चिम गोलार्धांत आपली सत्ता अितरत्र प्रस्थापित करण्याचा हव्यासहि अमेरिकेला नाहीं. कोटल्याहि राष्ट्रावर आर्थिक वर्चस्व गाजविण्याची अमेरिकेला आकांक्षा नाहीं. खरोखरीची जागतिक शांतता स्थापन होओीपर्यंत, राष्ट्रीय संरक्षण आणि सुरक्षितता याला आवश्यक असलेले विमानतळ अमेरिकेला ठेवले पाहिजेत, पण यांत युद्धाचा हेतु नसून, शांततेचाच आहे, स्मशान–शांतता नको आहे. स्वतंत्र मानवाच्या जगांतील शांततेसाठीं अमेरिकेचा प्रयत्न आहे. मानवी मूल्यावर व प्रतिष्ठेवर अमेरिकेचा विश्वास आहे.

अुच्चार स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, गरजांपासून मुक्तता आणि निर्भयता या चार स्वातंत्र्यांत नव्या जगाचीं मूलभूत तत्त्वें मांडलीं आहेत. हीं तत्त्वें केवळ अमेरिकनांसाठीं नसून जगांतील सर्व नागरिकांसाठीं तीं आहेत.

ग्रेट ब्रिटनच्या सहकार्यानें अटलांटिक सनदेंत अमेरिकेनें कांहीं तत्त्वें मांडलीं आहेत. ती सनद अशी आहे :

अमेरिकेचे अध्यक्ष आणि ब्रिटनच्या सरकारचे प्रतिनिधि मि. चर्चिल यांना, अेकत्र जमल्यावर अधिक चांगल्या जगाच्या आशा ज्यावर आधारलेल्या आहेत तीं आपापल्या राष्ट्राच्या धोरणांतील समान तत्त्वें मांडणें आवश्यक भासलें.

(१) आमच्या राष्ट्रांना प्रादेशिक किंवा अितर वाढ करण्याची अिच्छा नाहीं.

(२) त्या त्या विभागांतील जनतेनें मोकळेपणानें आपली अिच्छा प्रकट केल्याखेरीज प्रादेशिक फेरबदल करावे असें त्यांना वाटत नाहीं.

(३) आपल्याकडे कोणती राज्यपद्धति असावी हें ठरविण्याच्या जनतेच्या हक्काविषयीं आम्हांला आदर आहे. ज्यांचें स्वराज्य आणि सार्वभौम हक्क सक्तीनें हिरावून घेण्यांत आले असतील त्यांना ते परत मिळावे अशी आमची अिच्छा आहे.

(४) सध्यांची जबाबदारी लक्षांत घेअून, लहान अगर मोठें, विजयी वा पराभूत अशा सर्व राष्ट्रांनां समान अटींवर त्याच्या आर्थिक अुन्नतीसाठीं आवश्यक असलेला कच्चा माल मिळविण्याचा व्यापार करण्याची संधि मिळेल असे प्रयत्नहि आमचीं राष्ट्रें करतील.

(५) सामाजिक सुरक्षितता, आर्थिक व्यवस्था आणि कामगारांचा सुधारलेला दर्जा हीं आर्थिक क्षेत्रांत साध्य करण्यासाठीं सर्व राष्ट्रांत संपूर्ण अेकोपा घडवून आणण्याची आमची अिच्छा आहे.

(६) नात्सी जुलूमाचा पूर्ण नाश झाल्यावर आपल्या राष्ट्राच्या मर्यादेंत सुरक्षिततेनें राहण्याचीं साधनें सर्व राष्ट्रांनां प्राप्त करून देणारी आणि भीती व गरजा यांपासून पूर्ण मुक्त अशा स्थितींत जगण्याची शाश्वति सर्व ठिकाणच्या सर्व जनतेला देणारी शांतता प्रस्थापित करण्याची आम्हांला आशा वाटते.

(७) अशा शांततेनें कोणत्याहि अडथळ्यांशिवाय सर्व समुद्रांवर व सागरांवर सर्व माणसांना फिरतां येअील.

(८) व्यावहारिक व तात्त्विक कारणांसाठीं जगांतील सर्व राष्ट्रांनीं शस्त्रबळाचा त्याग केला पाहिजे असा आमचा विश्वास आहे. आपल्या देशाच्या सरहद्दीबाहेर आक्रमणाची जीं राष्ट्रें धमकी देत असतात किंवा धमकी देण्याची शक्यता असते तीं राष्ट्रें जोंपर्यंत लष्कर, नौदल व हवाअीदल वापरीत असतात तोंपर्यंत शांतता टिकविणें कठिण आहे. कायम स्वरूपाची आणि सार्वत्रिक सुरक्षितता प्रस्थापित होअीपर्यंत अशा राष्ट्रांना निःशस्त्र करणें आवश्यक आहे असा आमचा विश्वास आहे. तसेंच शांतताप्रिय

जनतेवरील शस्त्रास्त्रांचें अवजड ओझें कमी करणारे अितर व्यवहार्य अुपाय करण्यास आम्हीं मदत करूं आणि प्रोत्साहन देअूं.

अटलांटिक सनद म्हणजे बायबलांतील दहा आज्ञा नव्हेत. तसेंच ती अंतिम घोषणा आहे असेंहि नाहीं. परंतु त्यावरून अितर राष्ट्रांना जिंकणें हें अमेरिकेचें साध्य नसून, सर्व राष्ट्रांत सहकार्य निर्माण करणें हे अमेरिकेचें साध्य आहे हें समजेल.

यासाठीं आम्हीं प्रयत्न करीत आहों. हाच आमच्या ध्वजाचा अर्थ आहे. स्वातंत्र्य आणि आशा, अुत्तम शेजारी, मालक नव्हे हाच आमच्या ध्वजाचा अर्थ आहे. आपलें भवितव्य घडविणाऱ्या, आपलें राज्य चालविणाऱ्या आणि देशावर आक्रमण झालें असतां लढणाऱ्या जनतेचा तो ध्वज निदर्शक आहे. तो ध्वज म्हणजे मानव आणि मानवाचें भवितव्य व मानवानें निर्माण केलेलें स्वतंत्र जग याविषयीं विश्वास बाळगणारें राष्ट्र आणि त्यातील जनता होय.

अमेरिकन ध्येयस्वप्नांचा अुच्चार करणाऱ्या जुन्या-नव्या लोकांचे हे संदेश पुन्हां अेकदा अैका :–

आमचे पूर्वज अिंग्लिश लोक होते. हा मोठा सागर ओलांडून ते आले आणि या निर्जन प्रदेशांत नाश पत्करण्याची त्यांची तयारी होती. पण त्यांनीं अीश्वराला हांक मारली. अीश्वरानें त्यांची हांक अैकली आणि त्यांच्या संकटांत त्यांच्यावर आपली कृपाळू दृष्टि टाकली. म्हणून अीश्वराची स्तुति त्यांना करूं द्या. अीश्वरी कृपाप्रसादानें जे संकटमुक्त झाले त्यांनीं अीश्वरानें त्रासांतून त्यांची कशी मुक्तता केली तें सांगावें. अीश्वराच्या प्रेमळ कृपेची त्याच्याजवळ त्यांनीं कबूली द्यावी. त्याच्या भव्य कार्याची जनतेपुढें त्यांनीं माहिती द्यावी.

——विल्यम ब्रॅडफोर्ड, १६४७.

अीश्वराच्या कृपेनें सर्वत्र तथास्तु. खालीं सह्या करणारे आम्हीं करार करतों आणि अेका नागरिक संस्थेंत अेकत्र होतों.

——दि मे फ्लॉवर कॉम्पॅक्ट, १६२०.

जणूं काय ते अिंग्लंडांतच जन्मले आहेत, असें समजून आमच्या अितर मुलखांत त्यांना सर्व प्रकारचें स्वातंत्र्य, मतदानाचा हक्क आणि मोकळिक असेल आणि ते त्यांचा अुपभोग घेतील.

——दि व्हर्जीनिया चार्टर, १६०७.

नागरी सत्तेचा पाया, सार्वभौमत्व आणि मूळ, जनतेच्या ठिकाणींच असतें. लोकांना जी राज्यपद्धति योग्य वाटेल ती ते अुभारूं आणि प्रस्थापित करूं शकतात.

——रोजर विल्यम्स, १६४४.

विवेक बुद्धीवरून होणाऱ्या छळांतील तत्व, अत्यंत अुघडपणें आणि दुःखदायक रीतीनें शांततेचा राजा जीजस ख्राअिस्ट याच्या तत्वाच्या विरुद्ध आहे.
—रोजर विल्यम्स, १६४४.

जनतेची सेवा केली पाहिजे आणि केली जाअील.
—विल्यम पेन, १६९३.

शृंखला आणि गुलामी हीं किंमत देअून विकत घेण्याअितकें जीवन प्रिय आहे, किंवा शांतता अितकी गोड आहे ? अीश्वरा, हा विचार नष्ट कर. अितर लोक कोणता मार्ग स्वीकारतील मला माहित नाहीं. परंतु मला मात्र स्वातंत्र्य द्या नाहींतर मरण पत्करण्यास मी तयार आहे.
—पॅट्रिक हेन्री, १७७५.

पुढील गोष्टी आम्हीं स्वयंसिद्ध मानतों. सर्व माणसें जन्मतः समान असतात. जीवनस्वातंत्र्य आणि सौख्यप्राप्तीचे प्रयत्न, यांसारखे हिरावून घेतां न येण्यासारखें कांहीं हक्क त्यांना निर्माणकर्त्यानें दिले आहेत. हे हक्क संपादन करण्यासाठीं समाजांत शासनसंस्था स्थापन करण्यांत येते. प्रजेच्या संमतीनेंच शासनसंस्थेला रास्त अधिकार मिळतात.
दि डिक्लेरेशन ऑफ अिण्डिपेण्डन्स
—थॉमस जेफर्सन, १७७६.

सर्व राष्ट्रांविषयीं विश्वास आणि न्याय दाखवा. सर्वांशीं शांततेनें आणि अैक्यानें वागा.
—जॉर्ज वॉशिंग्टन, १७९६.

सर्व राज्यांतील आणि सर्व राजकीय वा धार्मिक पंथांच्या सर्व लोकांना समान आणि अचूक न्याय, सर्व राष्ट्रांबरोबर शांतता, व्यापारी संबंध आणि प्रामाणिक मैत्री, धार्मिक स्वातंत्र्य, वृत्तपत्रीय स्वातंत्र्य, चौकशीशिवाय अटकेंत ठेवण्यास बंदी करून व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि निःपक्षपातानें निवडलेल्या जूरीमार्फत चौकशी—या तत्वांचा तेजस्वी पुंजका आपल्यापूर्वी गेलेला आहे आणि त्यानें आपल्याला मार्गदर्शन केलेलें आहे.
फर्स्ट अिनऑगरल ॲड्रेस
—थॉमस जेफर्सन, १८०१.

कोणत्याहि व्यक्तीविषयीं द्वेष किंवा वाअीट बुद्धि न ठेवणें आणि आपण काय करतों हें न जाणतां आपल्या बांधवांना बंधनांत ठेवणाऱ्याविषयींहि दयाबुद्धि दाखविणें हें सर्व मानवजातीच्या दयाळुपणासाठीं पाळा.
—जॉन क्विन्सि ॲडॅम्स, १८३८.

नदीवरील ओबडधोबड पुलाजवळ, अेप्रिलमधील वाऱ्यावर त्यांचा ध्वज फडकला आणि लढाअीसाठीं सज्ज झालेले शेतकरी येथें अुभे राहिले

आणि त्यांनीं सर्व जगांत ज्याचा आवाज दुमदुमला असा गोळीबार केला.

—राल्फ वॉल्डो अिमर्सन, १८३६.

दलित आणि बलहीन अशांसाठीं बोलण्यास जे कचरतात ते गुलाम होत. आपल्याला ज्या सत्याचा विचार करणें आवश्यक वाटतें त्याचा अुच्चार न करतां गप्प बसण्यापेक्षां द्वेष, अुपहास आणि निंदा पत्करण्यास जे तयार होत नाहींत ते गुलाम होत. न्याय्य बाजूला दोनतीनच लोक आहेत म्हणून जे न्यायाची बाजू घेत नाहींत ते गुलाम होत.

—जेम्स रसेल लोवेल, १८४३.

ज्यानां स्वातंत्र्याविषयीं प्रेम आहे आणि जे त्याचें रक्षण करण्यास आणि बचाव करण्यास सदैव तयार असतात, त्यांनाच अीश्वर स्वातंत्र्य देतो.

—डॅनिअेल वेब्स्टर, १८३४.

जगांत, न्यायांतच थोर मानवी हित आहे.

—डॅनिअेल वेब्स्टर, १८४५.

माझ्या मृत्यूनंतर, अितरांसाठीं मी हा नियम घालून ठेवतो :
"आपण बरोबर असल्याची खात्री करा आणि कामाला लागा".

—डेव्हिड क्रॉकेट, १८३४.

शासन संस्था हा अेक ठेवा आहे आणि सरकारी अधिकारी त्या ठेव्याचे विश्वस्त असतात. हा ठेवा आणि हे विश्वस्त जनतेच्या हितासाठींच निर्माण केले आहेत.

—हेन्री क्ले, १८२९.

आमच्या हृदयांत अीश्वरानें ठेवलेल्या स्वातंत्र्य प्रेमावर आमची मदार आहे. सर्व ठिकाणच्या सर्व माणसांचा वारसा म्हणून स्वातंत्र्याला मोल देणाऱ्या वृत्तीचा सांभाळ करणें हाच आमचा बचाव.

—अब्राहम लिंकन.

लोकांचें, लोकांकडून आणि लोकांसाठीं चाललेलें राज्य, पृथ्वीवरून नष्ट होणार नाहीं.

—अब्राहम लिंकन, १८६३.

जरी सर्व अुन्हाळा लागला तरी याच पद्धतीनें मी लढा चालू ठेवीन.

—युलिसिस अेस्. ग्रांट, १८६४.

मला अैकूं येत असलेल्या आनंदगीतांत सर्व अमेरिका गात असल्याचें मला अैकूं येत आहे.

—वॉल्ट व्हिटमन.

लोकशाहीची गर्जना चालू राहो.

—वॉल्ट व्हिटमन.

कांहीं झालें तरी स्वातंत्र्याचें पूजन केलें पाहिजे.

—वॉल्ट व्हिटमन.

अमेरिका हेंच मुळीं सर्वांत मोठें काव्य आहे. दिवस आणि रात्रीच्या भव्य कृतीशीं तुलना करतां येण्यासारखें मानवाच्या कृतींत शेवटीं कांहींतरी सांपडलें.

—वॉल्ट व्हिटमन, १८५५.

सरकारी अधिकारी हे जनतेनें केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करणारे नोकर आणि प्रतिनिधि आहेत.

—ग्रोव्हर क्लीव्हलँड, १८८२.

सत्तांची समता नको, पण सत्तांचा अेक समाज असावा, संघटित हेवा नको, पण संघटित सार्वत्रिक शांतता हवी.

—वुड्रो विल्सन, १९१७.

आपल्या पसंतीनुसार आपलें भवितव्य घडविण्यास स्वातंत्र्य देणाऱ्या प्रदेशाचा शोध करणाऱ्या सर्व ठिकाणच्या सर्व माणसांच्या हृदयांत अमेरिका आहे.

—वुड्रो विल्सन, १९१७.

घटनात्मक प्रतिनिधि सरकार ही लोकशाही पद्धत आम्हीं टिकवितों आणि तिचें रक्षण करतों. या पद्धतीनें आमच्या नागरिकांना जीवनाची अधिक सुरक्षितता लाभेल आणि आपली अुन्नति करण्यास अधिक समान संधि त्यांना मिळेल. राष्ट्रांराष्ट्रांतील व्यापार आणि कला व विज्ञान यांची देवघेव यांना याच पद्धतीद्वारा अधिक अुत्तेजन देतां येअील. या पद्धतीमुळेंच शांततेची आशा आणि जगांतील जनतेला अधिक समृद्ध जीवन, आम्हीं देअू शकतों.

—फ्रँकलिन डी. रूझव्हेल्ट, १९३६.


चार स्वातंत्र्यें—अुच्चार स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, गरजेपासून मुक्तता आणि निर्भयता.

—फ्रँकलिन डी. रूझव्हेल्ट.

अीश्वराची स्तुति करा आणि दारुगोळा पुढें पाठवा.

—अमेरिकन गीत, १९४२.

असें आमचें म्हणणें आहे. असें आम्हांला अभिप्रेत असते. अशी आमची वाढ झाली. असे आम्हीं आहों. ह्या गोष्टीवर आम्हीं विश्वास ठेवतो. अशी आहे अमेरिका.


19
14